वर्षाची अगाऊ रु० ५ डांक हाशील ०।१२
सहामाही " ३ " ०८
सालअखेर " ७ " १०८
किरकोळ अंकास..........................०४

नोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस ..........०१

Rs.
per annum in advance 5 Postage 13 as
Per annum in arrears 7 " 1Rs. 8 as
Six monthly............3 " 8 as
Single copy..................................4as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

Advertisements
Below 10 lines... 2Rs
per line over10...4 as
Repetition per line3as

VOL XXIV — AKOLA MONDAY 3 MARCH 1890 — NO 9

वर्ष २४ — अकोला सोमवार तारीख ३ माहे मार्च सन १८९० इ० — अंक ९


## पुण्यातील वक्तृत्वोत्तेजक मंडळी.

सन १८९०-९१ सालचा भाषण समारंभ

पुण्यांतील वक्तृत्वोत्तेजक मंडळीचा चालूं सालचा भाषण समारंभ तारीख ३ माहे मे शनवार सन १८९० पासून सुरू होईल विषय व बक्षिसे खालीं लिहिल्याप्रमाणें ठेविलीं आहेत.

विषय.

१ ला. पार्लमेंट सभेपुढें ब्राडला साहेब ह्यांणी इकडील कौन्सिलबद्दल कायद्याचा मसुदा वाचल्यानंतर हिंदुस्थानांतून आलेल्या डेलिगेटांनीं आपले विचार प्रदर्शित करावे अशी पार्लमेंटानें आपली इच्छा दर्शविली अशी कल्पना करून वक्त्यानें आपण हिंदुस्थानवासी जनांचे डेलिगेट आहों असें समजून कौन्सिलच्या सुधारणेबद्दल हिंदुस्थानांतील लोकांचे काय विचार आहेत व त्याचें ह्मणणें पार्लमेंटानें कां कबूल करावें याविषयीं भाषण करावें.

२ रा. हल्लीं आम्ही स्त्रियांस कोणत्या रीतीनें वागवितों, त्यांच्याशीं योग्य वागणूक होण्यास आपल्या वर्तनांत कांहीं फरक झाले पाहिजेत किंवा कसें? हल्लींच्या वागणुकीनें स्त्रियांवर सक्ती होत असल्यास ती कोणत्या बाबतींत होत आहे ती कोणत्या उपायांनीं नाहींशी करतां येईल ते उपाय सांगणें व स्त्रियांशीं योग्य वागणूक ठेवण्या विषयीं उपदेश करणें.

३ रा. अभंग, माडगांवकृत गाथा अभंग ३४५८.

पवित्र ते कूळ पावन तो देश.॥
जेथें हरिचे दास घेती जन्म ॥१॥
कर्मधर्म त्याचे झाला नारायण॥
त्याचेनी पावन तिन्ही लोक ॥२॥
वर्ण अभिमाने कोण जाले पावन॥
ऐसे द्या सांगून मजपाशीं ॥३॥
अंत्यजादि योनि तरल्या हरिभजनें॥
तयाची पुराणें भाट झाली ॥४॥
× + + +
यात यातीधर्म नाहीं विष्णुदासा॥
निर्णय हा ऐसा वेदशास्त्रीं ॥११॥
तुका ह्मणे तुह्मी विचारावे ग्रंथ॥
तारिले पतित नेणों किती ॥१२॥

४ था.– अयत्या वेळचा

या चारी विषयांवर भाषण करणारानीं कोणत्याही व्यक्तीस प्रत्येक्ष व परोक्ष रीतीनें अनुलक्षून बोलूं नये.

बक्षिसे व गुण

वरील चार विषयांतून इच्छेस येईल तो (एकच) विषय घ्यावा पहिल्या विषयांस ४० रुपयांचें एक व दुसरें रु. २० चे कैलासवासी रावबहादुर नानाशास्त्री आपटे यांचें; व दुसरे विषयास रु० ४० चे एक व दुसरें रु० १५ चे तिसऱ्या विषयास मंडळीच्या फंडापैकीं रु. १५ व कैलासवासी रावबहादुर विष्णु परशराम रानडे यांचे स्मारक फंडापैकीं रु. २५ एकण रु. ४० चे एक व दुसरें रु. २० चे श्री० कै० यशवंतराव गोपाळराव मैराळ यांचे नांवचें. अयत्या वेळचे विषयास बक्षीस रु० ४० चे एकच आहे. अयत्या वेळचे विषय समारंभाचे पहिले दिवशीं कळविण्यांत येतील बक्षीस मिळण्यास १०० गुणांतून निदान ५० गुण आले पाहिजेत.

पहिले विषयांत पहिलें बक्षीस मिळविणारानें जर करितां शेकडा ७० गुणांपेक्षां जास्त मिळविले तर त्यास पहिले बक्षीस रु ४० चें आहे त्या ठिकाणीं रु. ५० चें बक्षीस मिळेल.

उमेदवारांच्या समजुतीसाठीं सूचना.

१ प्रत्येक भाषणास अर्धा तास दिला जाईल, परंतु अवश्य वाटल्यास तो वेळ कमी अथवा जास्त करण्याचा अधिकार परीक्षकांस आहे भाषणांत विषयाची जुळणी, त्यांचें प्रतिपादन, श्रोत्यांच्या मनांत उतरून देण्याची शैली या गुणांकडे विशेष लक्ष दिलें जाईल. परीक्षक ज्यांची भाषणें पसंत करतील त्या उमेदवारांनीं त्यांणी केलेल्या भाषणाचा लेखी गोषवारा चिटणीसास आणून दिला पाहिजे पहिल्या तीन विषयांवरील भाषण करणारांचें वय १८ वर्षांपेक्षां कमी नसावें. व चवथ्या विषयावर भाषण करणाऱ्या उमेदवारांचें वय २२ वर्षांपेक्षा कमी नसावें.

२ भाषण करण्यास येऊं इच्छिणाऱ्या उमेदवारानें एक रुपया आपल्या अर्जासोबत पाठवावा. ज्याचा रुपया येणार नाहीं, त्याचा अर्ज घेतला जाणार नाहीं सेक्रेटरी ज्या दिवशीं व ज्या वेळेस उमेदवारानें घेतलेल्या विषयावर भाषण करण्यास सांगतील त्या दिवशीं व त्या वेळेस उमेदवारांनीं हजर असून भाषण करण्यास उभे राहिले पाहिजे. असें उमेदवार जरी पास झाले नाहींत, किंवा त्यांचीं भाषणें मंडळीनीं समग्र ऐकून न घेतल्यामुळें त्यांस आपलें भाषण थांबवून जरी परत जावें लागलें, तरी त्यांचा रुपया परत दिला जाईल. वर लिहिल्याप्रमाणें सेक्रेटरी सांगतील त्या वेळीं उमेदवार हजर नसतील किंवा हजर असून भाषण करण्यास येणार नाहींत, तर त्यांचा रुपया परत दिला जाणार नाहीं, व गैरहजर असलेल्या उमेदवारांचा मागाहून भाषण करण्याचा हक्क राहणार नाहीं

अर्ज ता० २५ एप्रिल सन १८९० चे आंत खालीं सही करणारांचे नांवें 'पेठ बुधवार कोतवाल चावडीजवळ नेटिव जनरल लायब्ररी' ह्या पत्यावर पाठवावें त्यांत प्रत्येक उमेदवारानें आपलें नांव, बापाचे नांव, आडनांव, धंदा, पत्ता व गांवाचें नांव आणि त्यानें घेतलेला विषय अशी स्पष्ट लिहावीं. नाटेडपत्र घेतलें जाणार नाहीं. उमेदवारांनीं भाषण समारंभाचे अगोदर एक दिवस चिटणिसांस येऊन भेटावें व जे न भेटतील ते भाषण करण्यास येत नाहींत, असें समजून व्यवस्था करण्यांत येईल.

ता० ५।२।९० इ०

वामनराव विष्णु लेले,
कृष्णराव बापूजी मांड
पुण्यांतील व० मंडळीचे चिटणीस.

## पत्रव्यवहार

ह्या सदरा खालील मजकूर पत्र कर्त्यांच्या मतास मिळूनच असेल असें समजूं नये.

(मागील अंकावरून समाप्त)

तो इंग्रजी लेख वाचून आह्मी पुढें जाऊं लागलों तों एक कोरीव गुहा लागली; तींत एखाद्या देवळांतील गाभाऱ्या पुढें जसा सभा मंडप असतो तद्वत कमानी असलेला कांहीं भाग होता. कमानीची उंची सुमारें २० फुट असेल व एकंदर अशा भागाची लांबी ३० फुटा पेक्षां अधीक नसावी असें अनुमान झालें दगडी कमानीच्या दोन्ही बाजुंस सुमोर ५ फुटांचे दोन रक्त ठेविलेले आहेत व आपण आंत शिरलों असतां समोर जी भिंत दिसते त्यापासून अलीकडे सुमारें ४ हातावर एक दगडी वतुलाकार आजमांस ७ फुट उंच स्थान बांधलेलें आहे ते कदाचित देवाचें स्थान असावें ज्या आपल्या वाचकांनीं ठाणें येथील कांपीनेश्वर पाहिला असेल त्याना वर निरदृष्ट केलेल्या स्थानाची सहज कल्पना करतां येण्या जोगी आहे. ते स्थान त्या माहादेवा एवढेंच आहे. असों अशी स्थानें पुष्कळ आहेत. ह्मणजे एक राहण्याच्या सोईचें घर, व लागलीच त्याचे शेजारी देव देवतार्चनासाठीं केलेला सोय अशी व्यवस्था पूर्वींच्या कोरणारांची दिसते. अशीं एकंदर गृहें व देवळें [असे ह्मणण्यास फारसा प्रत्यवाय मला वाटत नाहीं.) मिळून सुमोर १२ । १४ आहेत. जेथें जेथें देवळें आहेत त्यांच्या पुढील दरवाज्या वरचें कोरीव नकशीचें काम फारच उत्कृष्ट आहे वर सांगितलेल्या देवळापैकीं एकांत छताच चोहों बाजूस पूर्वीं सांगितल्या प्रमाणें मातीचे अप्रतीम रंग दिलेले आहेत आतां ते उडत चालले आहेत तरी अजून कांहीं वर्षें सहज टिकतील असें वाटतें. त्याच त्याचे देवळांत डावे अंगास एक भिमाची मुर्ती (भिमाची असा फक्त आमचा तर्क आहे) अति विस्तीर्ण अशी निजलेली दृष्टीस पडली तिची लांबी कमित कमी १६ फूट असावी बाजूची लांबी ८ फुटाजवळ हटली तरी चालेल मस्तकाचा परिघ सुमारें ४ फुट असावा असा तर्क आहे इतकी मोठी मुर्ती मी इतर लेण्यांतुन पाहिली नाहीं गृहांत होमकुंडे दृष्टीस पडली व कित्येकांत तर लहान लहान खोल्यातून तपश्चर्येसाठीं बांधलेले ओटे ही दृष्टीस पडले. हीं स्थानें योगाभ्यास, यज्ञ याग होम आदि करून कर्मास फार योग्य हें उघडच आहे कारण अंतःकरणाचें नैसर्गिक चांचल्य नियमित करण्यास किंबहुना मुळींच नाहींसें करण्यास यापेक्षां सुख तर स्थानें फारच दुर्लभ व अशीं एकांत स्थानें होतीं ह्मणून व तत्वज्ञाना सारख्या अत्यंत बिकट व गहन विषयावर पूर्ण उहापोह पूर्वींच्या ऋषींनीं करून अमूल्य ग्रंथ निर्माण केले व या आर्य भूमीत्या विषयांत तरी अन्य देशांस ढकलतां येऊं नये एतदर्थ त्यांत ज्ञान भांडार करून ठेविलें असो प्रकृत विषयापासून बराच वाहवलों. नंतर एकदोंचे शेवटल्या दरींत गेलों तेथें ही कोरीव काम फार मनोहर केलें आहे. त्याला विशेष शोभा त्याच्या डाव्या हातास डोंगरातून वहात येणाऱ्या धबधब्याच्या योगानें आली आहे पर्जन्य काळांत येथील शोभा कांहीं विलक्षण असेल दुरून पाहिलें म्हणजे स्फटिकवत् शुभ्र असें पाण्याचे तुषार त्या धबधब्यांतून वर उडतात व छत्रा प्रमाणें अर्ध वर्तुळाकार आकृती बनून पुनः पाण्यांत पडतात तेव्हांतर फारच मजा वाटते. हा देखावा पहून नंतर मग मागें वळलों. तेव्हां मनांत नाना तऱ्हेचे आश्चर्य व आल्हाद जनक तरंगाचे उमाळे येऊं लागले त क्षणभर कोरणाराच्या चातुर्याचा आचंबा केल्याविना राहवेना कारली येथील लेणी यांतील कांहीं लेण्यांप्रमाणें अजून प्रेक्षणीय आहेत खरी तथापी ही कांहीं विलक्षणच!!

नंतर आम्ही ज्या मार्गानें आलों त्याच मार्गानें परत शेंदुरणीस गेलों व तेथें रातोरात मुक्काम करून दुसरे दिवशी रेलवे स्टेशनाची वाट धरली. अस्तु शेवटीं आपण पत्राचा विस्तार फार झाला असतां ही कृपा करून त्याला जागा दिली त्या बद्दल आभार मानून हा लेख येथें संपवितों.

आपला
एक "फिरस्ता"

वऱ्हाडसमाचार.

मिती फाल्गुन शुद्ध १२ शके १८११

(मागील अंकावरून पुढें चालू.)

ती परिक्षा स्त्री वैद्य घेतात (एवढ्या करितां त्यांनीं स्त्रिवैद्य ठेविले आहेत) आणि उमेदवार स्त्रियांची शरीर प्रकृति जर अभ्यासाचे श्रम सहन करण्या सारखी नसली तर त्यांना कालेजांत घेत नाहींत. याचा परिणाम असा झाला आहे कीं अमेरिकन लोक स्त्रियांच्या हायस्कुलांतून व लोअर

स्कुलांतून इतकें शारीरिक शिक्षण देऊं लागले आहेत कीं त्या योगें कालेज प्रवेश परीक्षेंत पास होतां यावें. या वरून मला एक दुसरा विचार सूचला. आपण एवढें समजलें पाहिजे कीं आपला उद्देश मल्ल होण्याचा असूं नये तर जीं अवयवें अशक्त असतील ती सशक्त करण्याचा असला पाहिजे. आणि या तालीम खान्यांत जे शिक्षक असतील त्यांनीं तरूण मुली व मुलें या वर कसरतीचे काय परिणाम होतात याकडे चांगलें लक्ष्य ठवावें कारण वाजवीपेक्षां जास्ती कसरत सुखकारक न होतां अपाय कारक होते. घाई व फार तसदीक होऊं देऊं नये व कसरत व्यवस्थेशीर आणि अशी असावी कीं आपला उद्देश साधावा--म्हणजे सर्व स्नायूंची व अवयवांची शक्ति वाढणें.

तालीम खान्याचा उद्देश काय असावा हें हारवर्ड युनिव्हर सिटीचे डाक्टर सारजंट यांनीं सांगितला आहे तो असा—"कसरत ही मनुष्याच्या आयुष्या मधील एक भाग आहे तर जें कसरतीचें साधन आपण योजूं त्याला अवश्य अशा ज्या गोष्टी त्याकडेही लक्ष्य दिलें पाहिजे. परंतु ज्या अर्थी या साधनानें शक्ति वाढवावयाची आहे त्या अर्थी प्रत्येकाच्या स्थितीला योग्य असलें तेंच असलें पाहिजे. ज्या मनुष्याला आपलें स्वतःचें वजन उचलतां येत नाहीं त्यानें आपल्याला उचलतां येईल अशी वजनें उचलून कसरत करावी. जर तो छाती, हातपाय यांत अशक्त आहे तर त्यानें हीं अवयवें मजबूत होतील अशी कसरत करावी जर त्यानें सर्व साधारण कसरत करून छाती सशक्त करण्याचा प्रयत्न केला तर ते अवयव पुरेसे दृढ न होतां थकून जात जाईल. शरीराचा सारखा विकास व अवयवांची व्यवस्थेशीर कामें व्हावी हा मुख्य उद्देश आहे. तुमच्या उंचीच्या मानानें तुमचें वजन किती आहे हात पायांच्या मानानें छातीची लांबी, रुंदी काय आहे; मस्तकाचे क्षेत्रफळ, बसलों व उभे राहिलों असतां शरीराचा घेर व उंची यांत काय प्रमाणानें फरक आहे! ह्या आणि दुसऱ्या गोष्टी कळल्या म्हणजे प्रत्येक मनुष्याच्या शरीर प्रकृतीला योग्य अशा कसरती सांगणें सोपें आहे" तथापि शरीर शिक्षणाचीच फक्त जरूरी आहे असें समजूं नका. सर्व साधारण निति शिक्षणाचें एक हें अंग आहे असें जर मानलें तर हें फार मौल्यवान आहे. आपण आपल्या मुली व मुलें फक्त विद्वानच करूं इच्छीत नाहीं तर तीं मोठेपणीं चांगली सशक्त व निरोगी रहावी असेंही इच्छितों.

---

इ. स. १८८१ सालीं प्रथम गिरणीचा कायदा सुरू झाला त्या वेळीं जीं कलमें करण्यांत आलीं तीं केवळ त्या वेळीं ज्या अडचणी नजरेस आल्या त्या दूर करण्या पुर्तीच होतीं. आतां जो या कायद्यांत फेरफार होणें इष्ट आहे असें वाटतें तो करणें जरूर आहे असें नऊ वर्षांच्या अनुभवा वरून वाटूं लागलें आहे. इ. सन १८८४ सालीं या विषया संबंधानें विचार करण्या करितां मुंबई सरकारानें एक कमिशन नेमिलें. या कमिशानानें पुढील सालीं गिरण्या संबंधानें साद्यंत हकीकतीचा एक रिपोर्ट तयार करून मुंबई सरकारा कडेस पाठविला इ. स. १८८७ सालीं मुंबईंतील गिरण्याचे इनस्पेक्टर मि. जोन्स यांनीं गिरण्या संबंधाचा एक मुद्दाम रिपोर्ट तयार केला. या संबंधानें पार्लमेंट सभेंतही वेळोवेळीं प्रश्न निघत आहेत. व विलायतेंतील गिरणीचा कायदा इकडेस सुरु करावा अशा विषयीं वाटाघाट चालू आहे. हल्लींच्या कायद्यांत कोणती न्युनता आहे, कारखान्यांचा उत्कर्ष कमी न होता गिरणीतील कामकऱ्यांना सुखावह होतील असें कोणते उपाय योजतां येतील या संबंधानें हिंदुस्थान सरकार, स्थानिक, सरकार व ईतर अधिकारी यांना वारंवार पत्रद्वारें विचारपूस करित आहेत. मि. जोन्स आपल्या विलायतच्या व हिंदुस्थानच्या अनुभवा वरून असें सांगतात कीं देश, लोक, व हवा, पाणी यांच्या भिन्नत्वामुळें विलायतेंतील कायदा हिंदुस्थानांत सुरू करणें रास्त होणार नाहीं. इ. सन १८८९ सालीं मार्च महिन्यांत हिंदुस्थान सरकारा कडून स्टेट सेक्रेटरी कडे जो खलिता गेला त्यांत लाट साहेब म्हणतात कीं:— हिंदुस्थानांत गिरणीतील कामकऱ्यांना जितकें सुख व जेवढा आराम आहे तितके सुख व तेवढा आराम त्यांच्या सारख्या दुसऱ्या मजूरदारांना मिळत नाहीं ही गोष्ट सर्वे मान्य आहे. चढाओढीचें मान इकडचें विलायते पेक्षां कमी असल्या मुळें यंत्रांच्या गतीचा वेग इकडील गिरण्यांत फारच कमी आहे. अशा प्रकारचा वेग विलायतेस खपणार नाहीं. शिवाय असा अजमास आहे कीं विलायतेस ज्या गिरणींत ८०० इसम काम करितात, तशाच एकाद्या इकडल्या गिरणींत १६०० इसम असतात. म्हणजे दुप्पटीचें प्रमाण झालें. इकडले मजूर खेळत खेळत काम करितात त्या मुळें त्यांस विशेषसा थकवा येत नाहीं." या बिला संबंधानें ८ सूचना झाल्या आहेत त्या अशा:—

(१) २० पेक्षां जास्त लोक ज्या कारखान्यांत असतील तेथें हा कायदा लागू करावा. (२) ज्या कारखान्यांत मुलांना चाकरीस ठेवतात तीं वयानें नऊ वर्षांपेक्षां कमी नसावी (३) एका दिवसांत बायकांना अकरा तासा पेक्षां जास्त काम नसावें. (४) कामकऱ्याच्या उपयोगा करितां पाण्याचा मुबलक पुरवठा असावा. (५) बायकांना व मुलांना जेवणा करितां व विश्रांति करितां मधल्या वेळीं बरीच सुट्टी असावी व महिन्यातून निदान चार तरी सुट्या असाव्या (६) कारखान्यातून उत्तम प्रकारची स्वच्छता व खेळती हवा असावी. (७) शरीरास अपकारक अशी वाजवी पेक्षां फाजील दाटी नसावी (८) कायद्यातील हेतु सिद्धीस जाण्या करितां स्थानिक सरकारास कायदे करण्या करितां व तक्के मागविण्या करितां अधिकार असावा.

सामाजिक सुधारणा

समाजाची सुधारणा अमुक मार्गानें करा तमुक मार्गानें करा ह्मणून सुधारकांची ओरडा ओरड नेहमीं चालूच आहे व जरी त्यांच्या आंगांत आपण स्वतः मार्ग काढून लोकांना अनुयायी करून घेण्याची शक्ति आली नाहीं तरी "ह्या मार्गानें जात नसल्यास त्या मार्गानें जा त्या मार्गानें नसल्यास ह्या मार्गानें" असें ह्मणण्यारी व त्याचप्रमाणें सुधारणेचे नवीन नवीन मार्ग शोधून काढण्याची शक्ति अद्याप त्यांच्या आंगांत आहे तशीच कायम आहे ही गोष्ट तरी लहान आहे असें नाहीं. कधीं तरी त्यांच्या आंगाची शक्ति वाढेल व जी गोष्ट ते आज लोकांना करावयास सांगतात तें ती स्वतः करण्यास तयार होतील. स्वतः सुधारणा करवत नाहीं ह्मणून कायद्याची मदत घ्यावी व कसें तरी करून धरून बांधून लोकांना सुधारणा करण्यास लावावें परंतु अशा बळजोरीच्या रीतीनें सुधारणा होईल किंवा नाहीं व झाल्यास ती किती दिवस टिकेल याबद्दल ते चांगलासा विचार करीत नाहींत असें आह्मांस वाटते. विधवा वपनाचा प्रकार फार निंद्य आहे व तो बंद कसा तरी करावा ह्मणून एका गृहस्थानें उदार होऊन असें जाहीर केले आहे कीं स्त्रीचें वपन तिच्या इच्छेविरुद्ध जर कोणी करील तर तिनें फौजदारी कोर्टांत आपली आकृती विद्रूप केली ह्मणून फौजदारी कायद्याप्रमाणें फिर्याद करावी व त्या फिर्यादीचा अगदीं शेवटचे कोर्टांत निकाल होईतोंपर्यंत भांडावें व ह्या भांडणाबद्दल त्या स्त्रीला जो कांहीं खर्च लागेल तो मी स्वतः देईन सदरहू गृहस्थानें जी मदत देण्याचें कबूल केलें आहे ती कांहीं लहान नाहीं व त्याजबद्दल त्यांचे आभार मानणें अगदीं जरूर आहे. परंतु ही खटपट कायदेशीर रीतीनें शेवटास जाईल किंवा नाहीं याचीही पण मोठी शंकाच आहे. नाहीं तर जी म्हणून कोणी बाई धैर्य करून पुढें येईल तिची रखमाबाई प्रमाणें दशा न होवो म्हणजे झालें. त्याचप्रमाणें एका गृहस्थानें अशी एक युक्ति सुचविली आहे कीं आपल्या हातून ही केश वपनाची चाल बंद करण्याची जर स्वतः खटपट होत नाहीं तरी कांहीं हरकत नाहीं. तरी पण न्हावी लोकाना ही सुधारणा कळवून अशा प्रकारचें वपन त्यांच्या सर्वे जातीकडून न करूं देण्याविषयीं खटपट करावी म्हणजे कोणत्याच न्हाव्यांनें स्त्रीचें वपन केलें नाहीं तर अनायासेंच ही निंद्य चाल सहज बंद होईल. जी गोष्ट आपल्या हातून होत नाहीं ती दुसऱ्यास करावयास सांगणें फार सहज आहे. युक्ति सांगण्यास फार सोपी आहे परंतु ती अमलांत आणणाऱ्यास सोपी आहे कीं नाहीं याचा मात्र विचार सोपा नाहीं. बाम्हणा सारख्या विद्वान व सर्वां मध्यें श्रेष्ठ अशा जाती कडून जर ही सुधारणा होत नाहीं तर न्हाव्ही जातीतून ती आज तडीस जाईल किंवा नाहीं ह्या बद्दल मोठाच संशय आहे. तरी पहावें ह्याचा परिणाम कसा होतो तें.

---

क्राफर्ड प्रकरणाचा निकाल झाला तरी त्यापैकीं अद्याप कांहीं बऱ्या वाईट गोष्टींचा विचार चालूच आहे हल्लीं क्राफर्ड साहेबांनीं लार्ड क्रास साहेब हिंदुस्थानचे स्टेट सेक्रेटरी याजकडे आपणास कमिशनर पुढें चौकशी चालूं असतां जो म्हणून खर्च लागला तो सर्व मिळण्याकरितां अर्ज केला आहे व त्या अर्जाप्रमाणें सर्व खर्च सरकारांतून क्राफर्ड साहेबास मिळावा असें लार्ड क्रास साहेबांचें मत आहे व ज्याअर्थी त्यांचेच असें मत्त आहे त्या अर्थी तो खर्च क्राफर्ड साहेबाला मिळेल यांत कांहीं शंका नाहीं आज पुष्कळ दिवसा पासून ही गोष्ट धुमसत आहे परंतु ती अद्याप नाहेर पडली नव्हती. हा अर्ज करण्याचें कारण असें समजतें कीं कमिशन तें सर्व मोठमोठ्या आरोपांचा निकाल क्राफर्ड साहेबांना अनुकुळ असा केला व त्याचप्रमाणें स्टेट सेक्रेटरीचें मत आहे. सबब ह्या चौकशी संबंधानें जो कांहीं काफर्ड साहेबांना खर्च पडला तो अगदीं निष्कारण लागला व तो त्यांस परत मिळणें रास्त आहे. एकंदर लार्ड क्रास साहेबांनीं प्रकरणाचा निकाल ज्या रीतीनें लावला, त्या रीतीनें पाहिलें असतां क्राफर्ड साहेबांस खर्च देणें रास्त आहे इतकेंच नाहींतर त्यांनीं आजपर्यंत सरकारची इमानें इतबारें चाकरी केली याजबद्दल पेनशनही देणें रास्त दिसतें. मुंबई सरकारचें मत कमिशनच्या मताहून भिन्न आहे व कदाचित ते आपल्या अर्जांत कांहीं ढवळाढवळ करतील सबब त्यांच्या कडून तो अर्ज न पाठवितां थेट स्टेट सेक्रेटरीनें पाठविला व तो तेथें मंजूरही झाला आहे. एकून नशीब अनुकूळ असलें म्हणजे कसें होतें तें बघा!

---

अविचारामुळें व अज्ञाना मुळें कसे भयंकर परिणाम होत असतात हें पुढील हकीकती वरून सहज समजून येईल.

पुण्यास असणाऱ्या मुंबई प्रांतातील १० पलटणीतील एक शिपाई गांवांतील एका स्त्रीशी लागू असल्या मुळें ता. २५ माहे फेब्रुवारी रोजी संध्या काळीं पाच वाजता आपल्या निय मित्राच्या प्रेम पाशांच्या तडाक्यांत सांपडल्या मुळें हजिरीच्या वेळेस मामुली प्रमाणें हजर राहण्याचे विसरला. त्या वरून सुभेदार साहेब त्याचा शोध करण्यास घरी गेले. तो शिपाई बोवा आपल्या मित्रासह त्यांच्या दृष्टीस पडले तर सुभेदार साहेबांनीं त्याला न रागवता थोडासा उपदेश केला. तों त्या शिपायाला एकाएकी त्वेश येऊन त्यानें त्या सुभेदारावर गोळी सोडली. परंतु सुदैवानें ती चुकली. व लागलीच त्या स्त्रीच्या अंगावर एक बार सोडली त्या मुळें गोळी तीस खांद्याच्या ठिकाणीं लागून अगदी बेमार आहे कदाचित वाचेल किंवा नाहीं याचा संशय आहे. येणें प्रमाणें तो गृहस्थ अगदी वेड्या सारखा होऊन अंनावर झाला व लागलीच त्यानें आपल्या पलटणीतील दोन तीन मनुष्यावर गोळी चालविली व शेवटीं आपण प्राणास मुकला तो काय त्याची गोळी त्याला लागली म्हणून मरण पावला किंवा दुसऱ्यानें कोणी त्याला मारलें हें कांहीं पक्कें समजलें नाहीं पहा थोड्याशा गोष्टींच्या अविचारानें काय परिणाम झाला तो.

---

# The Berar Samachar

MONDAY MARCH 3, 1890.

## OURSELVES

*We request our subscribers will allow us the usual Shimga Holidays which they have hitherto done ungrudgingly. As our office will be closed for the holidays there will be no paper issued next week.*

## SIGNS OF THE TIMES.

Last time we referred to the predominant desire of the people to some how or other ameliorate this condition both politically and socially. This time we refer again to the same subject from another stand point. Last week there

...ore meetings held at Amraoti in connection with the eloqution gatherings for the whole province of Berar. The subjects appointed for the occasion were of a character that is surely an index of another sign of the times. The subjects more or less were of one type and their object was one looked at from different stand points. The theme of the whole was how to seek worldly happiness. Seeking after worldly happiness is another sign of the times. Every soul especially boasting himself to be reckoned as an educated man, longs for happiness and pleasurable sensations. The honorary speakers messers Khaperday, Jog and Joshi sang the same time. Each and all seemed to be anxious to hear from the mouths of the speakers the means of securing pleasurable sensations. There was a very learned discourse on the first subject. How to secure happiness, but that speaker was now and then warned that he was fleeing away from his proper subject viz how to secure pleasurable sensations. Even the orthodox seemed to join in giving the warning. The speaker Mr. Padhye very properly said that if people did not seek worldly happiness with that eagerness which is found in grossly sensual people, these very world ly pleasures would seek them.

The learned honorary speakers of whom better things were expected appeared rather vulgar even in their expressions of language. Instead of import ing higher notions of self sacrifice for the public weal they ridiculed the teachings of such reversed men as Gautam Budha and others holding the same position. Modern teachers such as Bacon and Descorte were fleeing away in order to make room for charvaks Epicureons and gross materialists of modern Europe. The higher notions of morality and polity were considered to be of no service in present times when all of us, the speakers taught must seek to secure as much worldly happiness individually as possible. If this be a fact, that by education we have arrived at a stage of thought when all that is noble and glorious in ancient times is disregarded, miserable is the outcome to the country at large, for we shall be grossly material and lose touch with that which is fine and high and lose all notions of self sacrifice. Better it is suffer for others than be happy ourselves in this world. Then we shall do service both to God and Country and earn high reward in life hereafter.

SOME REFLECTIONS ON REPRESENTATIVE GOVERNMENT.

( Communicated )

( Continued from our last issue )

Learning this partial digression I proceed with my subject directly. There are two conflicting theories with regard to the nature of government one class of political philosphers think that government is a human contrivance, a mere machine, invented to serve certain preconceived ends. Governments can be made and unmade. They look upon government as a problem to be worked like any other question of business. The other theory is that government is not a machine but a natural organism, a spontaneous growth growing out of the nature and life of a people; it is a product of their habits instincts, unconscious wants and desires, government are not made but grow. They are not a matter of choice. Man must take them as he finds them. His business is simply to acquaint himself with their nature and to adopt himself to it.

Both of these views are not correct when held exclusively. They are both partially true. We must try to get at the amount of truth which exists in either.

We must bear in mind that political institutions are the work of men. They owe their origin and existence to the human will. Man did not find these actually existing like all works of men, therefore these can be well or ill made. And a people to whom it was not possible to find out a good institution for themselves, may adopt one which has been found good for others. But we must remember, at the same time, that such borrowed institutions will not work of themselves. The process is not complete by the mere adoption of them. Political machinery requires the active participation of a people and must be admitted to the capacities and qualities of such men as are available. There are three conditions necessary for the existence of a government. In the first place the people for whom it is intended must be willing to accept it or at least not so unwilling as to oppose it. In the second place, they must be willing to do what is requisite for its preservation. And in the third place, they must be able to do those things which will enable it to achieve its best results. If these conditions are not fulfilled, that form of governmet becomes unsuitable to that particular people. A particular form of government can not exist if the people are unwilling to accept it. *i. e.* A rude tribe will not submit to the restraints of a civilised government secondly, a people may prefer a government but may be unable to fulfil the conditions of its continuance. *i. e.* A free government, where the people are cowardly careless indolent, and have no public spirit is impossible. In the case of a rude people, whose passions are violent or in the case of a people who will not actively cooperate with the laws and the public authorities government must needs have sterner powers of control than elsewhere Representative institutions, where the electors do not understand their responsibilities and vote in any other but public grounds, by selling their votes for money or for the purpose of pleasing some body, become mere instruments of tyranny and intrigue. Within these three conditions, a government is a matter of choice. Al tnat we are told about the necessity of a historical basis or of their being in harmony with the national usages and character of a people means this much or nothing to the purpose of course, it is quite true that an institution will prosper if the way is prepared for it by the natural habits and instincts of a people and a legislator, if he is wise, will take advantage when possible of such habits in shaping his measures. But it by no means follows that what is merely a help and a facility should be regarded as a necessary conditions. No doubt a a people will be persuaded to do much more easily what they are used to do. But they may also be taught to do new things. In many cases to kindle a desire for good institutions and set before them its advantages is a successful mode of making the people accept those and work them with efficiency. Only the desire must not be kindled too much in advance of the capacity. Sometimes an objection is raised that the choice of government is impossible the form government is naturally determined by the circumstances of the country in accordence with the distribution of the elements of social power. The strongest power in the country will obtain the governing authority. There is some truth in this doctrine. But we may ask what is the meaning of power? Not mere physical power otherewise pure democracy will be the only possible from of government not even physical power combined with riches and intelligence constitute the governing body. for a much weaker party having the advantages of organisation may govern a majority their superiors in physical and economical strength no doubt such governments are in unstable egrulibrum and may be subverted by a slight disturbance.

We must bear in mind that, political by speaking, much of the power consists in will whatever affects will therefore must not be left out of account. Opinion is one of the greatest of active social forces. A when the people are persuaded that a particular institution is good it is a great help or their adopting it. Although the opinions of average persons are formed by their positions they may be acted on by the opinions of persons in different position and by the collective force of the opinions of the instructed among them. And new institutions may be introduced in a people by means of a change in their opinions thus produced.

2nd. Having shewn that a form of Government is a matter of choice within certain conditions let us see by what criterion we are to determine the character of a Government or a set of political institutions. In other words when should we say that a form of Govt. is good. It would appear at first sight that we should decide beforehand the proper functions of a Govt. and then that form which fulfills them most satisfactorily is to be the best form of Govt. But the influence of Govt. on the community is far reaching. Although the good that it can do is limited by the character of its constitution the evil which it can inflict by direct and indirect meddlings, has no limits. Therefore the influence of Government on the community must be measured by no less an object than the whole mass of interests of that community. If we can but classify such a complex object as the interests of the community under certain definite heads, our task of finding a criterion of good Govt. is very easy.

( To be continued )

पोंच.— वरुड ता० पाटीलपांडे पत्र पावलें स्थळ संकोचास्तव पुढील खेपेस घेऊं.

## वऱ्हाड

सूचना——दरसालाप्रमाणें हुताशनि निमत्त पुढील अंक बंद राहील.

वऱ्हाड हायस्कूल समाज ये या गुरुवारीं व शुक्रवारीं भरेल.

मि. हैदरअली अल्याची यांची बदली दर्यापुरास झाली.

भयंकर आग—ता. २३ फेब्रुवारी उत्तर रात्रीं उमरावती येथील सराफ बाजारचे कोपऱ्यावरील एका किराण्याचे दुकानास आग लागून पाच सहा दुकानें जळून खांक झाली. दुकानांत कापूर, नारळ व असाच पेट घेणारा माल फार होता. रॉकआईलच्या दिव्याचा हा सर्व प्रताप आहे असें कळतें.

## जाहीरात

नमुना नंबर १४१

दिवाणी कोर्टास सूचना.

अज्ञानाच्या मालमिळकतीच्या वहिवाटीचें सरटीफिकीट मिळण्या विषयीं अथवा अज्ञानाचें पालन व त्याच्या माल मिळकतीचा कबजा करण्या लायक मनुष्य नेमण्याविषयीं सन १८५८ चा आक्ट ४० कलम६ प्रमाणें

अर्जीचा नंबर कि. क्लास नंबर १९ मि. नंबर१९ सन. १८८९

स्पे. अ. क. साहेब जिल्हा अकोलें यांचे कोर्टांत

अर्जदार मारोती. बापाचे नांव चिमणाजी जात कुणबी राहणार शिवणी तालुके अकोलें.

वरील अज्ञानाचे नांव मारोती वल्द चिमणाजी जात कुणबी राहणार शिवणी तालुके अकोला जिल्हा अकोला यानें त्याचें पालन व मालमिळकतीचा कबज्या करण्या लायक मनुष्य नेमला जावा म्हणून अर्ज दिला आहे यास्तव मृत्युपत्राचे आधारें किंवा दस्तैवजा वरून किंवा अगदी जवळचे नातलग पणाचे कारणा वरून किंवा इतर प्रकारें ज्या कोणी मनुष्यास सदर्हु अज्ञानाचें मालमिळकतीवर संभाळ कर्ता या नात्यानें कबजा करण्याचा हक्क सांगावयाचा असेल त्या सर्वांस या लेखानें कळविण्यांत येत आहे कीं त्यांनीं तारीख २९ माहे मार्च सन १८९० इ० रोजीं वरील अर्जाची चौकशी होणार आहे ते वेळीं ह्या कोर्टांत हजर होऊन आपल्या हकीकती दाखल करावी.

तारीख २७ माहे फेब्रुवारी सन १८९०

C. W. Davies.

स्पे० अ० कमिशनर

## जाहीरात.

नमुना नंबर १४३.

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्याचें कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें म्हणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहिरात.

सन १८६३चा आक्ट २७ कलम ३ प्रमाणें. मि. क्लास नंबर १९ मि. नंबर १ १८९०.

स्पे० अ० कमिशनर साहेब जिल्हा अकोला यांचे कोर्टांत.

नांव रुबाई मर्द भिवसन राहणार गुडधी तालुके अकोला जिल्हा अकोला. यांस मयत भीवसन बापाचें नाव नारायण राहणार. गुडधी तालुके अकोला जिल्हा अकोला यांचे कर्ज वसूल करितां येण्या साठीं सरटीफिकीट मिळावें म्हणून सदरहु अर्जदार यानें अर्ज केला आहे त्याज करितां सदर्हु मयत मनुष्याचे या मिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे म्हणून ज्या मनुष्यांचा दावा असेल त्यास जाहीरातीच्या द्वारें कळविण्यांत येतें आहे कीं त्यांनें तारीख २९ माहे फेब्रुवारी सन १८९० इ० रोजी सद्दर्हु अर्जाची चौकशी होईल त्या वेळीं या कोर्टात हजर होऊन आपापलें हक्का विषयीं लेखी हकीकत दाखल करावी. तारीख २८ माहे फेब्रुवारी सन १८९० इ०

C W. Davies

स्पे० अ० कमिशनर.

## वर्तमानसार.

वकील साहेबानीं आपल्या गांवातील एका वेड्यास विचारलें 'कायरे! ह्या जगांत अपूर्व अशा दोन वस्तू कोणत्या! 'महाराज!' प्रामाणिक वकील व विराव अणी पाणी ह्यांचे सरूप!'

नेहमीं फत्ते पावणाराचा आपण विजयी आहोंत हें लोकांच्या मनातून नाहींसें करण्यात हटकून पराजय होतो!

जिव्हा हें स्त्रीयाचे मोठें तीक्ष्ण हत्यार आहे. ह्याचा उपयोग त्यांनीं स्वसंरक्षणा पुरता अगदीं नाईलाज झाला तरच करावा. परंतु ह्याच हत्यारास दयचें पाणी दिल्यावर त्याचा लोणी कापण्या कडे सुद्धा उपयोग होणें नाहीं.

प्रत्येक मनुष्यास आपलें मत पाहिजे तेव्हां देतां येतें परंतु वकीलास तसें करितां येत नाहीं कारण त्यांचें मत विकलेलें असतें.

खुद

इतर सुधारलेले देश उत्पन्नाच्या मानानें प्रजा शिक्षणाकडे खर्च करितात तसा हिंदुस्थान सरकार करीत नाहीं अमुक पासून अमुक वयाच्या आंत आई बापांनीं मुलें शाळेंत घातलीं पाहिजेत, न घातलीं तर आई बापांस शिक्षा होईल असे युरोपांतल्या सुधारलेल्या देशांनीं कायदे केले आहेत. तसें कायदे हिंदुस्थानांत सरकार करीत नाहीं. सुधारलेल्या देशांत प्रजेस मोफत शिक्षण देण्याची, धंदे शिक्षण देण्याची जशी सोय केली आहे तशी हिंदुस्थानांत करण्याचे सोडून जबर फीच्या रूपानें सरकार प्राथमिक शिक्षण ही महाग करीत चालले आहे लोकांची, नाहीं खुद्द विलायतेंची पद्धत पाहू तरी सरकारानें आपल्या कर्तव्यास जागृत व्हावें हें योग्य आहे. पण सरकार परकें, राज्य कारभारांत लोक मताचा रिवाव नाहीं, म्हणून प्रजेची अशी अबळ होत आहे.

मद्रासची प्रचंड सभा.— कायदे कौन्सिलच्या सुधारणे संबंधानें पार्लमेंटास अर्ज करण्यासाठीं मद्रासेस फार मोठी सभा भरली होती. १० हजारां पेक्षां जास्त लोक ह्या सभेस आले होते. ह्या सभेच्या संबंधानें लोकांस इतका उल्हास होता कीं त्या दिवशीं एकंदर नेटिव लोकांनीं आपापलीं दुकानें व बाजार बंद ठेविले होते. ठाऊन हालांत लोकांचा समावेश होईना म्हणून सहा ठिकाणीं वेगवेगळ्या सभा केल्या होत्या आजपर्यंत एवढा समाज कधीं ही जमला नव्हता या वरून राष्ट्रीय कामाच्या संबंधानें मद्रासी लोकांस इतर इलाख्या पेक्षां अत्यंत कळकळ आहे असें उघड दिसतें सहा ठिकाणी भाषणें होऊन अर्जाचा नमुना कायम करण्याचा व राष्ट्रीय फंड जमविण्याचा असे दोन्ही ठराव सर्वानुमतें कायम करण्यांत आले. आमच्या मद्रासी लोकांचा कित्ता इतर लोकांनीं घ्यावा अशी आमची प्रार्थना आहे. मद्रास हा मागस लेला प्रांत असतां राष्ट्रीय कामांत तो सर्वांच्या पुढें गेला यांत संशय नाहीं.

मळणीचें यंत्र भाताची मळणी करून तें सडून तांदुळ करण्याचे एक यंत्र तंजावर प्रांतांतल्या एका कंपनीनें आणिलें आहे हें वाफेनें चालणार. मद्रासेकडे भात हेंच मुख्य धान्य आहे ह्या देशांत ही नवीन टूम आहे.

नेटिवास मोठी जागा—बाबू उमाचरण मुकरजी यांस फिन्यान्स आणि कामर्सखात्याचे रजिस्ट्रार नेमिलें. एवढी मोठी जागा नेटिवांस आजपर्यंत कधीं ही मिळाली नाहीं.

एडिटरास शिक्षा—"दिल्लीपंच" पत्राच्या एडिटरानें फरीद कोटच्या राजाबद्दल बदनामी मजकूर लिहिल्याबद्दल त्याजवर खटला चालून त्यास १००० रुपये दंडाची शिक्षा झाली तीवर त्यानें अपील केलें आहे.

१८९१ सालच्या खानेसुमारीचें काम शेवटास लागण्यास पूर्ण तीन वर्षे लागतील.

प्राण्यांचें जगण्याचें प्रमाण— अस्वल कचित २० वर्षे, कासव १०७ वर्षे, खार आणि मासा ७।८ वर्षें, कुत्रा २० वर्षे, तितकाच लांडगा, खोकड १४-१६ वर्षे, हत्ती ४०० वर्ष, मेंढरू पराकाष्टा १० वर्ष, गाय १९ वर्षे उंट कधींकधीं १०० वर्षे, राजहंस २०० वर्षे, देवमासा १००० वर्षे, डुक्कर ३० वर्षं, घोडा २०-३० वर्षे आणि गेंडा ३० वर्षे वाचतो. असें प्राणीशास्त्रवेत्यानीं निदान ठरविले आहे.

सरकारचा ठराव मक्त्याच्या अगर दुसऱ्या अशाच कारणानें मक्तेदार इंजिनेरखात्यातील कामगारास जे करार लिहून देतील त्यांस स्टांपाची माफी आहे, असें हिंदुस्थान सरकारानें ठरविले आहे. शु० सू०

ठराव— वतनदार लोकांनीं आपले वतनी जमिनीतील झाडें तोडूं नये ह्मणून जी सरकारानें मनाई केली होती, ती सागवान व चंदनाचे झाडा पुरती मात्र कायम राखून बाकी झाडाबद्दल मोकळीक दिली.

मुंबई इलाख्यांत पावणे दोन लक्ष भिकार आहे.

इंग्लंडच्या वसाहतींचें क्षेत्रफळ ८४ लक्ष चौरसमैल झालें.

इंग्लंडांत दरवर्षीस २५ कोट रुपयांचे नुस्ते बटाटे तयार होतात.

अवरंगाबादेस एक नवीन कलाकुशलतेची शाळा सुरू झाली.

बंगाल्यांत गेले सालांत नुसत्या इनकम ट्याक्साचें उत्पन्न ३९००००० रुपये झाले.

दिल्लीचे किल्याचे रक्षणार्थ आजवर दोन कंपन्या होत्या तेथें ४ ठेवण्याचा हुकूम झाला.

बंगाल नागपूर रेल्वेची लाइन विलासपूर पासून रायगडपर्यंत बांधण्याची परवानगी देण्यांत आली.

राष्ट्रीय सभेचे अभिमानी मि० बाबू सुरेंद्रनाथ बानरजी हे पुढील महिन्यांत काँग्रेस संबंधानें विलायतेस जाणार.

महाराज होळकर यांनीं दीड लाख रुपयांची परवानगी देऊन आपले राज्यांत धर्मशाळा, मुलीसाठीं शाळागृह, व अनाथलये नवीन करण्याचा हुकूम दिला म० मि०

टोरांटो येथील एक विश्वविद्यालय अग्नीनें जळून गेल्याचें लं. ता. १६ च्या तारेवरून समजतें. नुकसान सुमारें १३ लक्ष रुपयाचे झालें असें समजतें.

आंधळ्यासाठीं एका स्विस मनुष्यानें एक नवीन प्रकारचे घड्याळ शोधून काढलें आहे त्यावर आकड्याच्या ठिकाणीं खुंट्यांची योजना करून किती वाजले हे त्याना ताबडतोब सांगता येतें.

क्रीटकडे एक रशियन लढाऊ जहाज पाठवण्याचा हुकूम झाला आहे.

सेंटपिटर्सबर्ग येथें महामारीची साथ आली आहे असे लंडनच्या ता० १७ च्या तारेवरून समजतें.

क्यापटन हीरसे यांनीं पायोनियर पत्रावरून अब्रुनुकसानीची फिर्याद केली होती तिचा निकाल होऊन पायोनिअरच्या कर्त्यास ३००० रु० दंड झाला.

इंग्लंड ऐरलंड व स्काटलंड येथील १,२०,०००,०० मजूरदार प्रतिवर्षी १२५,००००००० रु० किंमतीचें काम करतात ह्मणजे सुमारें प्रत्येकी १००० रुपयांचे प्रतिवर्षी काम करतात परंतु इतके रुपये त्यांच्या पदरी पडत नाहींत. फक्त एक त्रितियांश मात्र पडतो. यासाठीं जागोजाग त्याची खटपट चालली आहे.

काश्मीरच्या संबंधानें खोट्या दस्तावेजा बद्दल राजे अमरसिंग यांनीं हजारीपलवर केलेली फिर्याद कमिशनपुढें काल चालणार होती. रायभेगराम यांस कमिशनर नेमलें आहे. सु० प०

नौकरींत ठेविले:— क्राफर्ड प्रकरणांतील यादवराव कृष्ण माटे व चिंतामणराव गाडगीळ यांस नौकरींत ठेवावें असें ठरलें.

पनामा कालव्या संबंधानें जी सोडत निघाली होती तिचे २०००० पौंडाचें बक्षीस एका कोळ्याधिशास मिळालें. यानें सोडतीचें एकच टिकिट सहज गमती खातर घेतलें होतें पैशाकडे पैसा जातो.

वऱ्हाड प्रांत इंग्रज सरकारानें तोंडांत टाकल्या बद्दलचा प्रश्न निजाम सरकार लवकरच पुन्हा काढणार आहेत. मि. सेमुरके हैदराबादेस जाऊन आल्याचा हा परिणाम असावा.

समरकंद येथें लवकरच एक रशियन वर्तमानपत्र निघूं लागणार आहे ही बातमी पुष्कळ इंग्रजास अप्रिय झाली आहे.

पार्लमेंटकडे व महाराणीकडे हिंदुस्थानांतून कोणास पोष्टांतून अर्ज पाठवावयाचे असतील तर त्यांस टपाल हाशील मुळींच पडणार नाहीं. या संबंधानें मि. ह्यूम राष्ट्रीय सभेचे सेक्रेटरी यांनीं दाद लावून असा ठराव करविला.

अफुचा अर्क शरिराला अति बारीक छिद्र पाडून आंत सोडिला ह्मणजे कैफ येतो. बाटल्यावर बाटल्या झोंकण्याच्या त्रासापेक्षां ही सुलभ युक्ती निघाली आहे.

पुरलेलें गवत— हिरवे ओलें गवत फार दिवस पुरून ठेविल्यास तें जशाच्या तसें राहून गुरें मोठ्या आवडीनें खातात ह्याची प्रचिती साहाराणपूर येथें सरकारी कामदारांच्या कमेटीनें घेतली. तेथें एक हिरव्या गवताचा गठ्ठा ३ वर्षें पर्यंत जमिनींत पुरून टाकिला होता, तो काढून पाहतां गवत ताज्या सारखें दिसतें असून बैलांनीं ही तें फार आवडीनें खाल्लें. जा युक्ति पहावा तो अगाद !! न्या० सिं०

—०:—

सुखानें काळ क्रमण होण्यास उपाय— सुग्रास अन्न एकदांच खा, परंतु कृती चांगली सदोदीत असूं द्या!

## जाहीरात

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं अकोलें म्युनसिपाल कमटीचे हद्दीतील बाजार कर वसूल करण्याचे हक्कांचा, स्लाटर हाऊसचा कमेटीचे हद्दीतील कचरा वाहून नेण्याचा, स्टेशन जवळील धर्मशाळेचा सन १८९०।९१ सालाकरितां लीलाव तारीख २४-३-९० रोजी सकाळीं ७॥ वाजतां टौनहालांत होणार आहे ज्यांस घेण्याविषयीं इच्छा असेल त्यांनीं सदरहु तारखेस हजर राहण्याची तजवीज करावी कळावें तारीख २२ माहे फेब्रुवारी सन १८९० इ०

Krishanaji Mulbar.
Secretary
Akola

## जाहीरात

ता. १९ माहे ज्यानेवारी सन १८९० इ० रोजीं अकोलें येथें जमेदार लोकांची सभा भरली होती. त्यांत वऱ्हाडच्या सर्व जमेदार लोकां करितां एक सभा स्थापन करणें इष्ट आहे असें ठरलें आहे. परंतु त्यां संबंधानें सर्वांचे मत घेण्या करितां पुनः जाहिरसभा भरवावी असें ठरल्या प्रमाणें वऱ्हाडचे जमेदार लोकांची जाहिरसभा रवीवार तारीख २३ मार्च सन १८९० रोजीं अकोलें येथें भरणार आहे. व त्या संबंधानें निमंत्रण चिठ्ठ्या प्रत्येक तालुक्यांत सर्वांना पावत्या करण्या करितां पाठविल्या आहेत. तरी नजर चुकीनें किंवा इतर कारणामुळें जर एकाद्या जमेदारास चीठ्ठी पोचली नाहीं तर त्यास आमची सविनय अशीं प्रार्थना आहे कीं त्यांनीं आपणास बोलावणें नाहीं असें समजूं नये. व समाजास अगत्य येण्याचें करावें. व आपल्याच्यानें होईल ती मदत समाजास द्यावी कळावें हे विनंती

अकोलें ता. ११-२-९० — गोविंद विश्वनाथ देशपांडे सभेचे सेक्रेटरी.

## जाहीरात.

खाली सही करणार याज कडून कळविण्यात येते की दाऱ्व्हा तालुका मजकूर येथें माझे घरी शेख अबदुल वलद शेख मिरज याचा बाप ( मिरज ) अज्ञानपणी मेल्यामुळें त्याचे पालण मी जाती धर्मा प्रमाणें केलें हल्ली वयांत आल्यामुळें तो माझे लायकीवर कर्जाऊ रुपये वगैरे आपले नांवे वटेल तेथून आणित असें यास्तव जाहीर केले जातें कीं यांस कर्जाऊ पैसा अगर दुसरे रीतीनें कांहीं लेख करून जो कोणी पैसा देईल याजबद्दल मी किंवा माझे वारस जाबदार कोणतेही प्रकारें होणार नाहीं कळावें. तारीख २२। २। ९० इ.

सही
शेख बाबन वलद शेखलाल याचे हातची कल्यार.

## पाक.

सालंमीश्री पाक घेतला असतां धातुची मजबुती होऊन शक्ती वाढते दर दिवस ३ तोळे प्रमाणें ४५ दिवस घ्या.

बदाम पाक घेतला असता, मस्तकांतील उष्णता दूर होते डोळ्यास थंडावा येतो धातु पुष्ट होते व शक्ति येते दरदिवस २ तोळे प्रमाणें ३० दिवस घ्या.

गोखरूचा पाक घेतला असतां मूत्र मार्गांत होणारी आग, तिडका, जुनापरमा, मेहरोग मूत्र पुष्कळ आणि गढूळ होते तो तो, हे रोग दूर होऊन धातु शुद्ध होते बळ येते स्त्रीसंगाची इच्छा होते दर दिवस ३ तोळे प्रमाणें ६० दिवस घ्या.

कोहळे फळाचा पाक घेतला असतां डोळ्यास येणारी अंधारी भोवळ पित्ताचे उपद्रव हे रोग दूर होऊन रक्त शुद्ध होते धातु पुष्ट होते बळ येतें दरदिवस ३ तोळे प्रमाणें ४५ दिवस घ्या.

वर लिहिलेले पाक मागविण्याची रीत

| तोळे | किंमत रुपये | पोष्टेज |
|---|---|---|
| १६ | १ | ०९ |
| ३२ | २ | ०१३ |
| ४८ | ३ | ०१३ |
| ६४ | ४ | १०१ |
| ८० एकशेर | ५ | पोष्टेज माफ. |

पत्ता गजानन बाळकृष्ण वैशंपायन पेठ सदाशिव पुणें.—

☞ हें पत्र अकोला येथें कै. वासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

वर्षाची अगाऊ रु० ५ डांक हाशील ०।३
सहामाही " ३ " ०८
सालअखेर " ७ " १०८
किरकोळ अंकास........................०४

नोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस .........०१

per annum in advance 5 Postage 13 as
Per annum in arrears 7 "1Rs. 8 as
Six monthly............3 " 8 as
Single copy...............................4as

Advertisements
Below 10 lines... 2Rs
per line over10...4 as
Repetition per line3as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XXIV | AKOLA MONDAY 17 MARCH 1890 | NO 10

वर्ष २४ | अकोला सोमवार तारीख १७ माहे मार्च सन १८९० इ० | अंक १०

## पुण्यातील वक्तृत्वोत्तेजक मंडळी.

सन १८९०.९१ सालचा भाषण समारंभ

पुण्यांतील वक्तृत्वोत्तेजक मंडळीचा चालूं सालचा भाषण समारंभ तारीख ३ माहे मे शनवार सन १८९० पासून सुरू होईल विषय व बक्षिसे खालीं लिहिल्याप्रमाणें ठेविलीं आहेत.

विषय.

१ ला. पार्लमेंट सभेपुढें ब्राडला साहेब याणीं इंडिया कौन्सिलाबद्दल कायद्याचा मसुदा वाचल्यानंतर हिंदुस्थानांतून आलेल्या डेलिगेटांनीं आपले विचार प्रदर्शित करावे अशी पार्लमेंटानें आपली इच्छा दर्शविली अशी कल्पना करून वक्त्यानें आपण हिंदुस्थान वासी जनांचे डेलिगेट आहों असें समजून कौन्सिलच्या सुधारणेबद्दल हिंदुस्थानांतील लोकांचे काय विचार आहेत व त्यांचें ह्मणणें पार्लमेंटानें कां कबूल करावें याविषयीं भाषण करावें.

२ रा. हल्लीं आम्ही स्त्रियांस कोणत्या रीतीनें वागवितों, त्यांच्याशीं योग्य वागणूक होण्यास आपल्या वर्तनांत कांहीं फरक झाले. पाहिजेत किंवा कसे? हल्लीच्या वागणुकींत स्त्रियांवर सक्ती होत असल्यास ती कोणत्या बाबतींत होत आहे. ती कोणत्या उपायांनीं नाहींशी करतां येईल. ते उपाय सांगणें व स्त्रीपाशीं योग्य वागणूक ठेवण्या विषयीं उपदेश करणें.

३ रा. अभंग, माडगांवकृत गाथा अभंग ३४९८.

पवित्र ते कूळ पावन तो देश,॥
जेथें हरिचे दास घेती जन्म॥१॥
कर्मधर्म त्याचे झाला नारायण॥
त्याचेनी पावन तिन्ही लोक॥२॥
वर्ण अभिमानें कोण जाले पावन॥
ऐसे द्या सांगून मजपाशीं॥३॥
अत्यंजादि योनि तरल्या हरिभजनें॥
तयाची पुराणें भाट झाली॥४॥
\+ \+ \+ ×
यात यातीधर्म नाहीं विष्णुदासा
निर्णय हा ऐसा वेदशास्त्री ॥११॥
तुका ह्मणे तुह्मी विचारावे ग्रंथ॥
तारिले पतीत नेणो किती ॥ १२ ॥

४ था.— अयत्या वेळचा

या चारी विषयांवर भाषण करणारांनीं कोणत्याही व्यक्तीस प्रत्यक्ष व परोक्ष रीतीनें अनुलक्षून बोलूं नये.

बक्षिसें व गुण

वरील चार विषयांतून इच्छेस येईल तो (एकच) विषय घ्यावा पहिल्या विषयांस ४० रुपयांचे एक व दुसरे रु. २० चे कैलासवासी रावबहादुर नानाशास्त्री आपटे यांचे; व दुसरे विषयास रु० ४० चे एक व दुसरें रु० १५ चे तिसऱ्या विषयास मंळळीच्या फंडापैकीं रु. १५ व कैलासवासी रावबहादुर विष्णु परशराम रानडे यांचे स्मारक फंडापैकीं रु. २५ एकूण रु. ४० चे एक व दुसरे रु. २० च श्री० कै० यशवंतराव गोपाळराव भैराळ यांचे नावचे आयत्या वेळचे विषयास बक्षीस रु० ४० चे एकच आहे. आयत्या वेळचे विषय समारंभाचे पहिले दिवशी कळविण्यांत येतील बक्षीस मिळण्यास १०० गुणातून निदान ५० गुण आले पाहिजेत.

पहिले विषयात पहिले बक्षीस मिळविणारानें जर करितां शेकडा ७० गुणापेक्षां जास्त मिळविले तर त्यास पहिले बक्षीस रु ४० चे आहे त्या ठिकाणीं रु. ५० चें बक्षीस मिळेल.

उमेदवारांच्या समजुती साठीं सूचना.

प्रत्येक भाषणास अर्धा तास दिला जाईल, परंतु अवश्य वाटल्यास ती वेळ कमी अथवा जास्त करण्याला अधिकार परीक्षकांस आहे भाषणात विषयाची जुळणी त्यांचे प्रतिपादन, श्रोत्यांच्या मनांत उतरून देण्याची शैली या गुणांकडे विशेष लक्ष दिले जाईल. परीक्षक ज्यांचीं भाषणें पसंत करतील त्या उमेद वारांनीं त्याणे केलेल्या भाषणाचा लेखी गोषवारा चिटणीसास आणून दिला पाहिजे पहिल्या तीन विषयांवरील भाषण करणाराचे वय १८ वर्षांपेक्षां कमी नसावें. व चवथ्या विषयावर भाषण करणाऱ्या उमेद वाराचे वय २२ वर्षां पेक्षां कमी नसावें.

२ भाषण करण्यास येऊं इच्छिणाऱ्या उमवारानें एक रुपया आपल्या अर्जा सोबत पाठवावा. ज्याचा रुपया येणार नाहीं, त्याचा अर्ज घेतला जाणार नाहीं सेक्रेटरी ज्या दिवशीं व ज्या वेळेस उमेदवारानें घेतलेल्या विषयावर भाषण करण्यास सांगतील त्या दिवशीं व त्या वेळेस उमेदवारांनीं हजर असून भाषण करण्यास उभे राहिले पाहिजे. असे उमेदवार जरी पास झाले नाहींत किंवा त्यांचीं भाषणें मंडळीनीं समग्र ऐकून न घेतल्या मुळें त्यांस आपलें भाषण थांबवून जरी परत जावे लागले, तरी त्यांचा रुपया परत दिला जाईल. वरलिहिल्या प्रमाणें सेक्रेटरी सांगतील त्या वेळी उमेदवार हजर नसतील किंवा हजर असून भाषण करण्यास येणार नाहींत, तर त्यांचा रुपया परत दिला जाणार नाहीं, व गैरहजर असलेल्या उमेदवारांचा मागाहून भाषण करण्याचा हक्क राहणर नाहीं.

अर्ज ता० २५ एप्रील सन १८९० चे आंत खाली सही करणारांचे नांवें 'रेठऱ्युरवार कोतवाल चावडी नजीक नेटिव जनरल लायब्ररी" ह्या पत्त्यावर पाठवावें त्यांत प्रत्येक उमदवारानें आपले नांव, बापाचे नांव आडनांव, धंदा, पता व गांवाचें नांव आणि त्यानें घेतलेला विषय अशी स्पष्ट लिहावा. नाटपेडपत्र घेतलें जाणार नाहीं उमेदवारांनीं भाषण समारंभाचे अगोदर एक दिवस चिटणिसांस येऊन भेटावे व जे न भेटतील ते भाषण करण्यास येत नाहींत, असें समजून व्यवस्था करण्यांत येईल.

ता० ५।२।९० इ०

वामनराव विष्णु लेले,
कृष्णराव बापूजी मांडे
पुण्यांतील व० मंडळीचे चिटणीस

## पत्रव्यवहार

ह्या सदरा खालील मजकूर पत्र कर्त्यांच्या मतास मिळूनच असेल असे समजूं नये.

वऱ्हाडसमाचार यास विनंती कीं या पत्रीं जागा खालीं लिहिल्याप्रमाणें मजकूर छापून प्रसिद्ध करतील ही उमेद जाणून कळवितो तें जिल्हा अकोला येथें जमीदारी सभा स्थापन झाली हे ऐकून मनास फार फार आनंद उत्पन्न झाला व त्याजबद्दल वर्गणी जमा होणें सुरू आहे व पुढें तारीख २३ माहे मार्च सन १८९० इसवी रोजीं सर्वांचें मत घेण्या करितां सभा भरणार आहे.

या सभेंत फक्त देशमुख देशपांडेच असावेत. दुसरे ह्मणजे ज्याचे अंगी देशमुख व देशपांडेपणा नसोन लवाजम्यांत नांव नाहीं नुसती पटोलकी किंवा पांडेपणाचे आहे. ते पाटीलपांडे यांत असावे किंवा नाहीं हा मुळींच खुलासा नाहीं कृति ही मात्र दिसून येते कीं हल्ली जीवर तारीख २३ दाखविली आहे तिजकरितां जी सभा भरणार त्याजमेंध येणारे लोक याहास निमंत्रण चिठ्ठी दिली गेली आहे ती नुसती देशमुख देशपांडे याहास आमचेकडे आली आहे या कारणावरून आह्मास समजतें.

परंतु तारीख २४ फेब्रुवारी सन १८९० इसवीचे वर्तमानपत्र वऱ्हाड समाचार याजमध्ये वर्गणी जमीदारा कडून आली तीचे नावे लीहीली गेली आहेत त्या प्रमाणें रा. रा. काशीराव पाटील पांडे पींपळोद याहाचा दाह १० रुपये चा आकडा मला दिसल्या वरून मला असें समजून आले कीं पाटील पांडे या हाचे कांहीं प्रालब्ध आता उदयास आले.

कारण जमेदारि देशमुख व देशपांडेचे सभा असोन यात पाटील पांडे याहाची कांहा वर्गणी घेतली गेली या वरून असें दिसतें कीं पुढे पाटील सभेंत घेण्यास देशमुख देशपांडे सा० मंडळी आता मत देताल यावरून कळु येते.

मागे जुन्या काळांत जे आपले वडील हो ते याहाचे मत मुळींच पाटील पांडे निराळे आपले शीवाय राहवे हे नव्हते देशमुख देशपांडे हे सर्वत्र मंडळीनी पाटील पांडे याहासी न भिन्न राहतां याहास आपल्या शीवाय दुर राहूंद्यावे असें ही नाही कोणत्याही सभेत व कोठेंही भीन्न भाव राहावे याज करितां मुळीच सभा नसोन एक भाव व येकोकाचे सरी सर्वत्रानी वीचार करून चालत असता सभेस कीती शोभा होणारी आहे व मोठें पणा ही आहे—याचा विचार देशमुख देशपांडे सा० करून घेतील.

पाटील पांडे आग्रह पुरस्कर या सभेंत घ्यावे हा माझाही आग्रह मुळींच नाहीं कारण जर त्यांहांचे मनांत ही गोष्ट येत नसल्यास व त्याहाचे याज पासून नुकसान असल्यास मात्र खरे.

वर्गणीच्या कृती वरून असें ह्मणवत नाहीं मात्र निमंत्रण पाटील पांडे याह्मास नाहीं ह्मणून असा तर्क निघतो.

आता वऱ्हाडातील हे जमीदारी सभा या मार्च महिन्यांत वर लिहील्या तारखेस होऊन गेल्यावर मात्र पाटील पांडे संबंधी विचार काय हा स्पष्टपणा समजून येइल

पाटील पांडे खरोखरच नाहीं घ्यावे असा निकाल झाल्यावर पुढें बीचारे पाटील पांडे याहानी ही आपली नवीन सभा स्थापन करण्यास तयार राहले पाहिजे याजवर सर्वत्र पाटील पांडे याहती लक्ष देऊन येकादे ठिकाणी आपला एक विचार जमुन करावें ही माझी सर्वत्रांस प्रार्थना करितो आपल्यास जर खरोखरच देशमुख देशपांडे साहेब याहनी फेकून दील्यास ही गोष्ट करणें उत्तम होय

ज्या अर्थी कासीराव पाटील पांडे सा० याहाची वर्गणी घेतली त्या अर्थी दुर फेकले असें समजू नये या मार्च महिन्याचे तारखेस सभेचा निकाल झाल्यावर पक्के समजून येईल आता पत्र वित्तार फार होईल या करितां पुरे करितो सर्वत्रानी माफी द्यावी कळावें ता. २७-२-९०

एक पाटील पांडे

अन्याय: परमोधर्मो जगद्वैभव कारणम्॥ वि० वि० पत्र कर्ते राव आपल्या चटकदार व जगप्रसिद्ध पत्रांत येत्या अंकीं खालील चार ओळीस जागा द्याल व अर्ध चंद्र देऊन कचऱ्याच्या 'बासकेट' मध्यें पाठविण्याचा प्रसंग न आणाल अशी खात्री पूर्वक उमेद आहे ती सफल व्हावी.

मी कांहीं एक कामा करितां उमरावतीस गेलों असतां तेथें एका विशेष महत्वाच्या ठिकाणीं एक विचित्र व भिन्न प्रकार (असें ह्मणण्याचें कारण इतकेंच कीं मी तेथें पूर्वी असतांनां असा प्रकार दृष्टीस पडेल असें स्वप्नी ही आलें नव्हतें) दृष्टीस पडला. (मी अशा वेळीं तेथें नाहीं हें माझें व माझ्या सोबत्यांचें नशीबच समजावयाचें) तो दृष्टोत्पत्तीस येतांच माझ्या मनांत प्राचीन तात्विकांच्या उक्ती विषयीं पूज्य बुद्धि उत्पन्न झाली, कारण त्या प्रकारा वरून भारतादी पुराणांत वर्णिलेल्या कलीचा प्रादुर्भाव दिसून आला.

व पूर्वीचा सर्व सिद्ध नियम 'सत्यमेव जयते' यास बाध आला असें समजूं लागले; कारण ह्या जगांत सत्यानें चाललें असतां कोणाही असें समजोंव कीं आपले राशीस साडेसात व पांचा शनी आलाच. ज्या अर्थी असा ईश्वर प्रणीतच नियम आहे त्या अर्थी कोणा ही विशेष व्यक्तीस दोष ठेवणें बरोबर होणार नाहीं साधारण लोक असत्य व जग विरूद्ध कर्मे करून आपल्या वरिष्टांची प्रीति संपादन करितात, व सत्यप्रिय लोकांचा द्वेष करून त्यांस खालीं पहावयास लावित.त! व वरिष्ठानीं जर याचा सारासार विचार करावा तर ते कॅपॅरेटिव्ह डिग्रीचेच. मग योग्य न्याय मिळेल कोठून? पूर्वीच त्यांची खुशामत करून मर्जी संपादन केलेली असते, व त्यांच्या दृष्टी समोरून आड झाले ह्मणजे आम्हीं इतकीं वाईट कृत्यें घडघडीत करीत आहों, वरिष्टांच्या डोळ्यांत माती घालीत आहों व इतकेंही करून आमचें कोणाच्यान ही कांहीं होत नाहीं असें उग्दार बाहेर पडतात. जे आहे तें योग्यच आहे, व ते बाह्य; डामडौल, फुशारकी इत्यादि सग्दुणांनीं श्रेष्ठत्व पावतात व सत्यप्रिय लोकांवर फार कठीण प्रसंग आणून त्यानां आपल्या वर्गांत आणण्या विषयीं प्रयत्न करीतात. तसें झालें-म्हणजे कुरकुर नको न्याय नको व संगत चांड न्हाले असा प्रकार दिसून पडतो हा सर्व प्रकार कली महाराजांचा. वहावारे कली! मजा केलीस तूं बरीच आपली छाप बसवून राहिला आहेस. अरे पण तुझ्यावर तरी हा दोष कसूचा तूं जुन्या विद्वानांच्या वचना विषयीं पूज्यबुद्धि व्हावी व त्यांची वचनें खरी व्हावीं एतदर्थ प्रामाणिक प्रणानें आपलें काम बजवीत आहेस. मित्रातुला या कामीं यश येवो म्हणजे झालें पण बिचाऱ्या सत्यवदी लोकांना चिरडूं नकोस! अरे दयाळू मित्रा तूं व बरें शांत पणानें असा विचार करकीं जर बिचाऱ्या सत्यवाद्यांवर चोहोंकडूनच जर प्रलय होऊं लागला तर त्यानीं शरण तरी कोणाला जावें! आजकाल सत्यप्रिय लोकांना साडेसाती आली आहे व अर्थातच कुकर्मी लोकांचा भाग्योदय व्हावयाचाच. पण सत्यप्रिय लोक हो घाबरूं नका..सत्य सोडूं नका. आपले पूर्वजकार धूर्त होते. त्यांनीं जो घातलेला सिद्धात सत्यमेव जयते हे जरी तुम्हांला दुःख परिणामा वाटत आहे तरी प्रिय विद्यार्थीं बांधवानो तुमच्या वरिष्ठा कडून यथांन्याय मिळून सुख होईल व प्राचीन कवीच्या वचनावर विश्वास ठेवून काल चक्राचे दिवस शनी महाराजांचा जप करीत करीत व सत्या पासून एकही पाऊल न ढळतां मोठ्या आनंदानें दिवस काढा. परमेश्वर सर्व साक्ष आहे. तो तुम्हांस सहाय्य करून तुमचीं संकटें निवारण करील. दुराचारी लोकांची ही दोन दिवसांची तुरकुर आहे. पत्र कर्ते राव पत्रविस्तार फार झाला पण मला हें वृत्तजग प्रसिद्ध करण्याचें हेंच कारण कीं, त्यांज्या कडे ज्या ज्या गोष्टी येतात त्यांचा सारासार विचार ते कलीच्या सपाट्यांत सापडल्या मुळें कलीचें वर्चस्व ठेवण्याचें ठिकाणच करून घेतील काय! अशी भीति वाटून या उपर तरी सारासार विचार त्यानीं करून जें करणें तें करावें अशी त्यांस [ गरीब विद्यार्थ्यांचा कळवळा आल्या मुळें ) हात जोडून विनंती आहे. याज करितां विशेष व्यक्तीस व विशेष रीतीनें न लिहितां पर्यायानें सर्वव्यापी विषय घेऊन ( बाबतः ) सूचना केली आहे याचे चीज झालें म्हणजे कृतकृत्य झालों असें मी आपणांस समजेन.

आपला
एक माजोहा. विद्यार्थी.

---

रा. रा. वऱ्हाड समाचार कर्ते यांस :— वि. वि. आपणाकडे च्यार वेळा पाठविल्या आहेत त्यास आपल्या पत्री जागा देण्याची मेहेरबानी करावी —

वऱ्हाडांतील जमीदार लोकांची सभा ता. २३ मार्च सन १८९० इसवी रोजी भरणार आहे व त्या सभेंत देशमुख देशपांडे पाटील कुळकर्णी इतके लोकांचा समावेश आहे व समावेश असल्या वरून सभेचे सेक्रेटरी कडून वरील लोकांस अमंत्रण पत्रीका गेल्या आहेत व माझ्या दृष्टीस पडल्या मी वडणेर बीबी ता० उमरावती येथें असतां तेथील प्रसिद्ध देशपांडे साहेबानीं असे कळविलें कीं मोर्शी तालुक्यातील पाटील कुळकर्णी लोकाना अमंत्रण पत्रीका न पाठविल्या मुळें ते लोक फारचफार नाराज आहेत व त्या लोकांस सभेंत अमंत्रण न केल्यास दुसरी सभा स्थापण करणार आहेत असे कळविल्या वरून मोर्शी तालुक्यातील पाटील कुळकर्णी व अवरवर वऱ्हाड प्रांतातले पाटील कुळकर्णी याना अशी सूचना करण्यात येते कीं ज्या अर्थी देशमुख देशपांडे लोकांची तुह्मी पोटशाखा "पोट मक्तेदार" आहात त्या अर्थी तुह्मांस जमीदार सभेत शरीक करणें जरूर आहे व त्यानीं तुमचे लोकांचा समावेश ही केला आहे करितां पाटील कुळकर्णी लोकाना अलेल्या संशयाचि निवृत्ती व्हावि येवढ्या करितां सुचविलें आहे पाटील कुळकर्णी लोकां पैकीं बहुतेक लोकाना पत्रीका गेल्या आहेत व त्याच प्रमाणें देशमुख देशपांडे लोकाना ही गेल्या आहेत परंतु ज्यांचे नांवाची माहीती नसल्या मुळें ज्याना पत्रिका गेल्या नसताल व ज्यची येण्याची इच्छा असेल त्या लोकांनीं अवश्य येण्याचे करावें. पत्रीका गेल्यानीं स्यान न येण्या विषयीं प्रतीबंव आहे असें नाहीं ही गोष्ट पूर्ण लक्ष्यांत घेऊन सभेस अवश्य यावें कळावें

आपला मीत्र
( क्ष )

---

**वऱ्हाडसमाचार.**

मिती फागून वद्य ११ शके १८११

---

राष्ट्रीय सभेंत मि. ब्रॅडला साहेबानीं असें बोलून दाखविलें होतें कीं कायदे कौन्सिलचे सुधारणा करण्या करितां हिंदुस्थान सरकार देखिल एखादा कायदा पार्लमेंट्या पुढें आणतील व त्या प्रमाणें हल्लीं सरकारनें त्या संबधाचे एक बील ( कायदा ) पार्लमेंटांत विचार करण्या करितां आणिलें आहे. त्या बिलाचा विचार अद्याप लार्डस ( बडेलोक ) लोकांच्या सभेंत चालू आहे. ता. ६ रोजी सदहूं बीलाचा विचार चालला होता. त्या बिलाचा विचार चालला असतांना त्यावर जी भाषणें झालीं त्या वरून तें बील कोणत्या प्रकारचें आहे व तेथील लोकांचें काय ह्मणणें आहे हें सहज लक्ष्यांत येईल. प्रथम कायद्याचा मसुदा लार्डक्रास साहेबानीं वाचून दाखविला तो अक्षरशः अद्याप बाहेर आला नाहीं सबब आमच्या वाचकां करितां आमच्यानें एथें देववत नाहीं. बिलाचा सारांश असा आहेकीं प्रांतिक सरकारच्या व त्यांचे प्रमाणें व्हाईसराय साहेबांच्या कायदे कौन्सीलची सुधारणा करावी व सभासदांचा हल्लीं जी संख्या आहे ती ज्यास्त वाढवावी. वदरसालचा जमाखर्चाचा खर्डा ह्या सभासदांचे समोर आणिला जावा व त्यावर त्यांचा विचार झाल्या नंतर तो अमलांत आणला जावा परंतु हे जे सभासद नेमावयाचे ते लोकांनीं निवडलेले न नेमतां सरकारनीं आपले इच्छे प्रमाणें नेमावे. प्रथम लार्ड क्रास साहेबानीं कायद्याचा मसुदा वाचल्यावर लार्ड नार्थ ब्रुक साहेब ह्मणाले कीं माझी अशी खात्री आहे कीं हल्लीं हिंदुस्थानांत चांगले विद्वान कायदे कौन्सिलांत बसण्या लायक असें पुष्कळ लोक आहेत. व ते केवळ विद्वान आहेत इतकेंच नाहींत तर राजनिष्ठही आहेत राष्ट्रीय सभेंत ह्या लोकांनीं भाषणें करितानां जी आपली राज निष्ठा दर्शविली ती पाहून मी फारच खूष झालें आहे असें ते अखेरीस ह्मणाले. या नंतर लार्ड रिपन साहेब असें ह्मणाले कीं हल्लीं अशी वेळ आली आहे कीं हिंदुस्थानांतील सार्वजनिक मंडळ्यानीं ह्मणजे म्युनिसीपालट्या. लोकल बोर्डानी वगैरेनीं सभासद निवडावेत तर ह्या कायद्यांत ह्या बद्दल कांहीं योजना चालून कायदा दुरस्त करवा. त्या नंतर लार्ड किम्बरले साहेबानींही हिंदुस्थानातील लोकांना सभासद निवडण्याचा अधिकार द्यावा असा आपला अभिप्राय दिला. या नंतर लार्डक्रास साहेब असें ह्मणाले कीं हल्लीं ह्या कायद्या संबधोंन जो विचार चालला आहे तो पाहून मला फारच आनंद वाटतो आहे परंतु माझ्या स्थितींत असणारा दुसरामनुष्य हिंदुस्थानला ग्रेटब्रिटन प्रमाणें ( कौन्सीलमध्यें ) आपल्या वतीचे लोक पाठविण्याची रीत लागूं करावी असें कधींही ह्मणणार नाहीं. त्या नंतर लार्ड सॉलीसबरी प्रधान मंडळातील मुख्य असें ह्मणालें कीं आता पर्यंत ज्या ज्या बड्या गृहस्थांची भाषणें झाली त्यानीं ह्या प्रश्नाचें खरे महत्व जाणलें नाहीं व त्याच प्रमाणें हा अधिकार हिंदुस्थानच्या लोकांस हिंदुस्थानच्या राज्य प्रकरणांत हात घालण्यास दिला असतां सरकारावर कोणत्या प्रकारची जबाबदारी उत्पन्न होणार आहे याचा ही पण विचार त्यानीं केला नाहीं. असें दिसतें पूर्वे कडील लोकांचे मनच मुळ अशा प्रकारचें आहे कीं त्यांच्या हातीं हा असा अधिकार देणेंच इष्ट नाहीं. इजिप्त तुर्कस्थान व त्यांत मुरूपत्ते करून क्रीट येथे हा अधिकार दिला होता परंतु त्या प्रत्यक ठिकाणी ह्या पासून अपयशच आहे. शिवाय हिंदुस्थान देश तर इतक्या भिन्न जातीच्या, वर्णीच्या, व धर्माच्या लोकांनीं भरला आहे कीं तेथील लोकांस हा अधिकार एकवेळ दिला तर तो काढतांच येणार नाहीं. व केवळ ह्या रीतींनें कशीकाय व्यवस्था चालेल एवढ्या करितांच लोकांच्या हाती हा एवढा थोरला अधिकार देणें हें कामतर फारच धोक्याचे आहे यावर लार्डग्रान व्हील साहेब म्हणाले कीं लार्ड डफरीन साहेबानीं जी शिफारस केली आहे ती नाकारणें ह्मणजे फार धोक्याचे जबाबदारीचें काम आहे ह्या वरील वादविवादा वरून हिंदुस्थान देश ज्यांनीं पाहिला आहे ज्यानी लोक कसे आहेत, इकडे खरी स्थीती काय आहे उणीवें काय आहे वगैरे गोष्टी ज्यांनीं पाहिल्या आहेत त्याच्या विचारांत व केवळ इंग्लडात राहून हिंदुस्थानां बद्दल विचार करणाऱ्य लोकांच्या विचारात किती तफावत आहे सहजच लक्षांत येईल अद्याप हा मसूदा कामन्स कडे जावयाचा आहे व त्याच प्रमाणें लार्डस (बडे लोक) ही याचा आणखीएक वेळ विचार करणार आहेत तसेंच मि. ब्रडला ही आपला कायदा लवकरच पुढें आणणार आहेत व सूमार १२७ लोकानीं या कायद्याला अनुकूळ मत देण्याचे कबूल केलें आहे पहावे काय परीणाम होतात तें!

## वऱ्हाड हायस्कूल माजि विद्यार्थी समाज.

हा समाज स्थापन होऊन तीन वर्षें झालीं. पुणें कॉलेज ग्यादरिंगच्या धर्तीवर हा समाज स्थापन झाला. परंतु ह्या समाजाची रचना कॉलेज ग्यादरिंग पेक्षां पुष्कळ भिन्न आहे. आमच्या समाजांत पंचाक्षरी पदवी धारणकरणाऱ्या लोकांपासून तों ज्यांनीं हायस्कुलांत सातवी ईयत्ता सुरूं असतां त्या ईयत्तेचा एक दोन महिनेच आस्वाद घेऊन शाळा सोडून दिल्या मुळें आपण हायस्कूलचा उंबरठा ओलांडलाच नाहीं असा भास वाटणारे लोक आहेत. ऐन सोळा वर्षांच्या ज्वानीच्या भरांत हायस्कूलक्रम संपवून यंदाच शाळा सोडून पुढें सोय नसल्या मुळें उदरपोषणार्थ कोणता तरी व्यवसाय करण्यास तयार असलेले लोक आहेत. चाळिशी उलटल्या मुळें व इतके दिवस जगांत टक्केटोणपे खाऊन अनुभवशीर झाल्या मुळें ज्यांच्या आगीं स्वभावतःच पोक्तपणा व समंजसपणा आला आहे असेही लोक आहेत. एक्स्ट्रा असिस्टंटचे काम करणारे लोक आहेत व ६ किंवा ८ रुपये महिना मिळविणारे असेही सरकारी नोकर आहेत. स्वतंत्र तऱ्हेनें व्यापार करणारे वकिली करणारे अशांचीही संख्या बरीच आहे. लाखों रुपयांची ज्यांचे घरीं घडामोड होत आहे असेही लोक आहेत व ज्यांस प्रपंचाचा गाडा ओढतां ओढतां नाकीनव आले आहेत असेही बिचारे आहेत. भिन्न जातीचे लोक आहेत हें सांगणें जरूरच नाहीं. अशा समुदायांत व्यक्तिपरत्वें स्वभाव वैचित्र्य दिसून येणें किती साहाजिक आहे. अशा समुहांत कोणत्याही गोष्टीचा विचार होतांना मतभेद झाला असतां नवल नाहीं. व अशा प्रसंगीं कित्येक मायेकिरू लोक आपला हेका धरून बसले असतांही नवल नाहीं. असे मासले पार्लमेंट साररूया सभेंत सुद्धां दिसण्यांत येतात. परंतु अशा मतभेदा बद्दल कित्येकांचा त्या मंडळींतील कांहींजण भांडखोर आहेत असा आरोप आहे या बद्दल आह्मास आश्चर्य वाटतें. खरोखरच ही मंडळी भांडखोर असती तर यंदाच्या समारंभास यश

पोनों

आलेंच नसतें. ही सर्व मंडळी एकत्र जमल्या पासून फायदे श्रम न करितां होत चालले आहेत. आपले स्वाध्यायी भेटल्यावर शाळेंत असतांना जो विनोदाचा प्रकार चालूं असतो त्याचें स्मरण होऊन हल्लींची स्थिति विसरून जाऊन जणुकाय पुन्हा शाळेंतच आहों अशा प्रकारें विनोदास प्रारंभ झाला ह्मणजे जो आनंद होतो त्याची किंमत त्यांनाच विचारावी. एखाद्या अगांतुकयास हा विनोद न आवडणें साहजिक आहे.

अशा प्रकारें दोन दिवस आनंदांत जाणें हा एक फायदाच आहे. शंखध्वनी करीत गावांत फिरणें आपे आप मोडलें. यंदाच्य प्रसंगीं पाहुणे मंडळीची व्यवस्था ठेवण्या करितां नी खटपट झाली अशी चाळली म्हणजे परस्परांत स्नेहभाव जास्त झालाच पाहिजे. यंदाची टापटीप व व्यवस्था जशी राहिली त्या पेक्षां प्रत्येक वर्षीं जास्तच होतजाणार. ही मंडळी केवळ भोज्या करूनच स्वस्थ बसणारी नव्हे. दुसऱ्या चांगल्या गोष्टीचाही या समाजांत विचार होतो. यंदाच्या समाजांत असें ठरलें कीं जोकोणी समाजपैकीं मेंबर एक वर्ष अगोदर सांगितलेल्या विषयावर ग्रंथ लिहील त्यास त्याचा ग्रंथ पसंत झालेल्या ग्रंथात उत्तम ठरल्यास १० रुपये बक्षीस द्यावें. समाजाचा फंडकमी असल्यामुळें खापर्डे साहेब यांनीं ५० रुपये देण्यांचे कबूल केलें आहे. यंदाच्या समारंभाचा थाट माट व व्यवस्था चांगली होती. मोरोपंतजोशी यांचें व्याख्यान फार सुरस व बेचपर झालें. व्याख्यानास गावांतील शिष्ट मंडळी पुष्कळ आली होती.

The Berar Samachar

MONDAY MARCH 17, 1890.

## A PROTEST AGAINST LORD CROSS, COUNCIL INDIA BILL.

Mr. Bradlaugh's India Council Bill was blocked by Mr. Maclean probably with a view to give credit to the Conservative Government for having introduced into the house their India Council Bill. That this was in all likelihood Mr. Maclean's motives would be apparent from the fact that soon after blocking Bradlaugh's Bill the Government brought in theirs. If the house was not properly prepared to consider a Bill such as Bradlaugh introduced how did it come about that the House became so soon after ready to discuss the merits of a Bill of the same nature. When Lord Dufferin was here he sent home a despatch urging or advising the desirability of introducing some reform in the existing constitution of the Legislative Councils. The Budget was to be allowed to be freely discussed by members of the Council, the number of members was to be increased at the option of the Local Government, and the right of interpellation to be given to the members of official & non-official. On those same lines probably the bill of the Government has now been based and we find now that the essential feature pressed by the Congress on the attention of Government is wanting in the Bill. The principle of *election* urged by the Congress and its supporters is altogether wanting and this is what we protest against.

The theory of the paternal British government represented by the official classes out in India is that the system of government by nomination to the Councils is all that is enough at present. We know how that power of nomination has been exercised some years ago and although it may happen as it does, that really representative men are nominated to the Councils, we cannot be certain of the system always ensuring the nomination only such men as the people would themselves appoint. The patronage system on which appointments to responsible officer once depended has now been sufficiently exploded and if that has not stood the test of public criticism in other departments there is no reason why it should be considered adequate in the matter of the appointment to the Councils. The system of election once introduced in the Councils the people would at any rate be sure that a certain portion of the members of the Council would represent their actual needs and try to get redress of their genuine grievances.

But let us examine the reasons on which the other side base their objections to granting the very moderate request of the Congress. The gentlemen of the Congress they affirm do not represent any body but themselves. The mass of the people does not care for political matters and in fact apathetic to it. The right of election therefore if once conferred will be practically restricted to the educated classes and there is a chance of their abusing the power entrusted to the minority of the educated people. In the first place we deny that in matters political the people of this great country do not trust the educated community. Our ideas in social matters or religious matters might differ from this but it is a matter of every day experience that the public believe the educated classes in fighting their constitutional battles with Government. But granting for the sake of argument that the masses generally have no sympathy with the educated classes still why should not even the educated minority get a representation even to represent their own classes. As Mr. Yule apty put in his address at the Allahabad Congress that if in a country there are only a few persons who know how to manage steamengines, there is no reason why they should be debarred from practising their profession because others are unable to do the same. If only a minority is fit to exercise the franchise there is no reason why they should not get the right to exercise it. There is no chance of their abusing the power vested in them for the right of vetoing any measure passed by even a majority of the Legislative Council is, according to the scheme of the Congress vested in the local government. The government can always keep a strict eye on the doings of these members to see if they abuse their authority.

Some of the Anglo-Indian papers whose sole business in regard to the growing aspirations of the people represented by the Congress, always misrepresent the movement by saying that the Congress claims a ridiculous and absurd universal suffrage. It is to be regretted that papers of the influence they have amongst the Anglo-Indian community should spread evil reports of the Congress movement and it aims and objects without even attempting to know the truth about it and the catchwords of these papers are easily taken up by papers in England of similar tendencies.

In spite of these misrepresentations we must always reiterate the truth about Congress and its demands in connection with the Legislation councils As at present constituted, there are native members on the Council presumably because they have a more intimate knowledge of native needs and aspirations. If, as is evidently the object, the members are already there the only difference we want to make is that the members be elected and not selected by Government and this would and must lead to the furtherance of the original object of appointing native members to the Council.

We feel it incumbent on us to enter a protest against the omission of the elective element being introduced in the Councils. The present Government Bill we must say, does not all satisfy the growing aspirations of the people, and such half measures will only lead to further irritation and disaffection amongst a community consisting of admittedly loyal tendencies. Real statesmanship consists in meeting the growing popular demands and thus make it a decent act of grace rather in yielding on compulsion of growing public opinion.

---

We hear that a newly nominated E. A. C. took occasion to bring to the notice of superior officer that a certain gentleman on a local Board Committee should be removed from his office, simply and solely because the member of the Local committee had been away during Christmas to the meeting of the National Congress held at Bombay. This will surely serve as an encouragement for people to serve on the Local Board Committee. Those responsible for the administration of the District ought to administer a good lesson to the reporting officer—the new E. A. C. that people independent of government cannot be prevented from doing what they like and their being absent from Local Board Committees once or twice during the year does not subject such absentees to the penalty of removal from the post.

---

We are happy to learn the report that Mr. Hare has been appointed revenue settlement officer for H. A. D. However we express the general feeling of regret experienced at his approaching departure from this district. In initiating the organization of Local Boards he showed great zeal and interest with a view to their being laid down on a firmer foundation. His special efforts and care with which he laboured to push forward the Akola water works will ever be remembered.

### पोंच

डोंगरे कृत संगीत शाकुंतलची एक प्रत प्रकाशकाकडून आमच्या कडे आली आहे तीत्र आम्ही आभार पूर्वक स्वीकार करितो किर्लो सकर मंडळी प्रमाणेच डोंगरेमंडळीचे नाटकाचे प्रयोग ७।८ वर्षांपूर्वीं मुंबई पुणें वगैरे ठीकाणी होतो ह्या चार अंकी पुस्तकाची किंमत आठ आणें आहे व ही पुस्तके मुंबई कांदेवाडीत रा. नारायण रंगनाथ दातार याजकडे विकत मिळतील.

## वऱ्हाड

जमेदार सभेच्या वर्गणीची पोंच:—

रा. भा. अजानबाई जवजे रामराव देशमुख दर्यापुर रुपये १५

रा. पारवती बाई जवेजे अमृतराव देशमुख दर्यापुर रुपये ५

रा. जयराम हंबीरजी देशमुख म्हैसुर ५

रा. आकाजी देशमुख कामरगांव रु. १०

रा. गोविंदराव देशमुख रुपये १०

रा. शंकरराव देशमुख झोडगा रुपये ५

रा. यादवराव लक्ष्मण देशपांडे पिंजर ५

रा. यशवंतराव विठुजी देशमुख बोरगांव ५

रा. देवराव देशमुख सोनाळे रुपये ५

एकंदर बेरीज ६५

मागील अंकावरून २८४

एकूण ३४९

आलीशान रेसिडेंट साहेब व मे. फर्स्ट असिस्टंट रेसिडेंट यांचें आणि वऱ्हाडातील सर्व दिवाणी कोर्टें ता. १ मे पासून ता. १५ जून पर्यंत बंद राहतील अर्ज किंवा अपिलें जरुरीची असल्या वांचून घेण्यांत येणार नाहींत.

कप्तान जे. जी. मारीस अ. क. फर्स्टक्लास यांस ते घेतील त्या दिवसा पासून १८ महिन्यांची फर्लो रजा मिळाली.

सर्जन एच अनीं यांस आपले लष्करी कामीं ठेऊन शिवाय आपले इलीचपूर सिव्हिल सर्जन आणि जेल सुपरिंटेंडेंट नेमिलें

येथील म्युनिसिपल कमेटीत रा. रा. कृष्णाजी हरी कोल्हटकर आणि नामदेव राजना यांचे जागीं रा. रा. गणेश बापुजी आणि मि. ए. एस. जुधानी यांस मेंबर नेमलें व निवडलें आहेत.

कर्नल वेल, या प्रांताचे माजी जु. क. यांस गेल्या महिन्यांत विलायेंत देवाज्ञा झाली हें कळविण्यास आम्हांस फार दुःख वाटतें. हे नुकते दोन वर्षां मागें इकडून पेनशन घेऊन विलायतेस गेले होते. हा प्रांत इंग्रज सरकाराकडे आल्यावर लागलींच जे कित्येक युरोपियन सरदार इकडे आले त्यांतील हे एक होते व यांनीं ह्या प्रांतांत बरीच चांगली चांगली कामें केलीं.

मि. विश्वनाथ मुदलीयार ए. अ. क. हे गेल्या आठवड्यांत निवर्तले. हें कळविण्यास आम्हांस फार वाईट वाटतें

मि. मांटगोमरी, यांस बुलढाण्यास कायमचे सिव्हिल सर्जन नेमलें

तापाची साथ (इन्फ्लुएंझा) गावांत जारीनें सुरूं आहे.

मि. आर. डी. हेअर येथील डे. क. हे यवतमाळास सर्वे आणि सेटलमेंट आफिसरचे कामाचा चार्ज घेण्यास आज उद्यांत जातील.

मि. सी ए. डब्ल्यु. डेव्हिस आफि. डे. क. चे काम पाहणार.

मि. निकालेटस् डे. क. एलिचपूर यांची येथें बदली होणार अशी वार्ता आहे; असें ही ऐकण्यांत येतें कीं क्याप्टन वारन हेस्टिंग हे येथे डे. क. चे जागीं येणार पहावें कोण येतें तें.

मि. सफदर अलिबेग तहशिलदार यांस ए. अ क. नेमून त्यास येथें काम करण्यास पाठविलें आहे.

मि. मुबारक अली तहशिलदार यांस ए. अ. क. नेमून मोर्शीस काम करण्यास नेमलें आहे असें समजतें.

## वर्तमानसार.

—सर सालरजंग यांच्या घराण्याच्या जहागिरीची व्यवस्था पहाण्याकरितां १ युरोपियन व २ एत्तद्देशीय बडे लोक अशी तिघांची कमेटी नेमली आहे. या कमेटीचे सेक्रेटरी युरोपियन गृहस्थ आहेत या सेक्रेटरींनीं निझामास दर महिन्यास रिपोर्ट करावयाचा व वराचेवर त्यांच्या घराण्यातील मंडळीची खुशाली कळवीत जावें असें ठरलें आहे! पहावें कितपत बेत सिद्धीस जातो तें!!

विस्तवा वरून चालत जाणे— काशी मुक्कामीं कांहीं दिवसां पूर्वी सुमारें १२ हात लांब ३ हात रुंद आणि १॥ हात खोल विस्तवानें रसरसलेल्या कुंडांतून तरुण व म्हातारे पुरुष आणि बाया अनवाणी चालत गेल्या हें पाहून युरोपियन प्रेक्षकांस परमाश्चर्य वाटलें असें एका बातमीदारानें पायोनियर पत्रास कळविलें आहे.

पांखरांची शक्ति त्वरा— गिधाड एका तासांत कधीं कधीं १०० मैलांपेक्षां जास्त, बिन पाळलेले राजहंस, आणि पाकोळ्या स्थलांतर करीत असतां कधीं कधीं दर तासांत १०।८० मैलांपेक्षां जास्त, बातम्यानेणारी कबुतरें पुष्कळवेळां दरतासांत ६०।८० मैलांपक्षां जास्त कित्येक तास सतत उडत, आणि कावळा दरतसांत २५ मैल म्हणजे अगगाडीच्या वेगा इतका उडत जातो असें प्रोफेसर आर. एच थर्स्टन लिहितात.

जर्मन मोहीम—म्याकझाईन रायफल बंदुका असलेले १४०० सिद्दी, १८ तोफा दोन टार्पेटोबोटी व दुसऱ्या चार बोटी यां सह मेजर विसमन यास जर्मन सरकार अप्रेलच्या आरंभी आफ्रिकेच्या मध्यभागीं पाठविणार आहे.

एक नवा तारा—ज्योतिष शास्त्राच्या गणतीवरून १८९० सालीं एक तारा दिसणार आहे. हा ३७१ वर्षांच्या अवधीनें उगवतो. इ.-स. १२६० व १५७१ ह्या वर्षीं तो उगवला होता. १५७५ ह्या वर्षी तो उगवला तेव्हां इतका तेजस्वी होता कीं दिवसा ही तो दिसत असे. त्या प्रमाणें तो सरासरी ३ आठवडे पर्यंत अत्यंत तेजस्वी होता, नंतर त्याचें तेज कमी झालें. पुढें १७ महिने पर्यंत तो प्रकाशत होता नंतर तो जसा एकदम उदय पावला तसाच एकदम मावळला ही. अशी हकीकत डेलि-युज पत्राच्या व्हियेन्नच्या बातमीदारानें त्या पत्रास लिहून पाठविली आहे.

मुसलमान यात्रे करूंस इषारा—अरबस्थानांत कित्येक वर्षे आवर्षण पडल्या मुळें मक्का मदीना, आणि हजाज या मुसलमानी पवित्र क्षेत्रांत व त्यांच्या आसपास दुष्काळ पडला आहे. दिवसा लुटालुटी आणि हाणामाऱ्या चालतात सबब तिकडे सुबत्ता होई पर्यंत यात्रे करूनीं तिकडे जाऊं नये हें बरें असें टाईम्स आफ इंडिया पत्रांत प्रसिद्ध झालें आहे. सु० प०

आपला राजा बऱ्हा झणून स्पेन देशांत एक राजसभेचा जाहिरनामा प्रसिद्ध करण्यांत आला आहे.

सिलोनच्या एका जमिनींत सोन्याची खाण सापडली आहे. लंकेंत सोन्याच्या विटा होत्या हें खरें काय?

केंब्रीज येथें हिंदुस्थानांतील निवडक असे ३९ सिव्हिलसर्व्हिस उमेदवार आहेत.

गाडीच्या चाकाची धाव किंवा एखादा खिळा विजेच्या योगानें तापविण्याची एक युक्ती निघाली आहे.

विलायतेंत ३४७ बायका लोहाराचा धंदा करणाऱ्या ह्मणजे घण मारणाऱ्या असून १०००० हजार खिळे करणाऱ्या आहेत!

लष्करी लोकांसाठीं बराकी बांधून देण्या साठीं ४० लाख रुपये पाहिजेत अशा प्रकारचे एक बिल पार्लमेंटापुढें आलें आहे.

आपण गादीवर बसलो म्हणून झांजिबार चे सुलतानानें तुरुंगातील सर्व कैदी सोडून देण्यांत आले आहेत.

राष्ट्रीय संरक्षणासाठीं पोर्तुगाल देशांत एका दोन दिवसांत ८० हजार रुपये वर्गणी जमली!

रशिया एका अती मोठ्या लढाईची जारीनें तयारी करीत असून ती लढाई तीन चार वर्षांत केंव्हां तरी होईल असें एक रशियन पत्र कर्ता म्हणतो.

यंदा वकिलीच्या परीक्षेला एकंदर ३१३ उमेदवार आहेत.

मि. सोराबजी बमनजी कपाडिया यास हायकोर्टांत वकीली करण्याची सनद मिळाली.

मि. पांडुरंग बाबुराव वालेवालकर यास पुणे जिल्ह्यांत वकीली करण्याची सनद मिळाली आहे.

१८९०–९१ सालांत इंग्लिश शिपायांस जो पगार द्यावयाचा तो दर रुपयाची किंमत १ शिलिंग आणि पाच पेन्स या भावानें द्यावयाचा असें ठरविण्यांत आलें आहे. ठा०

---

नोटीस

गोविंद भारती वल्लद इश्राम रहणार शेवगे तालुके मेहकर जिल्हा बुलठाणें यास खालीं सही करणार इजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुझे बरोबर माझे लग्न होऊन अजमासें वीस वर्षे झालीं त्यांत मी तुमचे येथें १६ वर्षांत जितके दिवस तुह्मी मजला मोठ्या जुलमानें वागविलें आणि बाकीचे दिवसांत तुमच्या त्रासा मुळें माहेरी राहत असें. एकवेळ मी माहेरी आले ह्मणजे तुह्मी मजला नेण्या विशयीं काहींच काळजी घेतली नाहीं. माझे भाऊ यानीं आपल्या खर्चानें तुह्मा कडेस घेऊन यावें. परंतु तुम्ही मजला १५-२० दिवस ठेऊन घेऊन मजला माहेरी पोचती करावी. आतां ४ वर्षां पासून मी अकोलें मुक्कामी तुमचे नांवावर कर्ज काढून निर्वाह केला. परंतु आतां मजला कोणी कर्ज देत नाहीं. सबब या नोटीशानें कळविते कीं माझे खावटी चा कर्जाचा पैसा २०० रुपये देऊन मज घेऊन जावें आणि चांगल्या रीतीनें वागविण्या बद्दल चार पंचाचि खातरी करावी. असें न केल्यास हीच फारकती समजून मी दुसरा घरठाव करीन मग तुह्मी कोणतेही प्रकारें तक्रार ऐकीली जाकार नाहीं. व खावटीचे रुपया बद्दल रीती तमाणें दावा करून या नोटीशीचें खर्चा सुद्धां रुपये भरून घेऊं ही नोटीस पावल्या पासून ८ दिवसांत कळवावें कळावें तारीख ३ माहे मार्च सन १८९० इ.

सही

जानकाबाई मर्दे गोविंद भारती वस्ती अकोलें निशानी हातची बांगडी असे.

---

## नोटीस.

रा. रा. कृष्णाजी दिनकर सहस्त्रबुद्धे सब ईंजीनीयर राहणार आकोलें हल्लीं मुक्काम खामगांव यास खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं आमचे घराचे दक्षीण बाजुच्या आमच्या भींती जवळ आपण आपल्या घरात भींत घालून इमारत वगैरे करीत आहा व दक्षीण बाजूच्या आमच्या भींतीस हवा व उजेड येण्या करितां आह्मी तशा खीडक्या मोठ्या मोठ्या ठेविल्या आहेत आपण भींत घालून जी इमारत करित आहा त्या मुळें आपल्या कडे येणारा उजेड व हवा बंद होऊन आह्मांस आमचे जागेचा निरोपयोग होऊन आमचे नुकसान होणार या करितां आपल्यास ह्या नोटीशीनें अगाऊ कळविलें जातें कीं आमच्या तीन खीडक्याची हवा व उजेड बंद होऊं नये अशा तऱ्हेची ईमारत बांधण्याची व्यवस्था आपण ठेवावी ईमारतीचे काम चाललेलें आहे या वरून असें दिसते कीं काम फार ज्यारीनें व जलदिनें पुरे होणार आहे यस्तव आपणास अगाऊ कळविलें आहें नोटीस पावल्या बराबर नोटीसात लिहीले प्रमाणें आमच्या खीडक्या करून उजेड व हवा बंद होऊ नये असें न जल्यास आम्हस आपल्यावर काम चालूकरावे लागेल म्हणून ही नोटीस दिली.

सही

बनशिला० फकीरचंद राहणार अकोलें दस्तुर खुद्द

---

नोटीस

मेहेरबान ज्यांगरजी रुस्तुमजी सेट आणि बैजमजी पालनजी पार्शी वानीसे जिनींग कंपनीचे मालक राहणार हल्ली दर्यापुर जिल्हे ईलीचपुर यासी खाली सहीकरणार याजकडून नोटीस व नोटीसीचा जबाब देण्यांत येतें कीं आम्ही आपले कारखान्यास जळाऊ लाकडें वाळली टण ७५ ओली टण ३०० एकुन ३७५ टंन दिल्हीं त्यानपैकीं आम्हांस रुपये ६८० साहासे अंशी दिल्हे बाकी येणें रुपये १२७० बारासे सतर नोघत असलेले फारवेळा मागीतले असोन दिल्हे नाही त्यानमुळें आमची फार नुकसान होत आहे असे आपणांस बारंवार कळवित असता व आम्हांस ( बंने ) लाकडाचे घेण्याची वगैरे हरकत येते असें सांगत असतां कांहींच दाद घेतली नाही व आम्हांसच हल्ली विनाकारण नोटीस कळेल तैशी दिल्ही तरी त्यातील आम्ही कांहीं एक जबाबदार नाहीं व आम्हांस पैला बक्षीर न देतां व जें माप घेतलें तेही छळून औलीचे वाळुनच घेतले आम्ही गरीब मानसें लाचार होऊन आम्हांस हल्ली सावकार कर्जही देईनासे जाले व सावकाराचे कर्ज काहडून माल दिल्हा याजमुळें तुम्ही एकंदर आमची फारच मोठी सर्व प्रकारें नुकसानी केली सबब आपणांस मेहेरबाणीने कळवितो कीं नोटीस पावल्या पासोन ८ आठ दिवसाचे आत आमची रकम येणें रुपये १२७० बारासे सतर वरील सर्व जालेल्या नुकसानी सुद्धा देऊन नीकाल करावा या प्रमाणें न केल्यास आपणावर आम्हांस रीतीप्रमाणें दावा करणें भाग होऊन खर्चा सुद्धा आपणास देणें लागेल कळावे ता० ३।३।९०

सही

रामा वल्लद माहादु कैळाले राहणार मोर्तीजापुर दस्तुर खुद्द.

आबा वल्लद अन्या बाढीकर राहणार मोर्तीजापुर नीशानी खुद्द.

वऱ्हाड समाचार

---

## जाहीरात

ता. १९ माहे ज्यानेवारी सन १८९० इ० रोजीं अकोलें येथें जमेदार लोकांची सभा भरली होती. त्यांत वऱ्हाडच्या सर्व जमेदार लोकां करितां एक सभा स्थापन करणें इष्ठ आहे असें ठरलें आहे. परंतु त्यां संबंधानें सर्वांचे मत घेण्या करितां पुनः जाहिरसभा भरवावी असें ठरल्या प्रमाणें वऱ्हाडचे जमेदार लोकांची जाहिरसभा रवीवार तारीख २३ मार्च सन १८९० रोजीं अकोलें येथें भरणार आहे. व त्या संबधानें निमंत्रण चिठ्या प्रत्येक तालुक्यांत सर्वांना पावत्या करण्या करितां पाठीवल्या आहेत. तरी नजर चुकीनें किंव इतर कारणामुळें जर एकाद्या जमेदारास चीठ्ठी पोचली नाहीं तर त्यास आमची सविनय अशीं प्रार्थना आहेकीं त्यांनीं आपणास बोलावणें नाहीं असें समजूं नये. व समाजास अगत्य येण्याचे करावें. व आपल्याच्यानें होईल ती मदत समाजास द्यावी कळावे हे विनंती

अकोलें ता. ११-२-८० गोविंद विश्वनाथ देशपांडे सभेचे सेक्रेटरी.

---

## पाक.

सालंमीश्री पाक घेतला असतां धातुची मजबुती होऊन शक्ती वाढते दर दिवस ३ तोळे प्रमाणें ४५ दिवस घ्या.

बदाम पाक घेतला असता, मस्तकांतील उष्णता दूर होते डोळ्यास थंडावा येतो धातु पुष्ट होते बळयेते दरदिवस ३ तोळे प्रमाणें ३० दिवस घ्या.

गोखरूचा पाक घेतला असतां मूत्र मार्गात होणारी आग, तिडका, जुनापरमा, मेहरोग मूत्र पुष्कळ आणि गढूळ होते तो तो, हे रोग दूर होऊन धातु शुद्ध होते बळ येते स्त्री संगाची इच्छा होते दर दिवस ३ तोळे प्रमाणें ६० दिवस घ्या.

कोहळे फळाचा पाक घेतला असतां डोळ्यास येणारी अंधारी भोवळ पिताचे उपद्रव हे रोग दूर होऊन रक्त शुद्ध होते धातु पुष्ट होते बळयेतें दरादिवस ३ तोळे प्रमाणें ४५ दिवस घ्या.

वर लिहीलेले पाक मागविण्याची रीत

| तोळे | किंमत रुपये | पोष्टेज |
|---|---|---|
| १६ | १ | ०९ |
| ३२ | २ | ०१३ |
| ४८ | ३ | ०१३ |
| ६४ | ४ | १०१ |
| ८० एकशेर | ५ | पोष्टेज माफ. |

पत्ता गजानन बाळकृष्ण वैशंपायन पेठ सदाशिव पुणें.—

---

## जाहीरात

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं अकोलें मुनासिपाल कमेटीचे हद्दीतील बाजार कर वसूल करण्याचे हक्कांचा, स्लाटर हाऊसचा कमेटीचे हद्दीतील कचरा वाहून नेण्याचा, स्टेशन जवळील धर्मशाळेचा सन १८९०।९१ सालाकारितां लीलाव तारिख २४-३-९० रोजी सकाळीं ७॥ वाजतां टौनहालांत होणार आहे ज्यांस घेण्याविषयीं इच्छा असेल त्यांनीं सदरहु तारखेस हजर राहण्याची तजवीज करावी कळावें तारिख २२ माहे फेब्रुवारी सन १८९० इ०

Krishanaji Mulbar.
Secretary
Akola

---

☞ हें पत्र अकोला येथें कै. वासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

वर्षाची अगाऊ रु० ५ डांक हाशील ०१३
सहामाही " ३ " ०८
सालअखेर " ७ " १०८
केरकोळ अंकास....................०४
नोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस ........०१

per annum in advance 5 Postage 13 as
Per annum in arrears 7 "1Rs. 8 as
Six monthly............3 " 8 as
Single copy..............................4as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

Advertisements
Below 10 lines... 2Rs
per line over10...4 as
Repetition per line3as

VOLXXIV AKOLA MONDAY 24 MARCH 1890 NO II.

वर्ष २४ अकोला सोमवार तारीख २४ माहे मार्च सन १८९० इ० अंक ११.

## पाक.

सालंमीश्री पाक घेतला असतां धातुची मजबुती होऊन शक्ती वाढते दर दिवस २ तोळे प्रमाणें ४५ दिवस ध्या.

बदाम पाक घेतला असता, मस्तकांतील उष्णता दूर होते डोळ्यास थंडावा येतो धातु पुष्ट होते बळयेते दरदिवस २ तोळे प्रमाणें ३० दिवस ध्या.

गोखरूचा पाक घेतला असतां मूत्र मार्गात होणारी आग, तिडक, जुनापरमा, मेहरोग मूत्र पुष्कळ आणि गढूळ होते तो हे रोग दूर होऊन धातु शुद्ध होते बळ येते स्त्री संगाची इच्छा होते दर दिवस २ तोळे प्रमाणें ६० दिवस ध्या.

कोहळे फळाचा पाक घेतला असतां डोळ्यास येणारी अंधारी भोवळ पिताचे उपद्रव हे रोग दूर होऊन रक्तशुद्ध होते धातु पुष्ट होते बळयेतें दरादिवस २ तोळे प्रमाणें ४१ दिवस ध्या.

वर लिहिलेले पाक मागविण्याची रीत

| तोळे | किंमत रुपये | पोष्टेज |
|---|---|---|
| १६ | १ | ०९ |
| ३२ | २ | ०१३ |
| ४८ | ३ | ०१३ |
| ६४ | ४ | १०१ |
| ८० एकशेर | ५ | पोष्टेज माफ |

पत्ता गजानन बाळकृष्ण वैशंपायन पेठ सदाशिव पुणें.—

## जाहीरात

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं अकोलें म्युनसिपाल कमेटीचे हद्दीतील बाजार कर वसूल करण्याचे हक्कांचा, स्लाटर हाऊसचा कमेटीचे हद्दीतील कचरा वाहून नेण्याचा, स्टेशन जवळील धर्मशाळेचा सन १८९०।९१ सालाकारितां लीलाव तारीख २४ ३.९० रोजीं सकाळीं ७॥ वाजतां टौनहालांत होणार आहे ज्यांस घेण्याविषयीं इच्छा असेल त्यांनीं सदरहु तारखेस हजर राहण्याची तजवीज करावी कळावें तारीख २२ माहे फेब्रुवारी सन १८९० इ०

Krishanaji Mulhar.
Secretary
Akola

## पुण्यातील वक्तृत्वोत्तेजक मंडळी.

सन १८९०.९१ सालचा भाषण समारंभ

पुण्यांतील वक्तृत्वोत्तेजक मंडळीचा चालूं सालचा भाषण समारंभ तारीख ३ माहे मे शनवार सन १८९० पासून सुरू होईल विषय व बक्षिसें खालीं लिहिल्याप्रमाणें ठेविलीं आहेत.

विषय.

१ ला. पार्लमेंट सभेपुढें ब्राडला साहेब याणी इकडील कौन्सिलाबद्दल कायद्याचा मसुदा वाचल्यानंतर हिंदुस्थानांतून आलेल्या डेलिगेटांनीं आपले विचार प्रदर्शित करावे अशी पार्लमेंटानें आपली इच्छा दर्शविली अशी कल्पना करून वक्त्यानें आपण हिंदुस्थान वासी जनांचे डेलिगेट आहो असें समजून कौन्सिलच्या सुधारणेबद्दल हिंदुस्थानांतील लोकांचे काय विचार आहेत व त्यांचें ह्मणणें पार्लमेंटानें कां कबूल करावें याविषयीं भाषण करावें.

२ रा. हल्ली आम्ही स्त्रियांस कोणत्या रीतीनें वागवितो, त्यांच्याशी योग्य वागणूक होण्यास आपल्या वर्तनात कांहीं फरक झाले. पाहिजेत किंवा कसे? हल्लीच्या वागणुकींत स्त्रीयांवर सक्ती होत असल्यास ती कोणत्या बाबतींत होत आहे. ती कोणत्या उपायांनीं नाहींशी करतां येईल. ते उपाय सांगणें व स्त्रीयाशीं योग्य वागणूक ठेवण्या विषयीं उपदेश करणें.

३रा. अभंग, माडगांवकृत गाथा अभंग ३४५८.

पवित्र ते कूळ पावन तो देश,॥
जेथें हरिचे दास घेती जन्म॥१॥
कर्मधर्म त्याचे जाला नारायण॥
त्याचेनी पावन तिन्ही लोक॥२॥
वर्ण अभिमानें कोण जाले पावन॥
ऐसे द्या सांगून मजपाशीं॥३॥
अत्यंजादि योनि तरल्या हरिभजनें॥
तयाची पुराणें भाट जाली॥४॥
\+ \+ \+ ×
याता यातीधर्म नाहीं विष्णुदासा
निर्णय हा ऐसा वेदशास्त्री ॥११॥
तुका ह्मणे तुह्मी विचारावे ग्रंथ॥
तारीले पतित नेणों किती ॥ १२ ॥

४ था.— अयत्या वेळचा

या चारी विषयांवर भाषण करणारांनीं कोणत्याही व्यक्तीस प्रत्यक्ष व परोक्ष रीतीनें अनुलक्षून बोलूं नये.

बक्षिसें व गुण

वरील चार विषयांतून इच्छेस येईल तो (एकच) विषय घ्यावा पहिल्या विषयांस ४० रुपयांचे एक व दुसरे रु. २० चे कैलासवासी रावबहादुर नानाशास्त्री आपटे यांचे; व दुसरे विषयास रु० ४० चे एक व दुसरें रु० १५ चे तिसऱ्या विषयास मंडळीच्या फंडापैकी रु. १५ व कैलासवासी रावबहादुर विष्णु परशराम रानडे यांचे स्मारक फंडापैकीं रु. २५ एकूण रु. ४० चे एक व दुसरे रु. २० चे श्री० कै० यशवंतराव गोपाळराव भैराळ यांचे नावचे आयत्या वेळचे विषयास बक्षीस रु० ४० चे एकच आहे. आयत्या वेळचे विषय समारंभाचे पहिले दिवशी कळविण्यांत येतील बक्षीस मिळण्यास १०० गुणातून निदान ५० गुण आले पाहिजेत.

पहिले विषयात पहिले बक्षीस मिळविणारानें जर करितां शेकडा ७० गुणापेक्षां जास्त मिळविले तर त्यास पहिले बक्षीस रु ४० चे आहे त्या ठिकाणीं रु. ५० चें बक्षीस मिळेल.

उमेदवारांच्या समजुती साठीं सूचना.

प्रत्येक भाषणास अर्धा तास दिला जाईल, परंतु अवश्य वाटल्यास ती वेळ कमी अथवा जास्त करण्याला अधिकार परीक्षकांस आहे भाषणांत विषयाची जुळणी त्यांचें प्रतिपादन, श्रोत्यांच्या मनांत उतरून देण्याची शैली या गुणांकडे विशेष लक्ष दिले जाईल. परीक्षक ज्यांची भाषणें पसंत करतील त्या उमेदवारांनीं त्यानीं केलेल्या भाषणाचा लेखी गोषवारा चिटणीसास आणून दिला पाहिजे पहिल्या तीन विषयांवरील भाषण करणाराचे वय १८ वर्षांपेक्षां कमी नसावें. व चवथ्या विषयावर भाषण करणाऱ्या उमेद वाराचे वय २२ वर्षा पेक्षां कमी नसावें.

२ भाषण करण्यास येऊं इच्छिणाऱ्या उमवारानें एक रुपया आपल्या अर्जा सोबत पाठवावा. ज्याचा रुपया येणार नाहीं, त्याचा अर्ज घेतला जाणार नाहीं सेक्रेटरी ज्या दिवशीं व ज्या वेळेस उमेदवारानें घेतलेल्या विषयावर भाषण करण्यास सांगतील त्या दिवशीं व त्या वेळेस उमेदवारांनीं हजर असून भाषण करण्यास उभे राहिले पाहिजे. असें उमेदवार जरी पास झाले नाहींत किंवा त्यांचीं भाषणें मंडळींनीं समग्र ऐकून न घेतल्या मुळें त्यांस आपलें भाषण थांबवून जरी परत जावे लागले, तरी त्यांचा रुपया परत दिला जाईल. वरलिहिल्या प्रमाणें सेक्रेटरी सांगतील त्या वेळीं उमेदवार हजर नसतील किंवा हजर असून भाषण करण्यास येणार नाहींत, तर त्यांचा रुपया परत दिला जाणार नाहीं, व गैरहजर असलेल्या उमेदवारांचा मागाहून भाषण करण्याचा हक्क राहणार नाहीं.

अर्जे ता० २५ एप्रील सन १८९० चे आंत खालीं सही करणारांचे नावें 'पेठबुधवार कोतवाल चावडी नजीक नेटिव जनरल लायब्ररी" ह्या पत्यावर पाठवावे त्यांत प्रत्येक उमदवारानें आपलें नांव, बापाचे नांव आडनांव, धंदा, पत्ता व गांवाचें नांव आणि त्यानें घेतलेला विषय अशीं स्पष्ट लिहावीं. नाटपेडपत्र घेतले जाणार नाहीं उमेदवारांनीं भाषण समारंभाचे अगोदर एक दिवस चिटणिसांस येऊन भेटावे व जे न भेटतील ते भाषण करण्यास येत नाहींत, असें समजून व्यवस्था करण्यांत येईल.

ता० ५।२।९० इ०

वामनराव विष्णु लेले,
कृष्णराव बापूजी मांडे
पुण्यांतील व० मंडळीचे चिटणीस

## पत्रव्यवहार.

ह्या सदरा खालील मजकूर पत्र कर्त्यांच्या मतास मिळूनच असेल असें समजूं नये.

पुसद वऱ्हाड
ता० १३ मार्च १८९०

हवामानः— उन्हाळा सुरु झाल्यापासून उष्णता दिवसेंदिवस वाढत आहे. सायंकाळीं अभ्रें येतात त्यामुळें फारच काहाली होते.

मेहरबान एज्युकेशनल इन्स्पेक्टर ह्यांची स्वारी ह्या तालुक्यांत फिरत आहे. त्यांनीं येथील मराठी व हिंदुस्थानी अशा दोन्ही शाळा तपासल्या. तसेंच हिंदुस्थानी डे. ए. इन्स्पेक्टर साहेब यांनीं हिंदुस्थानी शाळेचा वार्षिक तपासणी केली आतां ह्या शाळेंत चौथी ईयत्ता सुरू होईल.

मेहरबान टेलर साहेब डेपुटी कानसरव्हेटर आफ फारिष्ट यांची स्वारी कानसरव्हेटर साहेबाबरोबर ह्या तालुक्यांत तपासणी करून गेली.

यात्राः— येथून ३ मैलावर मोहे येथें यात्रा भरत असते गेले सालीं हवेच्या उपद्रवामुळें ही यात्रा भरली नव्हती, ती यंदा सालाबाद प्रमाणें भरली. ह्या यात्रेंत भांड्यांची घडामोड विशेष होते, कारण इकडे भांडें विकणाऱ्या कासारांची स्थाईक दुकानें मुळींच नाहींत. कपडा व किराण्याची विक्री फारशी होत नाहीं. आणि यंदा लग्न सराई नसल्यामुळें कपड्याची विक्री फारच कमी झाली. यात्रेंत दुकानें वगैरे बसविण्याचें संबंधानें व्यवस्था न व्हती. इकडे अधिकाऱ्यांनीं लक्ष पोहचवून पुढील सालीं त्यांनीं चांगली व्यवस्था राहील अशी तजवीज करावी अशी माझी त्यांस विनंती आहे.

कोर्टः— येथें आलेल्या कोर्टांत फारसे मोकदमे झाले नाहींत अर्ज घेण्याची एक ठरीव वेळ नसते ह्यामुळें अर्जदारांस फार त्रास पडतो. काम वेळच्या वेळेस झाले ह्मणजे बाहेर गांवच्या गरीब लोकांस फारच सोईचे पडेल आणि ते लोक सरकारास व अधिकाऱ्यांस दुवा देतील.

येथें सांगलीकर व पुणेकर अशी दोन नाटकें आलीं होतीं. दोन्ही साधारणच होती तरी येथील हौशी लोकांची त्या योगानें बरीच करमणूक झाली.

शिमगा हा सण यंदा सालाबादप्रमाणें पार पडला पण ह्यासालीं एक विशेष गोष्ट झाली ती ही कीं एका मोठ्या गृहस्थानें आपल्या घरीं नाच करवून तो पहाण्यास गांवांतील लोकांस बोलावून नेलें होतें. कोणीं पहिल्या बोलावण्यास दाद दिली नाहीं तर त्यास दोनतीन वेळा बोलावणी होत असतें, तेव्हां त्यापैकीं कित्येकांस निरुपायानें मोठ्या गृहस्थाची मर्जी संभाळण्या करितां आपल्या स्वतःच्या मर्जी विरुद्ध जावें लागले असेल पण करतो काय बिचारा " सत्तेपुढें शहाणपण

चालत नाहीं" हें वाक्य आठवून उगाच बसला असेल. एकंदरींत वजनदार शहाण्या माणसांनीं आपल्या भोंवतालच्या लोकांस चांगला मार्ग दाखवून त्यांस नीतिमान करण्याचा प्रयत्न करावयाचा तो न करितां उलटें शिमग्याच्या निमित्तानें त्यास विरुद्ध दिशेस नेलें, ह्यांत संशय नाहीं. असो यंदा झालें ते झालें, पण पुढें तरी त्याचे हातून अशा गोष्टी होऊं नये अशी माझी त्यांस हात जोडून विनंती आहे. ज्या लोकास आपल्या स्वतःच्या मर्जीविरुद्ध यावें लागलें असेल, त्यांची रात्रीची विश्रांती (झोंप) नाहींशी झाली असेल आणि दिवसास मेहनत करून त्यांनी जी कमाई केली असेल तिचा कांहीं अंश अनीति प्रसारक लोकांच्या पोषणाकरितां खर्च झाला ह्मणून त्यांचे मन त्यास खात असेल, ह्यांत संशय नाहीं.

येथें दवाखाना बांधावयाचा आहे त्याच्या इमारतीच्या कामास एकदांची सुरवात झाली.

आपला एक
"मित्र"

## वऱ्हाडसमाचार.

मिती चैत्र शुद्ध ४ शके १८१२

## वऱ्हाडांतील देशमुख देशपांडे वगैरे जमेदार व इतर वतनदार मंडळींची सभा.

पूर्वी ठरल्याप्रमाणें ही सभा येथील लायब्ररीजवळ मुद्दाम उभारलेल्या सुशोभित मंडपांत काल सायंकाळीं भरली होती. तींत खालीं लिहिल्याप्रमाणें कामें झालीं.

प्रथम गोविंद विश्वनाथ यांनीं आलेल्या लोकांचें स्वागत केलें. नंतर रा. रा. मुकुंदराव नंदाजी यांनीं सूचना केली रा. रा. भगवंतराव देशमुख यांनीं अध्यक्षस्थान स्विकारावें त्याला रा. रा. त्रिंबकराव देशपांडे कुरम यांनीं अनुमोदन दिलें त्याप्रमाणें रा. भगवंतराव यांनीं स्थान स्विकारून सभेचा उद्देश थोडक्यांत कळविला व दोन बोधाचे शब्द बोलले ते ह्मणाले—

आपण सर्व गृहस्थांनीं मजला हा मान दिला याजबद्दल मी आपला पूर्णपणें आभार मानण्यास खरोखर असमर्थ आहे. आपण हा समाज स्थापन करतो याचा उद्देश लोकांत बेदिली उत्पन्न करावी असा नसोन त्याचे उलट आहे आपल्या आपापसांत क्षुल्लक कारणावरून नेहमीं वाद होतात एकोप्याने जन्मोजन्मीचे दोष वाढत जातात ते मोडून सर्वांत ऐक्य व्हावें सुखदुःख परस्परास कळून त्याचा चांगल्या रीतीनें निकाल लागावा हा मुख्य उद्देश आहे.

अशा प्रकारच्या सभा स्थापन करण्यास आणि उघड रितीनें अशा प्रकारचे विचार करण्यास आपल्यांत सामर्थ्य आलें आपण अशा गोष्टी करूं लागलों आहों या सर्वांस कारण आपलें साप्रतचें न्यायी राज्य व्यवस्था कारण आहे. हे सर्वांनीं लक्षांत ठेविलें पाहिजे कीं सरकारचा आणि आपला संबंध बापलेकांचा आहे. बाप आपले मुलास विद्या शिकवितो, व्यवहार शिकवितो आणि मुलगा विद्या शिकून व्यवहार शिकून आपला प्रपंच चालविण्यास समर्थ झाला म्हणजे बापांस ज्या प्रमाणें आनंद होतो त्या प्रमाणें इंग्रज सरकार आपल्या कल्याणाकरितां लक्षावधी काड्यावधी रुपये खर्च करून लोकांच्या हातानें विद्या शिकवीत आहे. राज्य कारभाराचें ज्ञान आम्हांस व्हावें म्हणून बतावतानें आम्हांस आमचे मगदूर पाहून अधिकार देत आहे. ह्या सर्व देणग्यांचा आपण चांगला उपयोग केला व दिलेल्या देणगीस आपण लायक आहों असें आपल्या वागणुकीनें सिद्ध करून दिलें तर अर्थातच सरकारास समाधान वाटेल.

ही सभा अमुक एका वर्गाच्या वतनदाराकरितां आहे किंवा एका वर्गाच्या हिताच्या गोष्टी या सभेच्या हातून होतील असें नाहीं ज्या वतनदारास आपल्या वतन संबंधी आपसांत निकाल करावयाचे असतील ते या सभेचे हातून होईल तें पर्यंत होत जाईल. तसेंच आपल्यास आलेलें जें उत्पन्न सरकारातून मिळण्या सारखें असून आपल्या हयगयी मुळें आजपर्यंत आपणास मिळालें नाहीं तसें उत्पन्न मिळण्याची खटपट करावी. सरकारांत अर्ज मारुजा करावा हा या सभेचा उद्देश आहे व परमेश्वराचे कृपेनें आमच्या उद्योगास यश आलें तर आपण आपल्या वतनदार वंशांत उत्पन्न झाल्या सारखें कांहीं तरी केलें असें होईल.

एक गोष्ट मात्र सर्वांनीं लक्षांत ठेविली पाहिजे कीं आपलें सरकार न्यायी आहेत, दयाळू आहेत कोणास कोणत्या तऱ्हेनें वागविलें पाहिजे हें सरकार पूर्णपणें जाणून आहे ह्यास्तव आपण जे कांहीं बोलावयाचें किंवा करावयाचें तें फार सभ्यपणानें व शहाणपणानें मर्यादशीलपणानें बोललें पाहिजे व केलें पाहिजे सरकाराशीं अर्जमारुजा करावयाचा तो तरी फार सभ्यपणानें केला पाहिजे कारण ही सभा स्थापन केली ह्मणून सरकाराशीं आपण भांडण्यास उभे राहिलों असें मुळींच नाहीं सभ्यपणानें जीं कामें होतात तीं दांडगाईनें होत नाहींत हें लक्षांत ठेवून सभेचें काम चलवावें अशी माझी सर्वांस विनंती आहे.

त्या नंतर रा. रामराव गोपाळ यांनीं अशी सुचना केली कीं, वऱ्हाडांत सर्व वतनदार लोकांची एक कायमची सभा असावी. त्यास रा. संपतराव प्रभाकर देशमुख मलकापूर यांनीं अनुमोदन दिलें व ती सूचना सर्वानुमतें पसार झाली.

सुचना २ री पांडुरंग बापुजी कुळकर्णी यांनीं सुचना केली कीं ह्या सभेस वऱ्हाड वतनदार सभा, असें नांव द्यावें. व सर्वांच्या मतानें ही सुचना पसार झाली.

सुचना ३ री ह्या सभेतील प्रत्येक जमेदारानीं ह्मणजे देशमुख देशपांड्यानीं १३ वर्षे पर्यंत किंवा या मुदतीच्या आंत दुसरी एखादी कायमची योजना होई पर्यंत आपल्या हिशाचा जे दरसालचें उत्पन्न मिळत असेल त्यावर दर रुपयास अर्धा आणा प्रमाणें दरसाल देत जावें. व अशा बद्दल ह्या सभेचे वेळोवेळीं होणाऱ्या प्रेसिडेंट व्हाईस प्रेसिडेंटच्या नावाचा करार नामा करून द्यावा. त्या प्रमाणें ह्या सभेच्या खटपटीनें जर एखादी बाब सरकारांतून सुटल्या मुळें कांहीं पैसा मिळाल्यास एक वर्षाचा पैसा या सभेच्या फंडास द्यावा. त्याच प्रमाणें या सभेचे होऊं इच्छिणाऱ्या सभासदांनीं प्रथम प्रवेश फी ३ रुपये द्यावा व पुढें दरसाल १ रुपया देत जावा. येणें प्रमाणें न केल्यास त्या वतनदाराचें नांव काढण्यांत येईल. येणें प्रमाणें सुचना पसार झाली.

सुचना ४ थी. सभेचें काम करण्या करितां खालील लोक प्रेसिडेंट व व्हाईस प्रेसिडेंट असावेत.

रा. रा. भगवंतराव शंकरराव देशमुख दर्यापूर यास कायमचे प्रेसिडेंट नेमावें. व रा. रा. अमृतराव गोपाळ यांस म्यानेजिंग कमेटीचे अध्यक्ष नेमावें. व रा. रा. सखाराम जयकृष्ण देशपांडे बाळापूर, व्यंकटराव हनमंतराव देशमुख ईलिचपूर, पांडुरंग नारायण देशपांडे अमडापूर, गणपतराव देवगव देशमुख अंदुर, अमृतराव खुशालराव देशमुख देशपांडे मुर्तीजापूर, यांस व्हाईस प्रेसीडेंट नेमावें.

मुंबईस येणाऱ्या नव्या गव्हरनर साहेबास हल्लीं पंत मेजवान्या वर मेजवान्या चालल्या आहेत. मागचा आठवडा तर फारच वर्दळींत गेला. सकाळीं एके ठिकाणीं मेजवानी तर संध्याकाळीं दुसरे ठिकाणीं. फुरसत म्हणून बिलकुल नसे. मेजवान्यांच्या सपाट्यांत अशी त्याची ओढाताण होत असतां हा सर्व स्नेही मंडळींच्या आमंत्रणाचा ते आनंदानें स्विकार करीत आहेत व मित्र मंडळीस संतोष देत आहेत या वरून एक असें दिसून येतें कीं ते शरीर प्रकृतीनें सदृढ असून अशा श्रमास न जुमानणारे आहेत परवा नुकतीच नार्थब्रुक हिंदक्लबानें यांना एक मोठी टालेंजंग व थाटामाटाची मेजवानी दिली. त्या वेळीं आपल्या इकडचे हिंदुपैकीं कुमार रामसिंगजी, कुमार रणजित सिंगजी, व दादाभाई नवरोजी वगैरे मंडळी हजर होती. आपल्या इकडेस मेजवानीच्या प्रसंगीं आपण इकडच्या तिकडच्या साधारण गप्पा मारीत असतो. तिकडेस अशा प्रसंगीं व्याख्यानें अगर संभाषणें होतात. वरील प्रसंगीं शेट दादाभाई नवरोजी यांनीं क्लबाच्या तर्फे व हिंदु लोकांच्या वतीनें लार्ड हारिस साहेबास गव्हरनरचा अधिकार प्राप्त झाल्या बद्दल आनंद प्रदर्शित केला. पारशी क्रिकेट खेळणारी मंडळी तिकडेस गेली होती त्या वेळीं मंडळीचें आगत स्वागत लॉर्ड हारिस साहेबांनीं फार उत्तम तऱ्हेनें केलें त्या बद्दल शेट साहेबांनीं त्याचे मंडळीच्या तर्फे आभार मानिले. लार्ड साहेब हे फार मोठ्या मनाचे दिलदार आहेत अशा संबंधानें भाषण करितांना ते म्हणाले:—इ. स. १८६८ सालीं मला एक निबंध लिहावयाचा होता. विषय सुशिक्षित नेटिव्ह लोकांची सचोटी व हुषारी हा होता. यांस संबंधानें आपणच आपल्या अनुभवाच्या आधारानें लिहण्या ऐवजी एखाद्या नावाजलेल्या उत्तम इंग्रजी सरकारी अधिकाऱ्याच्या आधारानें लिहिणें बरें असें मला वाटलें म्हणून त्या वेळीं सर्वांत श्रेष्ठ असे मद्रासचे गव्हरनर लार्ड हारिस यांचे मत घेण्याचा मी विचार केला. मी त्यांस पत्र लिहिलें. त्यांनीं मला लगेच जबाब दिला व मी जरी अगदीं अपरिचित होतों तरी मला त्यांनीं आपल्या भेटीचा हा लाभ दिला. त्यांचा जबाब फार थोडक्यांत आहे परंतु त्या वरून ते किती थोर होते हें दिसून येण्या सारखे आहे. तो जबाब असाः—

आपण केलेल्या चौकशीबद्दल जबाब देतांना मी मोठ्या आनंदानें आपणास कळवितो कीं माझे मद्रास शहरीं वास्तव्य असतांना माझा जो काय अनुभव आहे त्यावरून हिंदु सुशिक्षित लोकांच्या सचोटी व हुषारी संबंधानें माझें उत्तम मत होण्यास सबळ कारणें झालीं. या गुणाची परीक्षा पाहण्यास मला स्वतःला संधी मिळाली नाहीं खरी तथापि ज्यांस या गुणाचें परिक्षण करण्यास मजपेक्षां जास्त साधनें होतीं त्याच्या अनुभविक सांगण्यावरून मी असा निर्णय करूं शकतो कीं हिंदु सुशिक्षित लोक फार सचोटीनें वागणार आहेत व कोणत्याही खात्यांत कशाही जबाबदारीचें काम याच्यावर सोपलें तरी तें करण्या सारखे आहेत" वरील उद्गार लार्ड हारिस याच्या पंजाचे आहेत. याच्या ही अंगीं हें गुण आहेतच याच्या वराण्याचे सुशिक्षित वळण याचे ठायीं आहे हे स्पष्ट दाखविण्याकरितां मला एका गोष्टीचा जरूर उल्लेख केला पाहिजे. आपणास ज्या देशात जावयाचे व तेथील राज्य व्यवस्थेचे सूत्र हातीं घ्यावयाचे त्या देशातील वस्तुस्थिती व लोकस्थिती समजण्याकरितां जिकडून जें साधन मिळविता येईल तें मिळवावें या बुद्धीनें त्यानीं मि. ब्रॅडला साहेबांची भेट घेतली. व त्यांच्या बरोबर पुष्कळ वेळ बोलत बसले. लार्ड साहेबास कावसजी जाहांगीर याचे बंगल्यांत मेजवानी झाली. त्यावेळीं लंडन येथें असलेले हिंदु मुसलमान पारशी वगैरे मंडळीचा बराच जमाव जमला होता. या मंडळीच्या वतीनें मानपत्र देण्यांत आलें. मानपत्र जबाब देतांना लार्ड साहेब ह्मणाले हिंदुस्थानदेश मला मुळींच परका नाहीं. आज एक शतक झालें त्या देशाशीं माझा संबंध जडला आहे. तथापि माझे हातून काय घडणार हे बोलून दाखविणें मला प्रशस्त दिसत नाहीं जें घडेल तें खरें.


ADVERTISEMENT.

It is hereby notified for general information that an election will be held to fill up the vacancy created by the resignation of Mr. F. Rose Municipal Member for Ward No. 3 at the Town Hall on the 10th April 1890 between 8 A. M. and 5 P. M.

Mr. Ganesh Bapuji Tahasildar will, as a polling officer receive candidates nomination papers.

Dated Akola 22nd March 1890

Krishnaji Malhar
Secretary
Akola Municipal Committee.



The Berar Samachar

MONDAY MARCH 24 1890.


## SIGNS OF THE TIMES.

(Continued from our issue of 3rd Instt.)

Of late there has been such a strong

desire on the part of the public that the dramatic performances of the country should be fashioned after the English manner. The late Mr. Anna Kirloskar introduced the system of performances on the fashion of English opera; and he was adored by the whole Maratha public. We had an opportunity of witnessing these new ways of dramatic performances and we must confess that they feed passions already powerful in human breasts. We do not say that such performances should have no place in the public liking but that they should certainly not absorb the public mind in the way that they at present do. Those of the performances which were in vogue before Mr. Kirloskar introduced the new system were to a certain extent superior. Their superiority consisted in the fact that they made a religiously disposed mind more religious. Traditional history of India which is now seldom studied was brought before the public in actual form; and in this particular they were a lesson not to be easily forgotten of the glorious past of this country. In the new system love is all in all. In the old system there was love but that love produced in the mind feelings of veneration. Sita's devotion to Rama, and Rama's devotion towards Sita, Krishna's love of his sister Draupadi and numerable other portions in the old performances were portions that taught lessons of morality and fitted the mind for higher ideas. These were the performances where respectable ladies could go and see without any danger to their morals; while these are the performances where ladies ought not to be taken; notwithstanding all there serious disqualifications in the present system it is liked by the public. The fact is that men's minds are led away by the glitter and passions and as a consequence tastes have been perverted. We are fast losing our hold of the past and there is every likelihood of our being driven towards complete ruin and therefore it is better that the public should now and then be reminded of the truthful valiant, and devoted Rama, of the unquestionable honesty of Harischandra, of the gigantic efforts for self improvement of Vishwamitra and the wonderful patience of Vasistha there and a host of other equally noble characters in the past should be brought before the public by the performances in old style. As we have said above we are led by the glitter and pleasurable sensations of the present and have found it convenient to leave that which is permanent and glorious. This is a sign of the times.

## SOME REFLECTIONS ON REPRESENTATIVE GOVERNMENT.

( Communicated )

( Continued from our last issue )

We have only to find out the conditions for ensuring the different elements of social welbing and that Govt is the best which possesses such conditions in the greatest degree. The attempt has been made for such a classification but its only result is the division of the exigencies of society into two heads: order and progress or permanence and progress in the words of Colridge. But this division however useful for purposes of popular discourse, is unscientific and inaccurate. For progress and order differ only in degree not in kind. Whatever tends to preserve order is also some aid to progress. And we have no real progress unless the agency which brings about progress also preserves order. The same mental qualities that conduce to preserve order, viz inducing justice, integrity and prudance, serve alike to promote progress. Only we need more of these qualities to promote progress than merely to keep up our present possessions. The qualities that have special reference to add to our present possessions viz activity, enterprise, originality & courage are fully as much required for preserving the good we have. Only a some what less amount of them will suffice for the purposes of permanence or order.

Also the external contrivances in politics serve equally to preserve permanence and promote progress. Take for instance, the common institution of a Police. Its most immediate object seems to be to preserve order. But does not the sense of greater security of property give rise to greater production, which is progress in its faminar and vulgar aspect Does not the repression of crime speritually elevate the people by removing their evil tendencies. Does not the sense of security set free a man's mind to be employed in any new effort? Does it not make him look upon his neighbour as a friend rather than as an enemy. And are not these feelings kindness and fellowships and interests in the general well being of the community important parts of social improvement.

This same is true with respect to a good system of taxation and finance. A just distribution of that, such as does not impede industry and interfere with the liberty of the citizen not only preserves but increases the national wealth.

Thus Progress and Permanence are not antithetic lists and are improperly contrasted. Progress includes order. Progress is a permanence and something more. Progress is a higher degree of that of which order is a less conduciveness to progress, used in this sense then, includes the whole excellence of Govt. But the word progress is somewhat ambiguous. We want to express by it the idea of moving onward as well as that of prevention of falling back; where as in popular language it suggests the first idea alone. But the second is quite as important as the first. We want to guard against retrograding in ancient times. Politics was confined to the latter alone, the natural tendency of men being to degenerate. Even now, we have an incessant stream in human affairs towards the worse in the form of all the follies and wickedness of mankind. Suggesting, prominently as it does, the idea of moving onward, the word progress does not adequately represent constant endeavours that are made to improve and elevate the human race morally and spiritually. A small diminution of these efforts would tend to rapid deterioration from which it is difficult to rise again. For these reasons, the words progress and order are unapt for a philosophical classification. Only they represent two antithetic types of character. In some minds, caution in others boldness predominates. The sentiment, in some, to preserve what they have got is stronger than that which promotes to acquire new advantages. Others are more anxious to acquire new things than careful of their present possessions. We must take care, to admit both these types in due proportions in the personal of any political body, so that the excesses and extravagances of the one may be tempered by the cautious attitude of the others.

We must proceed now to find out some other division of social exigences since the one most commonly accepted is not scientific.

The most important condition of the goodness of the Govt. must neceesarily be the qualities of the human beings over whom the Govt. is to be exercised *i. e.* the the most perfect system of judicature, in which the mere machinery and rules from an important item, will hopelessly fail if the morality of the society is such that all the witnesses lie and the judges freely take bribes. Similarly, a popular representative system, in which votes are sold to the highest bidder, and the elected representatives are open to corruption, is as positive evil. In a state of society, whose members are selfish and jealous of those who are in power, we must not expect a good Govt. It is only the gradual improvement of a people in intellectual and moral qualities that makes a good Govt. possible. Therefore that Govt. is the best which promotes virtue and intelligence in the people. In other words, a Govt. which has a good system of national education possesses the most important point of excellence. Secondly, we must look to the machinery of govt., the apparatus by means of which public business is transacted. The contrivances must be such as to utilize the highest virtue any intelligence available.

(To be continued).

पोंचः— एक कनवाळू जिल्हा बाळाजी का वशीम पत्र पावले स्थल संकोचास्तव पुढील अंकी घेऊ.

## वऱ्हाड

रा. रा दमोदर नाराजी क्लार्क स्मालकाज कोर्ट अकोला हे अक्टोबर १८८९ मध्यें झालेल्या डिपाट मेंटल परीक्षेंत हायर स्टांडर्ड मध्यें पास झाले.

वऱ्हाड स्मालकाज कोर्टालॉ, कलम ५ ( १ ) प्रमाणें मि० माणकशा, ख्यामगांव यांस खामगाव आणि अकोला येथील स्मलकाज कोर्टाचे जज नेमले.

वऱ्हाड रूरल बोर्डलॉ कलम १३ (एफ) संबंधानें सन १८७१ च्या गुरांच्या अतिक्रमणाच्या कायद्याचें कलम ४ यांत सांगितलेलीं जिल्हा माजिस्त्रेटांचीं कामें, उमरावती अकोला बुऱ्हाणें वाशीम आणि इलिचपूर येथील डिस्ट्रीक्ट बोर्डाकडे दिलीं आहेत.

पंडित सुरज नारायण अ. क. यांस वाशाम जिल्ह्याचे डिस्ट्रीक्ट रजिस्ट्रार नेमले.

मि० एच. गाडविन आस्टिन अ. क. यांस एलिचपूर जिल्ह्याचे डिस्ट्रिक्ट रजिष्टार नेमले

मि एदलजी संजाना, ए. अ. क. पहिल्या वर्गाचे माजिस्ट्रेटाचे अधिकार मिळाले. आणि शिवाय क्रि प्रो. कोड कलम ११०, ए ( १ ), १३३ बी ( २ ) आणि १९१ सी ( ९ ) प्रमाणे अधिकार मिळाले.

बांबे बाईलर आक्ट, कलम १७ प्रमाणें, मुंबई इलाख्या करिता जे बोर्ड आफ एक्झामिनर्स नेमिले आहेत तेंच वऱ्हाड साठीं नेमिले आहेत.

बांबे बाईलर आक्ट, कलम १९ फिकरा २ यांत म्हटलेला दाखला देण्यास, बोर्ड आफ ट्रेड, कलकत्ता मराईन बोर्ड बरमा बाइलर आक्ट बोर्ड, स्ट्रेट्स सेटलमेंट बोर्ड हीं लायक मानिलीं आहेत.

मेजर एच. सी. कार्क्स. आर. ई. एक्झिक्युटिव्ह एजिनियर फर्स्टग्रेट मि. ई. जान्स्टन अ. एजिनियर; मि. डब्ल्यु. कारले, आन्नररी आसिस्टंट एजिनियर, फर्स्टग्रेट हैद्राबाद यांच्या लष्करी खात्यांत तूर्त बदल्या झाल्या.

मि. लिव्हेयार्ड एक्झिक्युटिव्ह एजिनियर हैद्राबाद यांचो बदलो बलुचिस्थानास झाली.

मे. निकोलेट साहेब यांस अकोल्यास व मे. बार्न हेस्टिंग्ज् साहेब यांस उमरावतीस डेपुटि कमिशनर नेमलें.

रा. रा. गणेश बापूजी यांस केळपुरास एक्स्ट्रा अ. कमिशनर नेमलें व रा. कृष्णाजी अनंत यांस येथें तहशिलदार नेमलें असे कळतें.

रा. रा. गोपाळ महादेव भिडे क्लार्क अफ कोर्ट बुलढाणें हे गेल्या बुधवारीं बुलढाण्यास निवर्तले हें कळविण्यास वाईट वाटतें यांस बरेंच दिवसांपासून काळजाचा रोग होता व त्याच योगें ते निवर्तले असें म्हणतात.

रा. रा. गोपाळ बळवंत यांस मुर्तिजापुरास तहशिलदार नेमलें.

## जाहिरात.

सर्व लोकास कळविण्यांत येते कीं आकोल्यास अठवड्यातून दोन बाजार भरावे असें कार दिवसा पासून घाटत होते त्याप्रमाणे बाजार ता. २ एप्रील सन १८९० इसवी रोजी बुधवार आहे त्या दिवसा पासून बाजारें भरावित जावा अशा आकोले म्युनसीपल कमेटीचा ठराव जाला आहे सदरहु बाजारा करीतां जागा शहराचे पश्चिमेस सकीलेचे बाहेर तयार केली आहे करितां गावांतील व पेठेतील सर्व दुकानदार लोकांनीं सदरहु तारखे पासून सदरहू जागीं बाजार भरविण्याची तजवीज करावी ह्यापासून सर्व लोकांचा फायदा आहे. तुर्त बाजारा करितां जागा थोडी तयार केली आहे. बाजार जसजसा भरभराटीस येईल तसतसी जागा ज्यास्त तयार करण्यांत येईल रविवारचें बाजारास जशा सोई झाल्या आहेत तशा करून देण्यांत येतील ह्या बाजारांत दुकानदारांस बाजार बैठकी बद्दल तुर्त कर द्यावा लागणार नाहीं कळावें ता० २१।३।९० इ०

Krishnaji Mallaer.
Sceretary.
A. M. C.

## जाहिरात.

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं मेहरबान एफ. रोज मुनसिपल मेंबर वार्ड नंबर ३ ह्यांनीं राजीनामा दिल्या मुळें रिकामी झालेली जागा निवडणुकीनें भरण्या करितां तारीख १० माहे एप्रील सन १८९० इसवी रोजी सकाळी ८ वाजे पासून सांयकाळचे पांच वाजे पर्यंत टाउंनहालात सदहू वार्डातील लोकांचि मतें घेतली जातील.

मेहरबान गणेश बापुजी तहसिलदार यांस मतें घेण्या करितां पोलिंग आफिसर नेमिले आहे. तारीख २२ माहे मार्च सन १८९०

Krishanaji Mulhar.
Secretary
Akola

## जाहिरात.

सर्वत्र लोकांस या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं भंगीपटाचा नवीन लायसन्स घेण्याचें वर्ष ता० १ माहे एप्रील सन १८९० पासून सुरू होणार करितां ज्यांना आपापले पायखाने सुरू राहावेत व साफ केले जावेत अशी इच्छा असेल त्यांनीं ता० ५ एप्रील सन १८९० चे आंत पायखान्याचें लायसेन्स टौनहालांत येऊन घेऊन जावे. जे लोक सदरहु तारखेपावेतों लायसन्स घेणार नाहींत त्या लोकांचे पायखाने बंद केले जातील व ते साफ करण्याचे संबंधानें कमेटी जबाबदार राहणार नाहीं लायसन्स ता० १ एप्रील सन १८९० पासून सकाळचे साहावाजेपासून ११ वाजे पावेतों व दुपारी दोन वाजेपासून साहावाजे पवेतो मिळतील कळावे ता० २० मार्च सन १८९०

Krishnaji Mulle
Secretary Ak

## वर्तमानसार.

हल्लीं तापाच्या साथीपासुन इकार मरावयास लागले आहेत

—निजाम साहेब प्रतिवर्षी आपल्या राज्यत ४ विद्यार्थी चार वर्षें लंडनमध्यें राहून विद्याभ्यास करतील त्याजकरतां खर्च करण्यास तयार आहेत असें कळतें.

इंग्लडचे कर्ज—इंग्लंडचें राष्ट्रीय कर्ज १०३५ लक्ष पौंड आहे. एक पौंड म्हणजे १० रुपये असें धरिलें तरी त्या कर्जाचे १०३५०००००० रुपये इतके होतात

१८८९ सालीं ग्रेटब्रिटनची जमा ९७-१९००० व खर्च ९५२३००० पौंड होऊन १२६००० पौंड शिल्लक राहिली असें प्रसिद्ध झालें आहे.

ताशखंड रेल्वे येत्या मे महिन्यांत सुरू होईल.

नवीन जुगाराचा कायदा सिंध प्रांतासही लागू केला.

विलायतेंतील कित्येक बड्या पार्लमेंट मेंबरांत लठ्ठा लठ्ठी सुरू झाली आहे. ता० १ मिनहूच्या तारखे वरून समजतें कीं, ता २८ फेब्रुवारीच्या रात्रीं कामन्स सभेंत एक विलक्षण देखावा दृष्टीस पडला. मि० लाबोचीर याणी, विलायतच्या क्लेव्हलंड रस्त्यावर सृष्टीविरुद्ध कृत्यें करण्यांत येतात असें प्रसिद्ध झालें असून तीं कृत्यें करणारे लार्ड सामरशेट यास गुप्त रितीने लार्ड सालिसबरी मदत करीत आहेत व त्या बड्या शेटानें कायद्याच्या कातरींत सांपडूं नये म्हणून लार्ड सालिसबरी याणी गुप्त रितीनें खटपट चालविली आहे, असें बोलून दाखविलें व त्या वरून वरील देखावा झाला. ब्रिटिश कायद्याच्या हद्दपार होण्याच्या कामांत लार्ड सालिसबरी व इतर लोक लार्ड सामरशेट यांस गैरकायदा मदत करीत आहेत व त्यामुळें अन्याय होत आहे असें मि० लाबोचिर याणीं स्पष्ट बोलून दाखविलें मि० लाबोचिर यांचे हें म्हणणे निराधार असून अगदीं खोटें आहे असें अटर्नीजनरल याणी दाखविलें. मी लार्ड सालिसबरीच्या शद्बा वरच विश्वास ठेवण्यास तयार नाहीं याप्रकरणाची कमिशन नेमून चौकशी व्हावी असें मि० लाबोचीर ह्मणाले यानंतर तुह्मी आपले शद्ब परत घ्या असें स्पीकरनें मि० लाबोचीर यास सांगितलें माझें मन मला जें सांगतें त्याच्या विरुद्ध मी कधींहीं वागावयाचा नाहीं असें मि० लाबोचीर याणी सांगितलें. सरतेशेवटीं मि० लाबोचीर यास या अज्ञा उलंघनाबद्दल आठ दिवस पार्लमेंटांत येण्याची बंदी झाली आहे लार्ड सालिसबरी सारख्या मुख्य प्रधानावर असल्या प्रकारचे आरोप येणें चांगलें नाहीं. कदाचित हे आरोप खोटेही ठरूं शकतील पण ज्या अर्थी ते मि० लाबोचीरसारख्या वजनदार मेंबराच्या मार्फत येत आहेत त्या अर्थी त्यांत तकांहींच अर्थ नाहीं असेंही ह्मणतां येत नाहीं विलायतेच्या सुधारलेल्या पार्लमेंटांत सुद्धा असले प्रकार चालतात!

ता० १३ मिनहूरीनीं लंडन येथें खाणीतील मजूरदाराची एक जंगी सभा भरली होती या सभेंत अ.ज तारखेपासून आमचा पगार पांच टक्यांनीं न वाढेल तर, आणि जुलै महिन्यानंतर आणखी पांच टक्यांनीं न वाढेल तर आह्मी येत्याशनवारपासून कामावर न जाण्याचा कट करू असें या सभेंत ठरलें.

कांग्रा येथें एका साधूनें आपली जीभ कापून घेतली व नंतर ती जीभ त्याच्या उपास्य देवतेनें त्यास पुन्हा दिली अशा प्रकारच्या गप्पा तिकडे उठल्या आहेत व त्या साधूच्या दर्शनास हजारो लोक लोटत आहेत.

राव ब० महादेव गोविंद रानडे आणि जव्हेरलाल उमियाशंकर याजनजीक या दोघास मुंबई कौन्सिलचे अडि० मेंबर नेमले, झालेली निवड अगदीं यथायोग्य झाली यांत कांहीं संशय नाहीं.

हिंदुस्थाना संबंधाने विलायतेस विशेष प्रकारची ओरड व्हावी आणि हिंदुस्थानांतील लोकांच्या मागण्या काय आहेत त्या हिंदुस्थाना बद्दल विचारपूस करणाऱ्या मेंबरांस कळाव्या ह्मणून तिकडे 'हिंदुस्थान' या नावाचे एक वर्तमानपत्र प्रसिद्ध होणार आहे. हे वर्तमानपत्र प्रसिद्ध इंडिया एजन्सीचे सेक्रेटरी मि. डिगेबी यांच्या हातून चालणार आहे.

हिंदुस्थानांत येणार ह्मणून लार्ड हरीस याणीं आपल्या कुळांस एकजंगी मेजवानी दिली.

कलकत्या जवळील हुगळी प्रांतात अलीकडे अतिशय चोऱ्या होऊं लागल्या आहेत. दररोज दरवडे पडत आहेत कारीकडे-सुद्धा दरोडेखोर अहेतच!

लंडन शहरांतील एका खाणींत एकाएकी अपघात होऊन सुमारे १४० मनुष्य ठार मेली.

१८९०च्या फेब्रुवारी महिन्याच्या शेवटी १३,४७,८५,००० रुपये मुख्य तिजोरीत शिल्लक होती

एक रुपया ह्मणजे १ शिलिंग आणि ८ पेंन्स या भावाने हिंदुस्थानांतील बिनसनदी नोकरांस पेन्शन द्यावयाचें नाहीं असें सर घास्ट याणी एका खाजगी ठिकाणी बोलून दाखविलें आहे.

सर दिनशा माणेकजी पेटिट यांची बायको मरण पावल्या मुळें १,१३००० रुपये धर्मादाव करण्यांत आले.

गेल्या वर्षी वऱ्हाडांत जवसाचें उत्पन्न चांगले झालें नाहीं तसेच गव्हाचें ही झालें आहे.

तापाच्या साथीने काशीपर्यंत मजला मारली! आतां ही काशी यात्रा करून पुन्हा परत नयेवो! !

अग्निरथ—वाफेच्या योगानें सम्मान्य रस्त्यावरून चालणारी अशी एक नवीन गाडी गायकवाड महाराज साहेब यांणीं खरेदी केली आहे.

क्वीन्सलन्ड मध्यें एक मनुष्य रानांत रस्ता चुकला. त्याला तहान फार लागल्यामुळें जवळच एक पाण्याचा झरा होता. त्यांत आपली तहान भागवून त्यानें पुढें रस्ता शोधून काढला. त्याला आणखी त्या जागेपासून तसि मैल जावयाचें होतें; परंतु उन्ह फार कडक असल्यामुळें पाण्या शिवाय इतके मैल जाणे अशक्य होतें; परंतु त्याच्या पाशी बरोबर पाणी नेण्यास कांहीं भांडे नव्हतें; तेव्हां त्यानें एक युक्ति योजिली पूर्वीं रानांत त्यानें एक मेलल्या मनुष्याचा सांगाडा पाहिला होता तेथें तो परत गेला. व डोक्याची करवंटी काढून घेऊन त्याचीं डोक्याचीं भोकें मातीनें बंद करून तींत त्यानें पाणी घेतलें व त्या पाण्यानें त्यानें तेवढा तिस मैलाचा प्रवास केला. ठा० अ०

डमडम येथें एका गोऱ्यानें एका देशी मनुष्याचा खून केल्यावरून त्यास कलकत्याचे सेशनांत गोरे पंचांनीं एक मतानें गुन्हेगार ठरविल्या वरून कोर्टानें त्यास फांशाची शिक्षा दिली होती, परंतु सदरच्या गोऱ्याचे तर्फेनें कलकत्यांचे चीफ जस्टीस यांजकडे अपील होऊन हा गुन्हेगार निर्दोषी ठरून सुटला. कारण हेंच कीं, आरोपीवर त्याचे सोबत्याशिवाय दुसरा कोणीही साक्षी, खुनाचा पुरावा करण्यास आला नाहीं. अशा करितां एकदम निर्दोषी ठरवून देणें हें इंग्रजी न्यायपद्धतीस मोठें लांछन होय.

मद्रासेच गव्हरनर लार्ड क्यानेमारा यांचे पत्नीनें त्यांज विरुद्ध फिर्यादकरून फारकत मिळण्याचा खटला केला आहे. व या करितां मद्रासचे गव्हरनर कांहीं महिनेपर्यंत विलायतेस रजेवर जाणार आहेत.

नवीन तापाचे रोगावर पुणें येथील मि० लक्ष्मणराव घोरपडे यांणी स्वतांच्या अनुभवावरून खाली दर्शविलेलें औषध आह्मास कळविलें आहे. ते ह्मणतात कीं,— "अमच्या घरांतील सर्व मंडळीस या तापानें गाठलें होतें तेव्हां त्यांणी ३ औंस सोनामुखीचा काढा करून त्यांत इपसमचे मीठ ॥।· पासून १ औंसापर्यंत मिश्रकरून ताप येईल त्याचे दुसरे दिवशी सकाळीं द्यावें ह्मणजे रोग्यास ३—४ जुलाब होऊन तो तावडतोब बरा होतो.

मुंबई म्युनिसिपालिटीनें प्रिन्स ऑलबर्ट व्हिक्टर यांच्या सन्मानार्थ ३०,००० तीस हजार रुपये खर्च करण्याची मंजुरी दिली; आणि सरकार २०,००० वीस हजार रुपये खर्च करणार; आणि या खेरिज शहरवासी लोकांकडून जी रकम होणार ती निराळी. एकंदरीत आमचे शहर इतर ठिकाणा पेक्षां चांगला सन्मान करणार असें म्हटलें पाहिजे. दि० बं०

पंडित लोचन सुकल नांवचे एक सिद्ध पुरुष हल्ली नागपुरास आले असून ते मृत प्राण्यास आपल्या मंत्र सामर्थ्यानें सजवि करतात असें म्हणतात. त्यांच्या मंत्रसामर्थ्याची प्रचीती पाहण्या करितां गेल्या ४ थे तारखेस नागपुरास कांहीं मंडळीनी ५ मासे आणले व त्यांचे तुकडे तुकडे करून सर्वी समक्ष ते एका डब्यांत भरून पंडितजीं पुढें तो डबा व एक मद्याची बाटली ठेविली. परंतु पंडितजींनीं कांहीं मंत्र म्हणून अक्षता टाकतांच ते मासे जीवंत झाले व बाटलींतील मद्याचे दूध झालें असें सु. सिं. चा एक बातमीदार कळवितो.

रेल्वे अपघातासंबंधानें रेल्वेवर फिर्याद:—गेल्या मे महिन्याचपा ४ थ्या तारखेस अताजी बाळाजी नांवाचा इसम आपल्या सात मैल्यांसह लोणावळ्याचे स्टेशनावर गाड्यांमध्यें चेंगरून मरण पावला त्या वरून त्याच्या बायकोनें आणि मुलांनीं रेल्वेकंपनीवर १०,००० रुपयांची नुकसानीची फिर्याद केली. हायकोर्टानें रेल्वे कंपनी कडून १,००० रुपये बाईस व २,००० रुपये तिच्या चार मुलांत एकूण ३,००० रुपये देवविण्याचा ठराव केला.

नवीन येणारे गव्हर्नर लार्ड हारीस यांनीं एक प्रसंगी असें बोलून दाखविलें कीं आजपासून क्रिकेट जरी मी स्वतः खेळणार नाहीं, तरी त्यास होईल तितकी मदत मी करण्यास तयार आहे. मग खेळण्यानेंच काय केलें!

'भावनगर एक्सपोझर' नावाच्या एका पत्रावर भावनगर संस्थानचे प्रधान मि. मानगरी यांणी मुंबईस अब्रुनुकसानीची फिर्याद मांडली आहे.

निजामसरकारानें आपल्या राज्यांत उत्पन्न होणाऱ्या मालावरील जकात अजीबात काढून टाकली फार चांगले झाले देशी व्यापारास याच्या योगानें बरेंच उत्तेजन येईल. क० त०

येत्या आक्टोबरच्या १ ल्या तारखेस सिमल्यास शेतकी संबंधानें एक कान्फरन्स भरणार आहे त्यावेळेस सर्व स्थानिक सरकाराकडून प्रतिनिधी पाठविले जातील असें ह्मणतात

'थिएटरफोन' म्हणून एक नवीन यंत्र निघालें आहे. यांत भिन्नभिन्न ठिकाणच्या थिएटरांतील टेलीफोनांचा एके ठिकाणीं संयोग केला असतो एवढेंच कायते यांत विशेष आहे. ही कल्पना चैनबाजी पारिसकरांची! के०

सोन्यारुप्याच्या तोफा:—बडोदें सेनापतींच्या कचेरीपासून सुमारें १०० कदमांवर सोन्यारुप्याच्या तोफा ठेवण्याची जागा आहे. ह्या ठिकाणीं दोन सोन्याच्या दोन चांदीच्य तोफा अहेत. पहिल्या दोन दोन चांदीच्या तोफा कै. श्रीमंत खंडेराव महाराज गाइकवाड यांनीं करविल्या यांत मुख्य तोफा चांदीच्या असून बाकीचें सर्व सामान ह्मणजे त्या ठेवण्याचे गाडे, त्यांचीं चाकें वगैरे, इंग्रजी तोफाप्रमाणेंच पितळेचें आहे. खंडेराव महाराजानंतर कै० श्री० मल्हारराव महाराज हे राजपदारूढ होऊन त्यांनीं आपल्या बंधूवर नक्षी करण्यासाठीं दोन सोन्याच्या तोफा ओतविल्या. त्याही मुख्य तोफा सोन्याच्या आहेत; परंतु त्यांचे बाकीचें वर सांगितलेलें सर्व सामान रुप्याचे ओतविलें आहे. हें विशेष आहे ह्या तोफा ओढण्याला मोठाले बैल जुंपितात. या बैलाचे अलंकार तोफाच्या प्रमाणेंच रुप्याचे किंवा सोन्याचे असून तशाच भरगच्ची व किनखाबी झुली अहेत. त्या अलंकारवस्त्रांनीं सजवून त्या खंद्या बैलांच्या जोड्या त्या त्या तोफांस जोडिल्या असतां जो देखावा दिसतो तो फारच रमणीय असतो. सुमारें पंचवीस वर्षांपूर्वी, श्रीमंत खंडराव महाराज ह्या सर्व लवाजम्यानिशीं पुण्यास आले होते. त्या वेळचें त्यांचे वैभव बघितलेल्या वाचकांसह्या तोफांचे वर्णन ऐकून ह्या त्यांचे डोळ्या समोर दिसावयास लागतील ह्या सोन्या रुप्याचे तोफांच्या बंदोबस्ता करितां त्यांच्यांवर नागव्या तरवारींचा पाहरा आहे. त्या दुरूनच पाहूं देतात. ज्ञा० च०

निझामसरका आपल्या राज्यातील १२ विद्यार्थी तीन तीन हजार रुपये देऊन विलायतेस शिकविण्यास पाठविणार आहेत यांची वयें १७ पासून २१ पर्यंत असावी. पु० वै०

---

☞ हें पत्र अकोला येथें कै. वाशी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सहामाही " ३ " ०८
सालअखेर " ७ " १०८
किरकोळ अंकास..............................०४

नोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस ........०१

Six monthly...........3 " 8 as
Single copy......................................4as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

Advertisements
Below 10 lines... 2Rs
per line over10...4 as
Repetition per line3as

VOLXXIV | AKOLA MONDAY 31 MARCH 1890 | NO 12

वर्ष २४ | अकोला सोमवार तारीख ३१ माहे मार्च सन १८९० इ० | अंक १२.

## पुण्यांतील वक्तृत्वो त्तेजक मंडळी.

सन १८९०-९१ सालचा भाषण समारंभ

पुण्यांतील वक्तृत्वोत्तेजक मंडळीचा चालूं सालचा भाषण समारंभ तारीख ३ माहे मे शनवार सन १८९० पासून सुरू होईल विषय व बक्षिसें खालीं लिहिल्याप्रमाणें ठेविलीं आहेत.

विषय.

१ ला. पार्लमेंट समेपुढें ब्राडला साहेब यांणीं इकडील कौन्सिलाबद्दल कायद्याचा मसुदा वाचल्यानंतर हिंदुस्थानांतून आलेल्या डेलिगेटांनीं आपले विचार प्रदर्शित करावे अशी पार्लमेंटानें आपली इच्छा दर्शविली अशी कल्पना करून वक्त्यानें आपण हिंदुस्थान वासी जनांचे डेलिगेट आहों असें समजून कौन्सिलच्या सुधारणेबद्दल हिंदुस्थानांतील लोकांचे काय विचार आहेत व त्यांचें ह्मणणें पार्लमेंटानें कां कबूल करावें याविषयीं भाषण करावें.

२ रा. हल्लीं आम्ही स्त्रियांस कोणत्या रीतीनें वागवितों, त्यांच्याशीं योग्य वागणूक होण्यास आपल्या वर्तनांत कांहीं फरक झाले. पाहिजेत किंवा कसें? हल्लीच्या वागणुकींत स्त्रीयांवर सक्ती होत असल्यास ती कोणत्या बाबतींत होत आहे. ती कोणत्या उपायांनीं नाहींशी करतां येईल. ते उपाय सांगणें व स्त्रीयाशीं योग्य वागणूक ठेवण्या विषयीं उपदेश करणें.

३ रा. अभंग, माडगांवकृत गाथा अभंग ३४६८.

पवित्र ते कूळ पावन तो देश,॥
जेथें हरिचे दास घेती जन्म॥१॥
कर्मधर्म त्याचे जाला नारायण॥
त्याचेनी पावन तिन्ही लोक॥२॥
वर्ण अभिमानें कोण जाले पावन॥
ऐसे द्या सांगून मजपाशीं॥३॥
अत्यंजादि योनि तरल्या हरिभजनें॥
तयाची पुराणें भाट जालीं॥४॥
\+ + + ×
याता यातीधर्म नाहीं विष्णुदासा
निर्णय हा ऐसा वेदशास्त्री ॥११॥
तुका ह्मणे तुह्मी विचारावे ग्रंथ॥
तारिलि पतित नेणों किती ॥ १२ ॥

४ था.– अयत्या वेळचा

या चारी विषयांवर भाषण करणारांनीं कोणत्याही व्यक्तीस प्रत्यक्ष व परोक्ष रीतीनें अनुलक्षून बोलूं नये.

बक्षिसें व गुण

वरील चार विषयांतून इच्छेस येईल तो (एकच) विषय घ्यावा पहिल्या विषयांस ४० रुपयांचे एक व दुसरे रु २० चे कैलासवासी रावबहादुर गंगाशास्त्री आपटे यांचे; व दुसरे विषयास रु० ४० चे एक व दुसरें रु० १५ चे तिसऱ्या विषयास मंडळीच्या फंडापैकी रु. १५ व कैलासवासी रावबहादुर विष्णु परशराम रानडे यांचे स्मारक फंडापैकीं रु. २५ एकूण रु ४० चे एक व दुसरे रु. २० चे श्री० कै० यशवंतराव गोपाळराव मैराळ यांचे नावचे आयत्या वेळचे विषयास बक्षीस रु० ४० चे एकच आहे. आयत्या वेळचे विषय समारंभाचे पहिले दिवशी कळविण्यांत येतील बक्षीस मिळण्यास १०० गुणातून निदान ५० गुण आले पाहिजेत.

पहिले विषयात पहिले बक्षीस मिळविणारानें जर करितां शेकडा ७० गुणापेक्षां जास्त मिळविले तर त्यास पहिले बक्षीस रु ४० चे आहे त्या ठिकाणीं रु. ५० चें बक्षीस मिळेल.

उमेदवारांच्या समजुती साठीं सूचना.

प्रत्येक भाषणास अर्धा तास दिला जाईल, परंतु अवश्य वाटल्यास ती वेळ कमी अथवा जास्त करण्याला अधिकार परीक्षकांस आहे भाषणांत विषयाची जुळणी त्यांचे प्रतिपादन, श्रोत्यांच्या मनांत उतरून देण्याची शैली या गुणांकडे विशेष लक्ष दिले जाईल. परीक्षक ज्यांची भाषणें पसंत करतील त्या उमेदवारांनीं त्यानीं केलेल्या भाषणाचा लेखी गोषवारा चिटणीसास आणून दिला पाहिजे पहिल्या तीन विषयांवरील भाषण करणाराचे वय १८ वर्षांपेक्षां कमी नसावें. व चवथ्या विषयावर भाषण करणाऱ्या उमेद वाराचे वय २२ वर्षां पेक्षां कमी नसावें.

२ भाषण करण्यास येऊं इच्छिणाऱ्या उमवारानें एक रुपया आपल्या अर्जा सोबत पाठवावा. ज्याचा रुपया येणार नाहीं, त्याचा अर्ज घेतला जाणार नाहीं सेक्रेटरी ज्या दिवशीं व ज्या वेळेस उमेदवारानें घेतलेल्या विषयावर भषण करण्यास सांगतील त्या दिवशीं व त्या वेळेस उमेदवारांनीं हजर असून भाषण करण्यास उभे राहिले पाहिजे. असें उमेदवार जरी पास झाले नाहींत किंवा त्यांचीं भाषणें मंडळीनीं समग्र ऐकून न घेतल्या मुळें त्यांस आपलें भाषण थांबवून जरी परत जावे लागले, तरी त्यांचा रुपया परत दिला जाईल. वरलिहिल्या प्रमाणें सेक्रेटरी सांगतील त्या वेळीं उमेदवार हजर नवतील किंवा हजर असून भाषण करण्यास येणार नाहींत, तर त्यांचा रुपया परत दिला जाणार नाहीं, व गैरहजर असलेल्या उमेदवाराचा मागाहून भाषण करण्याचा हक्क राहणार नाहीं.

अर्ज ता० २५ एप्रील सन १८९० चे आंत खाली सही करणाराचे नांवें "ठेबुधवार कोतवाल चावडी नजीक नेटिव जनरल लायब्ररी" ह्या पत्त्यावर पाठवावें त्यांत प्रत्येक उमेदवारानें आपले नांव, बापाचे नांव आडनांव, धंदा, पत्ता व गांवाचें नांव आणि त्यानें घेतलेला विषय अशीं स्पष्ट लिहावीं. नाटपेडपत्र घेतलें जाणार नाहीं उमेदवारांनीं भाषण समारंभाचे अगोदर एक दिवस चिटणिसांस येऊन भेटावे व जे न भेटतील ते भाषण करण्यास येत नाहींत, असें समजून व्यवस्था करण्यांत येईल.

ता० ९।२।९० इ०

वामनराव विष्णु लेले
कृष्णराव बापूजी मांडे
पुण्यांतील व० मंडळीचे चिटणीस

---

नोटीस.

कडतु वल्लद आयाजी गोळे मैत वारीस बिरादर चुलता महादु वल्लद भवानी गोळे व येकोजी वल्लद गुंडाजी लोनवडकर मयत वारीस बायको पाराई मर्द येकोजी लोनवडकर व नयाजी वल्लद भवानजी गोळे राहणार मौजे लोनवड प्रगणे शिरपूर ता० व जिल्हे वाशीम यासी खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं कडतु वल्लद अयाजी गोळे याजवर हुकुमनामा नंबर १०८६ सन १८८९ चा झाला आहे त्यांत मौजे लोनवड प्रगणे शिरपूर येथील शेत सरवई नंबर ७१ चे विकून पैसा वसूल करण्याविषयीं ठराव आहे व तें शेत येकोजी वल्लद गुंडाजीचे बायकोचे नांवें असून वहिताचा हक्क कडतुचा आहे व ते सेत कडतुचे तर्फे नयाजी वाहत आहे सबब त्रिवर्गांना आमचे हुकुमनाम्याचे रकमेचा निकाल हा नोटीस पावल्यापासून ३ महिन्यांत करावी अगर सदरहूचे मुदतींत रकमेचा उलगडा न केल्यास सदरहू शेत विकण्याची तजवीज केली जाईल कळावें हें विनंती ता० २४ मार्च सन १८९० इ०

(सही)

लालचंद रामदयाळ साहू दुकान गनसेंदुर प्र० शिरपूर ता० व जि० वाशीम याचे हातची मारवाडींत सही असे

---

नोटीस

रा. मारुती वल्लद गंगाराम डामरे वस्ति कसबे निमगांव तालुका मलकापुर जिल्हा बुलडाणें यांस खाली सही करणार याज कडून नोटीस देण्यांत येतें कीं मौजे भालेगांव प्रगणे पिंपळगावराजा येथील सर्वे नंबर ८१ चें खातें नुरी मर्द सोनाजी इचे नांवें असून पूर्वीं त्या शताचें खातं गणु वल्लद काशीबा गोंड याचें नांवें होतें त्याणें आपला बंधु शंकर वल्लद मारुती गोंड यांस खरेदी दिले. व सदरहु खरेदीदार याने आम्हांस खरेदी दिला आहे. आतां आपण खातेदारीणीचेच आप्त असल्या मुळें नोटीस देण्यांत येतें कीं तुमचे जवळ कांहीं लेख वगैरे असल्यास ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसाचे आंत आम्हास जबाब द्यावा व तुमचेपासी खरेदीखत, तारणगहाण गहाणखत आम्हांस सदर्हु मुदतींत आणून दाखवावें या प्रमाणे करण्यास चुकल्यास. तर तुमची पुढें कोणते प्रकारची सबब ऐकली जाणार नाहीं कळावे तारिख २५ माहे मार्च सन १८९० इसवी.

(सही)

अंताजी गोविंद चितळे दस्तुर खुद्द.
श्रीपतराव राघोबा देशमुख दस्तुर खुद्द.

---

## पत्रव्यवहार

ह्या सदरा खालील मजकूर पत्र कर्त्यांच्या मतास मिळूनच असेल असें समजूं नये.

---

जिल्हा बाळाजीका बासिम

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः–

सा. न. वि. वि. खालील ओळी आपले पत्रीं छापलतर लोकांवर फार उपकार होतील.

इंग्रज लोकांचें राज्य वऱ्हाडांत सुरू झाल्या पासून शांततेचें खरें सुख रयतेस मिळत आहे हे सांगणे म्हणजे आम्ही पंख्याचा वारा घेऊं लागल्या पासून आमची तलखी कमी झाली असें म्हणण्या सारखे होय.

पण सुखाचा निद्रा मृदुशय्येवर घेत असतांना ही ज्या प्रमाणें दुष्टस्वप्नें पडून कोणी दुष्ट व क्रूर मनुष्य आपल्या मानेवर तरवार धरून उभा आहे असा भास होतो व त्या स्वप्नांत ज्याप्रमाणें आपला बचाव करण्यास त्याच्यानें हात देखील वर उचलवत नाहीं त्याप्रमाणें किंबहुना ज्यास्त स्थिती आमची झाली आहे हे ऐकून कोणास आश्चर्य वाटणार नाहीं?

अलीकडे ह्मणजे दीड दोन महिन्याच्या पोटांत कांहीं मोगलाईंत व कांहीं इंग्रजींत जे डाके एकामागून एक पडले त्याची यादी लक्षांत ठेवणें शाळेंतील भूगोलासारखे कठीण काम झालें आहे. परंतु दुसऱ्यांच्या साहायानें मला सदरहू नांवें कळविण्यास फुरसत नाहीं पारडी, मोप, ही गावें लक्षांत आहेत ह्या डाकयांचा चमत्कार वाटण्या जोगा कांहीं नाहीं विचारे एकाएकीं कोणत्याही गावांत येतात. एक माहित चेच घर जणूकाय बघून तेथें प्रवेश करितात कोणी गडबड करील त्यांस चांगले बडीवत त आणि ज्याप्रमाणें कोणी अधिकारी शाळेंत आले असतां वात्रट पोराना मास्तर गुपचुप ठेवितो व अधिकाऱ्यास इतर वर्गांच्या तपासणीचें काम सावकाश करूं देतो त्याप्रमाणेंच हे बडविणारे आपल्या नाईकांस खुशाल घरवाल्याची तिजोरी स्वस्थ चित्तानें तपासूं देतात! आणखी यांच्यांत गुण कोणता ह्मणाल तर वरीवरच्या तिजोऱ्या तपासण्याची हे गरज बाळगीत नाहींत. ह्या वरून उघड आहे कीं ह्या डाकेखोर लोकांत कांहीं भूतदया व कांहीं निर्लोभता आहे!

पण आम्ही इंग्रजींतले प्रजाजन अशा

लोकांना देखील भितो ह्यांस काय म्हणावें? बरें सरकार तरी ही मौज किती दिवस पाहील? डांक्यांचा तपास लावण्या करितां जर स्वतंत्र व्यवस्था केली तर ही स्वम निवृत्ति लवकर होणार नाहीं काय?

आपला

एक कनवाळू.

वऱ्हाडसमाचार.

मित्ती चैत्र शुद्ध १० शके १८१२

## वऱ्हाड वतनदार सभा.

जमेदार मंडळीच्या सभेची साधारण हकीकत आह्मी आपल्या मागल्या अंकांत दिली, त्यावेळीं आम्हीं जे त्यांचे ठराव दिले आहेत. ते ठराव कदाचित अक्षरशः जसे असावेत तसे नसण्याचा संभव आहे. आमच्या कडेस ह्या ठरावाची नक्कल सेक्रेटरी मार्फत आल्यास आह्मी ती प्रसिद्ध करूं. सभेचे काम निर्विघ्नपणें आटोपले ह्याबद्दल आह्मास आनंद वाटतो. आलेले जमेदार सुरक्षितमणें आप आपल्या गांवाकडे गेले ह्याबद्दलही आह्मांस संतोष वाटतो. आनंद व संतोष मानण्यास विशेष कारण हें कीं कोणत्याही मोठ्या कृत्यास विघ्नें येतात तशी येथेंही आली परंतु ती प्रभुसत्तेनें टळलीं व गांवांत रमत असलेल्या तापाच्या साथीनें आलेल्या मंडळीस उपद्रव दिला नाहीं. मंडळीच्या मनावर सभेची व्यवस्था, सभेतील भाषणें, व सभेनें केलेले ठराव ह्या संबंधानें काय परिणाम झाला व त्या जमलेल्या मंडळीचे साधारण काय मत झालें हें सांगणें जरूर आहे. प्रत्येक गोष्टीस दोन बाजू असतात. त्यापैकीं जी आपणास दिसते तसा त्या गोष्टी संबंधानें आपला समज होतो. मंडळीच्या मताच्या दोन्हीही बाजू आह्मी आमच्या वाचकांस दाखविण्याचा प्रयत्न करितों. सभेकारितां जो मांडव दिला होता तो चांगला विस्तीर्ण होता. खुर्च्या व बाकें व्यवस्थेनें मांडलेली होती. अध्यक्षाकरितां जें सिंहासन केलेलें होतें तें मंडपाच्या मध्य भागीं असल्यामुळें तेथून चहोंकडला देखावा चांगला दिसत होता. सिंहासनाच्या दोहोंबाजूस ज्या खुर्च्या बाकांच्या रांगा होत्या त्यावर जमलेली जमेदार व इतर वतनदार मंडळी आपआपल्या इतमामाप्रमाणें पुढें अगर मागें बसली होती. पुढच्या बाजूस ज्या रांगा होत्या त्यावर निमंत्रण चिठ्या पाठविल्यावरून गांवांतील आलेली शिष्ट मंडळी बसली होती. प्रथम सिंहासनावर कोणीच नव्हते रावसाहेब देवराव बाबा मंडपांत आल्यावर त्यांच्या विनंती वरून गांवांतील बसलेल्या शिष्ट मंडळीपैकीं कांहीं गृहस्थ व रावसाहेब स्वतः व सभेचे सेक्रेटरी सिंहासनावर जाऊन बसले. याच मंडळींत सिंहासनावर कांहीं लहान मुलें बसली असल्यामुळें तो सीन गमी दिसत होता. पुष्कळ खुर्च्या रिकाम्याच होत्या. अध्यक्षस्थान स्वीकारण्याविषयीं सर्वानुमतें भगवंतराव देशमुख यांस विनंती झाल्यावरून तेही सिंहासनावर विराजमान झाले. ही सर्व व्यवस्था ठीक होती. सर्व साधारण उणीव ह्मणून जी काय जमेदार मंडळीस व गांवकरी मंडळीस वाटली ती ही. सिंहासनावर ज्या रिकाम्या खुर्च्या होत्या त्यावर देशमुख देशपांडे मंडळीपैकीं कांहीं जणास बसविण्याची योजना झाली असती तर सभेच्या थाटमाटाच्या शोभेस कमीपणा आला नसता. आह्मी ही ह्मणतो अशी व्यवस्था ठेवणें इष्ट होतें.

सभेच्या कामास सुरवात झाल्यावर ज्यांची भाषणें झाली त्यापैकीं मुख्य गृहस्थ (अध्यक्ष खेरीज करून) सेक्रेटरी गोविंदराव देशपांडे, अडगांवकर देशपांडे, मुकुंदराव देशमुख, संपतराव देशमुख, पांडुरंग बापुजी पांडुरंग गोविंद वकील व रावसाहेब देवराव विनायक. सेक्रेटरीच्या बोलण्याचा झोक कांहींसा हुकमी असे असा कांहीं लोकांचा समज झाला आहे. गोविंदराव प्रकृतीनें मुळचे अशक्त तशांत तापामुळें त्यांचे अंगीं जास्तच क्षिणता आली होती. सभेची व्यवस्था वगैरे ठेवण्याच्या खटपटींत श्रम झाल्यामुळें अगदीं गळून गेले होते. अशा स्थितींत आपणाकडून सेक्रेटरी या नात्यानें सभेंत सर्वांना ऐकूं जाईल अशा रीतीनें बोलण्याचें काम कसें झेंपेल या भितीनें, व आपण जमेदार कुळांत उत्पन्न झालों आहों व जें काम आतां हातीं घ्यावयाचे त्यापासून आपलेंच नव्हे तर सर्व जमेदारांचें हित आहे करितां आपल्यावर जें काम सोपविलें आहे तें उत्तम बजावण्याचा प्रयत्न केला पाहिजे अशी वीरश्री चढल्यामुळें त्यांनीं मूळपासूनच उंच स्वरानें बोलण्यास सुरवात केली. व जेव्हां जेव्हां आवेशानें बोलत तेव्हां कित्येकास हे जमेदारी नव्हे परंतु जमादारी स्वरानें बोलत आहेत असा भास होण्याचा संभव होता हे सेक्रेटरी साहेबांच्या भाषणा संबंधानें झाले. आतां राव साहेब खेरीज करून बाकीच्या मंडळीचीं भाषणें समयास अनुसरून झाली. आह्मी राव साहेब खेरीज करून ह्मटले याचें कारण राव साहेब यांच्या भाषणाची दोन्ही अंगें सारखी नाहींत. कोणी ह्मणतात रावसाहेब यांनीं या मंडळीची चांगली खरडपट्टी काढली. ही मंडळी अशीच आहे. हे जमेदार लोक बाबादादा करून ऐकणार नाहींत. यानां असें सपाटेच पाहिजेत. रावसाहेब जर असें ह्मणह्मणीत भाषण न करते, तुह्मी मुर्ख अहात तुह्माला लाज वाटली पाहिजे वगैरे शद्बानीं पदोपदी ताडन न करते तर या मंडळींनीं आपसांत फाटाफूट केली असती. ही एक बाजू झाली. परंतु या बाजूचे लोक थोडे आहेत. आतां रावसाहेबांचे बोलण्यानें बहुतेक जमेदार मंडळीस राग कसा आला परंतु गम खाऊन व आपल्या हातीं धरलेल्या महत् कृत्या कडे नजर देऊन त्यानीं आपण होऊन बोलावलेल्या पाहुण्याचा बिलकुल उपमर्द वगैरे न करीतां त्यांचा व आपला बोज कसा राखिला, ही जी त्यांच्या बोलण्याची दुसरी बाजू ती आम्हीं आपल्या पुढील अंकीं देऊ. या संबंधानें आमचे कडेस दोन तिन लेख ही आले आहेत. परंतु ते फार उशिरा आल्या मुळें या अंकांत त्यांस जागा देण्यास सवड नव्हती. आम्हास वाटल्यास पुढले अंकांत देण्यांत येतील.

जमेदार सभेला आलेली वर्गणी.

| | | |
|---|---|---|
| गुलाबराव देवराव सिरसाळकर | रु. | ५ |
| चंद्रभान देशमुख ह्मसपूर | | १० |
| हिंमतराव देशमुख कुरम | | २५ |
| अमृतराव देशमुख कुरम | | २५ |
| फत्तेसिंग गणपत देशमुख | | ५ |
| भुजंगराव गोपाळराव देशमुख उमरखेड | | १ |
| व्यंकटराव मुकुंदराव देशमुख पातुर्डे | | २५ |
| यादोराव दिनकरराव देशमुख मान | | १० |
| | | १०६ |
| मागील अंकावरून | | ३४९ |
| एकूण | | ४५५ |

गव्हरनर जनरल साहेबांचे राजपुतान्यांत कर्नल वालटर साहेब एजंट आहेत. हे आपला वेळ केवळ सरकारि किंवा इतर राजकीय कामें करण्यांतच घालवीत नाहींत व ह्या कामाकडे मनुष्याचा सर्वच वेळ खर्च होतो असेंही नाहीं. राजकीय कामें करून जो कांही वेळ शिलक रहात असे त्याचा बहुतेक भाग यांनीं तथील राजपुत्राचे व इतर लोकांचे हित करण्यांत घालविला. यानीं दोन वर्षा पासून राजपुतान्यांत समाजाची सुधारणा करण्या करितां एक सभा स्थापित केली आहे तिचें नांव वालटरकृत राजपुत्र हित कारिणी सभा असे ठेविलें आहे. व ह्या सभेत पुष्कळ पोट सभा आहेत सभेचा मुख्य उद्देश लग्न कार्यांत व और्ध्वदेहीक कार्यांत जो खर्च होतो तो कमी करावा व वधूवराच्या लग्नाच्या वयाची ईयतता जास्त वाढावी हा आहे. कर्नल साहेबांच्या परिश्रमानें हा हेतू या दोन वर्षांत बऱ्याच अंशा सिद्धीस गेला आहे हल्लीं कर्नल साहेब आपल्या देशीं जात आहेत सबब ह्या सभेची जाहीर सभा त्याना सन्मान देण्या करितां भरली होती. सभेस बऱ्याच संस्थानांतून लोक आले होते. त्या वेळेस प्रत्येक पोट सभेनें किती काम केलें आहे या बद्दल माहिती दिली त्या वरून असें समजतें कीं ह्या सभेचें काम फार जारीनें चालू आहे. गतवर्षीं या सभेच्या रजिष्टरांत एकंदर १२९१ लग्नाची व ७२४ मरणाची नोंद झाली आहे. नोंद झालेल्या लग्ना पैकीं १०७१ लग्नांत वधूवराचे वय सभेनें ठरविलेल्या वया पेक्षां कमी नव्हते. व ११९४ लग्नांत खर्च सभेच्या नियमा प्रमाणें झाला. ७२४ मौती पैकीं ६८८ ठिकाणीं सभेच्या नियमा प्रमाणें खर्च झाला. सन १८८८ सालांत नोंद झाल्या पैकीं शेकडा १७ लग्नें व शेकडा ११ मौती सभेच्या नियमा प्रमाणें झाली नाहींत तेंच गतवर्षी प्रमाणें शेकडा ७०५९ व ४०९७ असें अनुक्रम पडले.

ह्या वरील आंकड्या वरून सहज लक्ष्यांत येईल कीं सामाजिक सुधारणेच्या कामांत कर्नल साहेबांना किती यश आलें आहे व ह्या मुळें कर्नल साहेब त्या प्रांतातील लोकांच्या कल्याणास व भरभराटीस किती कारणीभूत झाले आहेत. ह्या सभेचा परिणाम त्या प्रांतातील लोकावर इतका चांगला उठला आहे कीं ह्या सारख्या इतर दुसऱ्या सुधारणा करण्या कडे सुद्धां अतां त्यांची प्रवृती झाली आहे. व त्या प्रमाणें कित्येक संस्थानांत असें ठरलें आहे कीं पहिली बायको जिवंत असतां दुसरें लग्न करूं नये, लग्न प्रित्यर्थ जितका म्हणुन खर्च करण्याचे ठरले. आहे त्या पेक्षां रजपुत लोकांना कोणी जास्त पैसा देऊं नये, आंगवस्त्र बाळगण्याची चाल अगदीं बंद करावी. व होता होईल तों पर्यंत ब्राह्मण, माहाजन व इतर जाती कडूनही हे नियम पाळविण्या विषयीं खटपट करावी. ह्या सभेचे सभासदच केवळ ह्या सभेच्या नियमा प्रमाणें वर्तन करितात असें नाहीं. तर इतर लोकांची ही ह्या सभेला पूर्ण संमती आहे व ते हे नियम पाळण्याची खटपट करित आहेत. त्या मुळें ह्या सभेला बरेंच यश आलें आहे व उत्तरोत्तर अधिक यश येण्याचा संभव आहे.

रजपुत लोकांत व ज्यांत मुख्यत्वें करून राजकीय घरण्यांत अशा प्रकारच्या सुधारणा सुरु होणें ही केवढी आनंदाची गोष्ट होय. राजपुतान्यांत अशा सभेस यश यावें परंतु आमच्या प्रांतांतील सभेस कांहींच यश येऊं नये ही मोठी दुःखाची गोष्ट होय. राजपुतान्यातील लोकां पेक्षां आमचे प्रांतांतील लोक विशेष अडाणी आहेत किंवा त्यांच्याहून फार श्रीमंत आहेत, किंवा अगदीच सुधारणा परांन्मुख आहेत असें ही नाहीं. तर मग त्या सभेची दोन वर्षांत इतकी भरभराटी व्हवी व आमच्या सभेचे चार वर्षांत पाऊल गणेश मंदिराच्या बाहेर सुद्धा पडुं नये ह्या बद्दल कदाचीत वाचकाना आश्चर्य वाटेल. परंतु तितकें आश्चर्य वाटू नये असें आह्मास वाटतें कारण सभेला यश येणें किंवा न येणें हें बऱ्याच अंशीं त्या सभेच्या उत्पादकाच्या परिश्रमावर अवलंबून आहे. वर्षांतुन कशी तरी एक वेळ सभा भरवून प्रोसिडिंग तयार केले ह्मणजे सभेचे काम चांगले होणार नाहीं व त्या योगें सभेचे हेतुही सिद्धीस जाणार नाहींत. ते सिद्धीस नेण्या करितां वारंवार त्या बद्दल विचार झाला पाहिजे, लोकांच्या नजरे पुढें त्या गोष्टी आणल्या पाहिजेत त्यांच्या समजुती घातल्या पाहिजेत, त्यांना त्या पासून फायदा काय आहे तो नेहमीं दाखवून दिला पाहिजे. इतकी कामे आपला धंदा संभळून करण्याला मेहनत किंवा काळ थोडा पाहिजे असें नाहीं. आमचे सभेचे सेक्रेटरी वर्षांतून कायतो एखादं वेळ किंवा फार झाले तर दोनचार वेळ खटपट करणार तर मग सभेला यश कोठून येणार. खरोबर पाहिले असतां त्यानीं तरी काय करावें? कोणत्या कोणत्या गोष्टी कडे त्यांनीं लक्ष द्यावें. त्यांच्या पाठीमागे लचांडे तर इतकी आहेत कीं त्या पैकीं प्रत्येकाला दररोज नियमानें कांहीं वेळ देऊं म्हटले असतां निभणार नाहीं. ही इतकी लचांडें एकतर त्यानीं प्रत्येक कामात आपणच पैशाचे वाटेकरी व्हावे म्हणून आपणहून लावून घेतली असतील किंवा ती लचाड सांभाळणा या प्रांतांत दुसरा कोणी मिळत नसल्यामुळें त्या लंचाडानीच त्यांच्या कडे धाव घेतली असेल या पैकीं कोणताही प्रकार असो परंतु एवढी गोष्ट मात्र खरी आहे कीं एकटा मनुष्य किती ही हुशार, मेहनती, व उत्साही असला तरी सर्व कामें त्याच्यानीं निभणार नाहींत. खरोखर आमच्या सेक्रेटरीस आपल्या संस्थेस यश यावें अशी इच्छा मनापासून असेल तर ते याबद्दल चांगला विचार करतील. युरोपियन लोकां मध्यें हा एक मोठा गुण आहे कीं ते ज्या म्हणून

सत्.ा किंवा सार्वजनिक कृत्यें हातीं धरतात त्यांकडे आपल्याच्यानें देववेल तितका वेळ देतात व होईल तितकी खटपट करितात त्या मुळें बऱ्याच प्रसंगीं त्यांच्या खटपटीस यश येतें. खटपटीस यश येणें किंवा न येणें हें का हीं मनुष्याच्या स्वाधीन आहे असें आमचे म्हणणें नाहीं तरी त्याकडे एकाग्र लक्ष देणें हे खटपट करणाऱ्याचें काम आहे. एक तर कोणाचे ही खटदट करण्याचे मनांत असल्या त्याकडे एक तर एकाग्र चित्त करून आपल्यानीं होई ल ती मेहनत करावी नाहींतर सोडुन देणें हें सर्वांत नीट. सर्वच कामें करण्याचा आव घालून एकही चांगलें न करणे त्या पेक्षां एकच काम हातीं घेऊन तें शेवटास नेणे व त्याबद्दल यशाचे वांटेकरी होणें हें सर्वांत चांगलें.

---

# The Berar Samachar

**MONDAY MARCH 31, 1890.**

## INDIAN LEGISLATIVE COUNCIL BILL BY LORD CROSS.

The people of India would have been thankful to Cross to no small content if he had devised some plan of introducing elective principle in the appointment of members to the several Legislative Councils in India. Admitting for a moment that the entire country is not yet fit to discharge the onerous and responsible duties of electing proper men to represent them in the Legislative Councils, still that class of people who are educated in the several Universities and such other men who must be considered in every society as educated and leaders of public opinion, are without doubt able enough to select their own men to represent them in Councils. There is neither reason nor rhyme to say that these men do not deserve to possess the privilege of representative government. By the government Bill two distinctive advantages are secured to the people. The first and foremost among them is the right of interpellation which under certain restriction is allowed to the members of Councils both supreme and Local. This will prove mightly beneficial both to the governed and the governors. To the governed in as much as for every grievance there will be an opportunity of bringing it to the notice of the responsible authorities and to the governors in as much as it will enable them to remove any misunderstanding which might have crept insurrepticously among the masses, about any government measure.

The other advantage which brings in a larger number of men as members of council, is certainly not as important as the first thing. Infact there are amongst us men of sceptical turn of mind who would not consider this as a gain at all. Where there was one member to support a measure introduced by government there would be two under the proposed system. In order to be a member of council one has to secure favor of one or more officials. To continue to be there after having once entered requires a circumstance of the same official favour which was the means of bringing him in. The result would be that on the part of such members constant and vigilant regard will be devoted to the interests of govt. and an equal disregard to the public weal. No doubt as at present there will be some who would try their utmost to stand by the people and there is a chance of such members being strengthened and supported but it is never safe in politics to go by chances. However small may be number of elected members in councils but still there ought to be some who would feel that they are bound to be loyal to their Queen and to the electorate body they represent. Not to introduce the principle of securing people's representatives in the councils, especially at this stage of Indian politics, would be very harmful to the people and their rulers. What Lord Macaulay did in the times of the Reform Bill at or about the period of 1830-35 of English History, the same has to be done over again and by some one like Macaulay. The old superstition and prijudices must be removed by an equally powerful man. It must be clear ly borne in mind that the measure introduced into Parliament by Lord Cross does not satisfy the expectations and aspirations of the Indian people nor has it satified three of the noble ex Vice roys of India.

In the reports submitted by the several Local Govts. on the draft of the Bill the govt. of Bombay appears to be of opinion that rulers of native states should be asked to be members of councils. This proposal has not received the attention it deserves at the hands of the journalists and others. British Government is solely responsible for the back ward condition of some of the native states. For Indian Rulers it is essentially necessary, that they should learn the system of British administration and this they will be able to do only when they see how anxiously governors of Presidencies watch the interests of the subjects under them. The Local governments have not only to do carry on the administration of the territories under them but have to see that the administration of states within their jurisdiction, is properly and efficiently carried. This proposal if adopted will do the work of two shots in one. However we hope to revert to this subject sometime in future.

---

## SOME REFLECTIONS ON REPRESENTATIVE GOVERNMENT.

( Communicated )

( Continued from our last issue)

A good system of carrying on business is indispensable for a good govt. Thus a govt is to be called good in proportion as it promotes the general mental advancement in the country, and in proportion as the organisation for employing the existing virtue and intellect at the greatest advantage is perfect. Of these two merits of a good govt., its system of national educating and its system of carrying on public fuedness, the last is pretty much the same in all states of society. The rules and the machinery may be adjusted with partial mortification of details to suit any form of govt. The same is not the case with regard to the education of the people. People in different stages of their advancement require radically different institutions to train them and the most important agency of element of all education is the govt. They must be taught to advance gradually through successive stages of improvement. People living in state of savage independence require in the first place to be taught the first lesson in civilzation viz. obedience. They must learn to obey. This can not be done unless there is a strong despot to tame and subdue them to the restraints of a civilised life. Again wild tribes are averse to continuous lebour In order to teach them habits of industry personal slavery may be necessary in very early stages of society. The slave no doubt, is one step in advance of the savage He has learnt to obey. But still what he obeys is only a direct command, and that too, when his master is at hand to punish. The stage next to this is that they should be taught to obey general intructions. In this state the govt. best fitted for such a people will be mild despotism. In this way, a peopel should be led through each higher stage, taking care at the same time that there will be alwaye an opening into a stage still higher. Otherwise in passing into a higher stage some nations have become stationary, *i. e.* The Egyption Hierarchy and the despotism of China have reached a certain point came to a a permanent halt. Therefore, we must have not only the next step but all the successive steps in view and what is relevent to our purpose we must have the highest stage in view; and this highest stage, there will not be much difficulty in shewing, is some form or other of representative govt. This is the final goal which must be steadily kept in view, if any nation is to attain the best form of Govt.

It appears to some people that despotism would be the best form of govt, if only a good dispot could be ensured. This as a pernicious and fatal doctrine. In the 1st place the supposition is extravagant not only would we require a good despot but an altering despot if he is really to manage and supperintend effectually all the departments of the administration. But even granting it for the sake of argument, that such a despot is available, the people under him would be absolutely passive. Every thing would have to be done for them not by them. They are to exercise no control whatever on their collective interests. In such a state where is the stimulus to speculation, when the speculation has no chance of being applied in practice. There will be very a few men who have taste for intellectual exercise in and for itself. People at large will care only for their families and this will make them extremely selfish. Politics they shall have to abdicate all power in the hands of their rulers. There will be no activity in such a people. They are continually exposed to foreign agression. These are the natural and inevitable results of a thorough going despotism and they can only be alleviated in so far as the despot ceases to be a despot and allows perfect liberty of discussion and thus helps the formation of a public opinion and allows the people to manage local interests themselves, retaining supreme legislative and executive power in his own hands. But the people will not be content to stop here. Having organs to express their sentiments, the people will make more demands; and the despot has to yield to them and thus reduce himself to a constitutional monarch or be overthrown. Thus despotism would not secure the advantages of despotism and realise but imperfectly those of a free govt. for the people will always be anxious that hold their power on sufference and that it may be taken from them at any moment. Many impatient people seeing the obstinacy and the intractableness of their fellow country men sigh for a strong hand to bear them down. But these people forget altogether one of the principal elements of good govt. viz the education of the people themselves.

(To be continued.)

---

We are sorry to hear the news of the death on Friday morning of Rao Bahadur Purshottam Narain Bhat Extra Assistant Commissioner at Amraoti, after a short illness. This news will be received with deep sorrow all over Berars and other districts where he was known for his charity and benevolence The deceased was an honorary secretary to the Lady Dufferin's Fund, Berar Branch. He was a high Free Mason. In him the Berar commission have lost an honest and able Judge. He was a man of remarkable energy and great business capacity. He was liked alike by natives as well as Europeans. His relatives, friends, and many acquaintances will long deplore his loss.

Mr. Ganesh Bapuji who left yesterday to take up his new appointment as E. A. C. at Kelapur was entertained at the Pandurang Govind's Garden by his friends on last Friday evening. The party consisted of a few persons who passed the evening cheerfully. We are glad to see him promoted but we are sorry that Akola should loose services of such an eminent officer. He was the fittest person to be the vice chairman of the Akola Municipality.

---

पोंच—आपला जळगांवकर पत्र पावले स्थळ संकोचाच्या बद्दल पुढील खेपेस घेऊ.

---

## वऱ्हाड

रावबहादूर पुरुषोत्तम नारायणभट ए. अ. क. व उमरावती स्मालकाज कोर्टाचे जज्ज यास ता. २८ मिनहू रोजीं देवाज्ञा झाली हे कळविण्यास आम्हास अत्यंत खेद वाटतो. रावबाहादुरांना हल्लीं जो सर्व ठिकाणीं तापाचा आजार सुरु झाला आहे त्या पेक्षां कांहीं विशेष मानगी झाली नाहीं. गुरुवार संध्याकाळ पर्यंत त्यांनीं कोर्टाचें काम केलें व एका रात्रींत काय तो त्याची प्रकृती बिघडून तिचा परिणाम हा असा झाला. राव बाहदुर वऱ्हाडांत बऱ्याच जागीं फिरले आहेत सबब ते कोणत्या तऱ्हेचे मनुष्य होते हे सांगण्याची फारशी जरूरी नाहीं. हे फार हुशार, विश्वासूक व दक्ष होते. एखादा पाहुणा आपल्या घरीं आला असता त्याचे आदरअतिथ्य कसे करावे हें यांच्या पासून शिकण्या सारखे होते. व ह्या वरील गुणानीं व केवळ आपल्या कर्तबगारीनें एवढ्या मोठ्या पदवीस पोहोंचले होते.

याच सप्तकांत आणखी एक गृहस्थ उमरावतीस वकिलीचा धंदा करण्याकरितां थोडे दिवसापूर्वीं आलेले होते ते मेले यांचें नांव र. कृ. टपवर्धन हे गृहस्थ मुंबई युनिव्हरासिटीचे बी. ए. एल. एल. बी. होते हे रत्नागिरीकडचे रहाणार असून उदर निर्वाहार्थ उमरावती मुक्कामी एका स्नेह्याचे येथें येऊन राहिले होते. बिचाऱ्याला आपल्या आप्तवर्गापासून दूर असतांच मृत्युनें झडप घालून परलोकीं नेले त्यांचे आप्तवर्गास जे दुःख होत असेल त्याची कल्पना कोण करूं शकेल?

आमच्या लेखणीच्या कपाळीं आणखी एक मृत्युची वार्ता देण्याचे आले आहे येथील प्रसिद्ध व श्रीमान व्यापारी कादरभाई बोहरी हे गेल्या आठवड्यांत बऱ्हाणपुराकडे निवर्तले हे अकोल्यातील वजनदार व्यापारी होते घरें चाळी, बंगले वगैरे बांधण्याची यांना मोठी हौस, येथील रम्य नाटकगृह तर या गोष्टीची प्रत्यक्ष रीतीनें साक्ष देत आहे. या नाटकगृहावरून कादरभाईची आह्मास चिरकाल आठवण होईल. यांचा व्यापाराच्या कामांत हात खंडा होता. याचे माग याचे एक २२ वर्षाचे चिरंजीव मालमत्तेची व्यवस्था पहाण्यास आहेत.

रा० रा० गणेश बापूजी उडगीकर हे काल रोजीं आपल्या ए० अ० क० चे जागीं रुजूं होण्यास केळापुरास दिवसाचे गाडीनें गेले.

मे. निकोलेट साहेब येथें येई पर्यंतो मे. डेविस साहेब त्यांचें काम पहातील व मे. नेकोलेट येथें आल्या नंतर ते वाशिमास डे. कमिशनरचें काम पहाण्यास जातील.

---

वर्तमानसार.

गेल्याच्या मागील शुक्रवारीं विलायतच्या आगबोटीनें बाबु सुरेंद्रनाथ बानरजी हे विलायतेंत हिंदुस्थानसंबंधानें खटपट करण्या करितां व तेथील लोकांस इकडची सुखदुःखें सांगण्याकारितां गेले हें कळविण्यास आह्मांस मोठा आनंद वाटतो.

मुंबई ब्यांकेचे सेक्रेटरी व खजीनदार यांनीं आपल्या कामाचा राजिनामा दिला यांना दर महिना ७०० रु० पेनशन व २०,००० रु० बक्षिसादाखल देण्याचे ठरले.

प्रिन्स बिस्मार्क यांनीं जर्मनीची उत्तम प्रकारें नौकरी केल्याबद्दल त्यांचे जर्मनीच्या बादशहानीं आभार मानून त्यांना ड्यूक आफ लानबर्ग कर्नल जनरल आफ कावलरी व फील्ड मार्शल आफ फोर्सेस असें किताब दिले.

कौंट हर्बर्ट बिस्मार्क हे कांहीं दिवस बाह्य प्रदेश संबंधीं मुख्य प्रधानाचे काम करतील.

ड्यूक आफ कानाट यांच्या यार्ड क्लबमध्यें झालेल्या भाषणामुळें मुंबईच्या संरक्षणाबद्दल विशेष बंदोबस्त करण्याचे ठरले आहे. असें समजतें.

सिव्हिल सार्विसच्या परिक्षेला जाणाऱ्या १०० उमेदवारांपैकीं सुमारें ७० उमेदवार शारिरिक अशक्ततेमुळें नालायक ठरले जातात असें मि० जे. एच. गास्टिन यांनीं ता.२० रोजीं मद्रासेस ह्मणून दाखविलें यासाठींच शारीरिक शिक्षण सर्व शाळांतून देण्याचा क्रम असला पाहिजे.

हरवान बेटिचर यांस जर्मनीचें प्रधान मंडळाचे मुख्य नेमिले व जनरल काप्रिवी यांस प्रिन्स बिस्मार्कच्या जागेवर चान्सेलर नेमिलें असें कळतें.

हिंदुस्थानसंबंधी कायदे कौन्सिलच्या बिलाचा मसुदा हाऊस आफलार्डसमध्यें ता० १८ मार्च रोजीं पास झाला.

कलकत्यास तापाची साथ गेल्याची खबर आली आहे.

मेक्सिकोमध्यें इनफ्ल्यु एंझाच्या योगानें अजमासे रोज १२५ माणसे मरतात व गांवांत फारच कहर उडाला आहे.

गेल्या २९ वर्षांत हिंदुस्थान सरकारचे अबकारी खात्याचें उत्पन्न सहा पटीनें वाढलें!

आफ्रिकेमध्यें प्रतिवर्षीं सुमारें ६५००० हत्ती मारले जातात व त्यांच्यापासून सुमारें ९ लक्ष रुपयांचे हस्तिदंत सांपडतें.

सु० प०

नव्या सालचे जमाखर्चाचे बजेट गेल्या २१ तारखेस हिंदुस्थान सरकारच्या कौन्सिल पुढें आलें व तें पासही झालें यंदाच्या या बजेटाचा अकार नेहमींप्रमाणें भला लंगी नसून बराच थोडक्यांत आहे, यंदा उत्पन्नापेक्षां खर्च कमी होईल व वर्षाच्या अखेर ३०,४९,००० रुपये शिलक राहील असा अदमास आहे. ही शिलक दरवर्षांपेक्षां बरीच जास्त आहे व गेल्या एक दोन वर्षांत जी तूट दाखविण्यांत आली होती तशी यंदाच्या बजेटांत नाहीं ही एक आनंदाची गोष्ट होय.

सर दिनशा माणिकजी पेटिट यास ब्यारोनेट करण्यांत आले.

निजामसरकार दरवर्षीं ७० हजार रुपये नवे घोडे काढविण्यांत खर्च करितात.

रशियन पत्रांत राष्ट्रीय सभेच्या संबधानें अनकूल लेख प्रसिद्ध होऊं लागले आहेत.

एकदा एक मोठा तत्ववेत्ता एका बोटींत बसून समुद्रातून जात असतां खलाशास विचारतो कायरे नाखवा तुला नीतिशास्त्र समजतें काय? नाखव्यानें नाहीं ह्मटल्यावर तो ह्मणाला, तर मग तुझें अर्धे आयुष्य फुकट गेलें. बरें पण तुला तत्वज्ञानाची तरी कांहीं माहिती आहे? ' या प्रश्नालाही पूर्वीप्रमाणेंच जबाब मिळाल्यावर तत्ववेत्ते ह्मणाले आणखी एक चतुर्थांश आयुष्य व्यर्थ तर मग, हे त्यांचे बोलणें संपताच वाऱ्याच्या झोकानें बोट पालथी झाली, तेव्हां बोटवाल्यानें विचारलें " पंडितजी, आपल्यास पोहता येते कां? ते ह्मणाले नाहीं, तेव्हां खलाशी ह्मणतो " मग तुमचे सगळे आयुष्य व्यर्थ हो व्यर्थ.

नवापूरच्या जंगलांत एक वाघ बरेंच दिवसांपासून माजला आहे. त्यानें आजपर्यंत पुष्कळ मनुष्यास जिवें मारिलें. त्याची मजा अशी सांगतात कीं, पांच चार मनुष्यें एकत्र बसली असतां मधल्याच मनुष्यावर झडप घालून त्याचें प्राण हरण करितो. आणि त्याचें प्रेत दहन होत असतां आपण समोर दूर कोठें अंतरावरून कौतुक पहात बसतो. ह्या वाघानें इतका प्रलय माजविला असूनही आजपर्यंत त्यास कोणीच वस्ताद मिळाला नाहीं, हें मोठें आश्चर्य आहे. थोड्या दिवसांपूर्वीं पिंपळनेराहून चार पोलिसचे हत्यारी शिपाई आणि एक नाइक अशी टोळी ह्या भयंकर वाघाच्या बंदोबस्ता करितां मुद्दाम रवाना झाली आहे. याप्रमाणें आह्मास एका विश्वसनी गृहस्थाकडून कळलें आहे. खरें असेल तर प्रविन साहेबाचे आणि डेव्हिड साहेबांचे पश्चांत वाघास मोकळें रान सांपडले आहे. असें ह्मणणें गैर वाजवी होणार नाहीं.

विलायतेस क्विन नावाच्या एका युरोपियनानें नेटिवाच्या सोईसाठीं एक शाळागृह स्थापण्याचे योजिलें असून त्याकडे सर असमानजा याणी ५०,००० रु० दिले ह्या इमारतींत एकंदर २,००,००० रुपये लागतील असा अदमास आहे. विलायतेंतील शिक्षणासाठीं हिंदुस्थानांतील नेटिवांचा पैसा! क्विन जर इतका नेटिवांचे हित करण्यास निघाला आहे तर त्यानें विलायतेस फंड गोळा करावयाचा होता आह्मा नेटिवाची दोन्ही कडून ताणाताण. या फंडास इतर संस्थानिकांनींही मदत करावी असें ध्वनीत झाले आहे. हे पूर्ण सूचक आहे. आतां पहा संस्थानिक भडाभड पैसे ओततील. बिचाऱ्या संस्थानिकाकडे तरी काय दोष खरे संस्थानिक पोलिटिकल एजंट!

ता० २० एप्रील रोजी व्हयसराय साहेब सिमल्यास पोंहचतील

सर लिपिल ग्रिफिन साहेबाची स्वारी कलकत्यास येऊन दाखल झाली आहे. आमृत बाजार पत्रकर्त्यांला जरा बेतानेंच राह्यावे लागेल.

येत्या दिसेंबर माहिन्यांत गोव्यास धंद्याचे प्रर्दशन होणार आहे.

एक पौंडाची नोंट तयार करावी असें विलायतेस वाटत आहे.

हिंदुस्थानातील पूर्वींच्या प्रसिद्ध पुरुषाचे चरित्रें थोडक्यांत इंग्रजांत प्रसिद्ध करण्याबद्दल विलायतेस सर हंटर यांणीं सुरुवात केली आहे.

अलीकडे विलायतच्या पार्लमेंटात सरकार पक्षाचा कित्येक प्रसंगीं मोड होऊं लागला आहे.

गोव्याकडे एक प्रजासत्ताक मताचें पत्र प्रसिद्ध होत असतें.

मुंबइस उत्तम प्रकारची गोदी तयार करण्याचे विलायतेस घाटत आहे.

लंडन शहरांतील २० हजार इंजिनियर लोकांनीं कामावर न जाण्याचा कट केला आहे.

चिनचा बादशा व हिंदुस्थानचे व्हायसराय यांची नुकतीच एक बडी मेजवानी झाली.

ठा० अ०

आगीनें नुकसान— बेंगाल हायड्रालिक जूट प्रेसास आग लागून तागाचे ९००० गठ्ठे व ४०० मण मोकळा ताग जळून खाक झाला. एकंदर नुकसान दोन लक्ष रुपयांचे झालें.

सिडन शहरीं नुकतेंच एक लहान मुलांचे प्रदर्शन झालें. प्रदर्शनांत एकंदर ३०० लहान मुलें त्यांच्या आया घेऊन आल्या होत्या. त्या मुलांत जीं उत्तम मुलें ठरतील त्यांस एकपासून १०० पौंडपर्यंत बाक्षिसें ठरलीं होतीं तीं बारा डाक्टरांच्या कमिटींत जीं मुलें उत्तम ठरतील त्यांस बाक्षिसें मिळावयाची. शेवटच्या दिवशीं कमिटीच्या मतानें पहिले बक्षीस देण्यास योग्य अशी एक बारा महिन्याची मुलगी ठरली. याप्रमाणें बाक्षिस ठरवून कमिटींतील मंडळी जेवायास जाणार इतक्यांत दोनतीनशे बायकांची एक टोळी रागाऊन त्यांजवर चालून आली. व माझ्या बाळालाच पहिलें बक्षीस दिलें पाहिजे अन्याय झाला' असें प्रत्येक बाई ह्मणूं लागली. या स्त्री समुद्दापासून आपलें संरक्षण करण्याची ताकद परीक्षक मंडळींत नसल्यामुळें त्यांस स्त्री सैन्यांतील शिपायांनीं छत्रीं व तीव्र नखानीं घायाळ केले; पण सर्वांत त्या कमिटीच्या सेक्रेटरीस दोघींनीं एका बाजुस नेऊन तिसरीनें आपल्या लोमयष मार्जनीनें त्यास यथेच्छ ठोक दिला तेव्हां प्रदर्शनचे डायरेक्टरास तांबडतोब बोलावून आणले. डायरेक्टरांनीं हा प्रबल अबलांचा झगडा पाहून त्यांना परीक्षक मंडळीस सोडविण्यासाठीं ग्यासचे दिवे मालविण्याचा हुकूम केला तेव्हां जिकडे तिकडे अंधकार झाला व सर्व मुलें एकदम आई आई करून रडूं लागली. मुलांचे रडणें ऐकून सर्व बायकांचें लक्ष तिकडे गेले व त्या अंधरांतून आपापल्या मुलांकडे निघून गेल्या. अशा रीतीनें सुटका झाल्यानंतर डायरेक्टरच्या समयसुचकतेची तारीफ होऊन प्रदर्शनाची बोळवण झाली.

शु. सू.

## पाक.

सालंमीश्री पाक घेतला असतां धातुची मजबुती होऊन शक्ती वाढते दर दिवस ३ तोळे प्रमाणें ४५ दिवस घ्या.

बदाम पाक घेतला असता, मस्तकांतील उष्णता दूर होते डोळ्यास थंडावा येतो धातु पुष्ट होते बळयेते दरदिवस ३ तोळे प्रमाणें ३० दिवस घ्या.

गोखरूचा पाक घेतला असतां मूत्र मार्गांत होणारी आग, तिडका, जुनापरमा, मेहरोग मूत्र पुष्कळ आणि गढूळ होते तो हे रोग दूर होऊन धातु शुद्ध होते बळ येते स्त्री संगाची इच्छा होते दर दिवस ३ तोळे प्रमाणें ६० दिवस घ्या.

कोहळे फळाचा पाक घेतला असतां डोळ्यास येणारी अंधारी भोवळ पिताचे उपद्रव हे रोग दूर होऊन रक्त शुद्ध होते धातु पुष्ट होते बळयेतें दरादिवस ३ तोळे प्रमाणें ४५ दिवस घ्या.

वर लिहिलेले पाक मागविण्याची रीत

| तोळे | किंमत रुपये | पोष्टेज |
|---|---|---|
| १६ | १ | ०९ |
| ३२ | २ | ०१२ |
| ४८ | ३ | ०१३ |
| ६४ | ४ | १०१ |
| ८० एकशेर | ५ | पोष्टेज माफ |

पत्ता गजानन बाळकृष्ण वैशंपायन पेठ सदाशिव पुणें.—

## जाहिरात.

सर्व लोकास कळविण्यांत येते कीं आकोल्यास आठवड्यातून दोन बाजार भरावें असें फार दिवसा पासून घाटत होते त्याप्रमाणे बाजार ता. २ एप्रील सन १८९० इसवी रोजी बुधवार आहे त्या दिवसा पासून बाजार भरवीत जावा असा आकोलें म्युनसीपल कमेटीचा ठराव जाला आहे सदरहु बाजारा करितां जागा शहरचे पश्चीमेस सफीलीचे बाहेर तयार केली आहे करितां गावांतील व पेठेंतील सर्व दुकानदार लोकांनीं सदरहु तारखे पासून सदरहू जागीं बाजार भरवीण्याची तजवीज करावी ह्यापासून सर्व लोकांचा फायदा आहे. तुर्त बाजारा करितां जागा थोडी तयार केली आहे. बाजार जसजसा भरभराटीस येईल तसतसी जागा ज्यास्त तयार करण्यांत येईल रविवारचें बाजारास जशा सोई जाल्या आहेत तशा करून देण्यात येतील ह्या बाजारांत दुकानदारांस बाजार बैठकी बद्दल तुर्त कर द्यावा लागणार नाहीं कळावें ता० २१।३।९० इ०

Krishnaji Malhar.
Sceretary.
A. M. C.

## जाहिरात.

सर्वत्र लोकांस या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं भंगीपटीचा नवान लायसन्स घेण्याचें वर्ष ता० १ माहे एप्रील सन १८९० पासून सुरू होणार करितां ज्यांना आपापले पायखाने सुरू राहावेत व साफ केले जावेत अशी इच्छा असेल त्यांनीं ता० ५ एप्रील सन १८९० चे आंत पायखान्याचें लायसेन्स टौनहालांत येऊन घेऊन जावे. जे लोक सदरहु तारखेपावेतो लायसन्स घेणार नाहींत त्या लोकांचे पायखाने बंद केले जातील व ते साफ करण्याचे संबधानें कमेटी जबाबदार राहणार नाहीं लायसन्स ता० १ एप्रील सन १८९० पासून सकाळचे साहावाजेपासून ११ वाजे पावेतो व दुपारी दोन वाजेपासून साहावाजे पावेतो मिळतील कळावे ता० २० मार्च सन १८९०

Krishnaji Mulhar.
Secretary Akola.

☞ हें पत्र अकोला येथें कै. वाशी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.